CMYK

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, २४ फेब्रुवारी २०२६ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक ८९ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



व्यक्ती आणि समाजाच्या परस्परसंवादाचे नियमन करणाऱ्या गोष्टींना धर्म म्हणतात. कर्तव्याबद्दल बोलायचे झाले, तर मातृधर्म, पितृधर्म इत्यादी सर्व आपल्या कर्तव्यांना सूचित करतात. आईचे कर्तव्य काय आहे, वडिलांचे कर्तव्य काय आहे, राजाचे कर्तव्य काय आहे, प्रजेचे कर्तव्य काय आहे? धर्म हा प्रत्येकाचे कर्तव्य परिभाषित करतो. धर्म व्यक्ती आणि समाजाला जोडतो.

**- कुप्प. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

### आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या

# जि. प. निवडणुका लांबणीवर

### सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

◆ **नवी दिल्ली, २३ फेब्रुवारी**

महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील ओबीसी आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयात सोमवारी सुनावणी पार पडली. राज्यातील ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यास न्यायालयाने मनाई केली आहे. त्यामुळे राज्यात आता २२ जिल्हा परिषद आणि त्याअंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुका लांबणीवर गेल्या आहेत.

न्यायालयात पार पडलेल्या सुनावणीत अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रलंबित निवडणूक घेण्यास परवानगी देण्याची मागणी राज्य सरकारकडून करण्यात आली होती. मात्र, न्यायालयाने उर्वरित जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यास मनाई केली आहे.



राहुल रमेश वाघ विरुद्ध केंद्र आणि महाराष्ट्र सरकार या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने बांठिया समितीपूर्वीच्या स्थितीनुसार निवडणुका घेण्याचा आदेश दिला होता. मात्र, राज्य निवडणूक आयोगाने आरक्षणाची ५० टक्क्यांची कायदेशीर मर्यादा ओलांडल्याने २२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुकांना स्थगिती दिली आहे. सद्यःस्थितीत १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका पार पडल्या असल्या, तरी आरक्षणाच्या या तांत्रिक पेचामुळे उर्वरित २२ जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका आता अनिश्चित काळासाठी प्रलंबित राहण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

न्यायालयीन भूमिकेमुळे राज्यातील प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता अनिश्चित काळासाठी लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जोपर्यंत आरक्षणाच्या मर्यादेबाबत कायदेशीर स्पष्टता येत नाही, तोपर्यंत निवडणूक प्रक्रिया पुढे नेण्यास न्यायालयाने हिरवा कंदील दाखवलेला नाही. परिणामी, अनेक जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांचे भवितव्य सध्या अधांतरी आहे. (वृत्तसंस्था)

#### ओबीसी आरक्षणाच्या वैधतेवर लवकरच अंतिम सुनावणी

बांठिया आयोगाने शिफारस केलेल्या ओबीसी आरक्षणाच्या वैधतेवर न्यायालय लवकरच अंतिम सुनावणी सुरू करणार आहे. न्यायालयाने सर्व संबंधित वकिलांना या सुनावणीसाठीची पूर्वतयारी पूर्ण करण्याचा निर्देश दिला असून, ही सुनावणी लवकर घेण्याचे संकेत दिले आहेत. या अंतिम निकालावरच राज्यातील ओबीसींचे राजकीय आरक्षण आणि रखडलेल्या निवडणुकांचा मार्ग अवलंबून असेल.

#### तांत्रिक गुंतागुंतीमुळे नकार

राज्यातील ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली गेली आहे, त्या ठिकाणच्या निवडणुकांवरील स्थगिती न्यायालयाने कायम ठेवली आहे. राज्य सरकारच्या वतीने महान्यायाभिकर्ता तुषार मेहता यांनी अंतिम आदेशाच्या अधीन राहून या निवडणुका घेण्याची परवानगी मागितली होती. मात्र, तांत्रिक गुंतागूंत पाहता न्यायालयाने अशी कोणतीही परवानगी देण्यास स्पष्ट नकार दिला आहे.

### 'तरुण भारत'च्या दिवाळी अंकाला

## पु. ल. देशपांडे स्मृती सर्वोत्कृष्ट पुरस्कार

◆ **मुंबई, २३ फेब्रुवारी**

येथील मराठी वृत्तपत्र लेखक संघाच्या ५० व्या राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला असून नागपूर तरुण भारतच्या दिवाळी अंकाला पु. ल. देशपांडे स्मृती सर्वोत्कृष्ट दिवाळी अंकाचा पुरस्कार घोषित झाला आहे.

मराठी वृत्तपत्र लेखक संघाचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे यांनी ही घोषणा केली. पुरस्कार वितरण सोहळा २७ फेब्रुवारी रोजी मुंबईत मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमात होईल. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शताब्दी, तरुण भारतची शताब्दी तसेच श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेचा अमृत महोत्सव अशा त्रिवेणी योगावर तरुण भारतने २०२५ चा दिवाळी अंक 'शताब्दी' या संकल्पनेवर प्रसिद्ध केला. त्यात रा. स्व. संघासह अनेक निवडक सुप्रसिद्ध व्यक्तिमत्त्वांच्या शताब्दीची सुरेख व स्वतंत्र नोंद घेतली गेली. याशिवाय, बालकथा, विशेष लेखांचा विभाग, दोन परिसंवाद, रिपोर्ताज व कथा-कवितांचा समावेश या अंकात असून त्यात काही सेलिब्रिटीज तसेच साहित्य अकादमी विजेत्यांसह बृहन्महाराष्ट्रातील अनेक ख्यातकीर्त लेखकांचे व कवींचे योगदान आहे.




तरुण भारतचे मुख्य संपादक शैलेश पांडे यांनी हा अंक संपादित केला असून त्याचे समन्वय संपादक अनिल यादव हे होते. तरुण भारतच्या दिवाळी अंकाला पु. ल. देशपांडे स्मृती सर्वोत्कृष्ट अंकाचा पुरस्कार घोषित झाल्याने शताब्दी विशेषांकाची दखल राज्य स्तरावर घेतली गेली आहे. दरम्यान, ग्रंथालय चळवळीतील दिवंगत ज्येष्ठकार्यकर्ते आणि दादर सार्वजनिक वाचनालयाचे प्रमुख कार्यवाह दत्ता कामथे यांच्या स्मरणार्थ वाचन चळवळीतील सेवाभावी कार्यकर्ता-ग्रंथसखा पुरस्कार मनमाडचे प्राथमिक शिक्षक अनिल शिनकर यांना घोषित झाला आहे. त्यांचाही २७ तारखेला सन्मान होईल. तसेच 'वैभवशाली मराठी भाषेचे दगाबाज कोण?' या विषयावरील लेख स्पर्धेची पारितोषिकेही याच कार्यक्रमात वितरित केली जातील, असे मालुसरे यांनी कळविले आहे. (तभा वृत्तसेवा)

## महत्त्वाचे

### 'टॅरिफ' विरोधातील निर्णयाचे स्वागत

**मुंबई** : अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफच्या विरोधात अमेरिकी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे गुंतवणूकदारांनी आठवड्याच्या पहिल्या सत्रात म्हणजे सोमवारी स्वागत करीत सार्वजनिक क्षेत्रातील बँका, वाहन आणि वित्तीय समभागांत मोठ्या प्रमाणात खरेदी केली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक ४७९ अंकांनी वधारून ८३,२९४ वर बंद झाला. दिवसभराच्या सत्रात त्याने ६७१ अंकांची उसळी घेतली होती. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १४१ अंकांनी वधारून २५,७१३ या पातळीवर बंद झाला. आजच्या सत्रात सर्वाधिक फायदा अदानी पोर्ट्सला झाला. त्यापाठोपाठ कोटक महिंद्रा बँक, अल्ट्रा टेक सिमेंट, पॉवरग्रिड, हिंदुस्तान युनिलिव्हर, एचडीएफसी बँक, ॲक्सिस बँक, भारती एअरटेल या कंपन्यांना झाला. दुसरीकडे इन्फोसिस, टेक महिंद्रा, ट्रेंट, एचसीएल टेक्नॉलॉजीज, बजाज फिनसर्व्ह या कंपन्यांना मात्र नुकसान झाले.

### रुपया सात पैशांनी वधारला

**मुंबई** : अमेरिकी डॉलरच्या तुलनेत सोमवारी रुपया सात पैशांनी वाढून ९०.८७ वर स्थिरावला. जागतिक पातळीवर कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण आणि जागतिक व्यापाराशी संबधित अनिश्चिततेमध्ये कमकुवत डॉलरमध्ये हे घडले. मात्र, बाहेर जात असलेला विदेशी निधीचा प्रवाह, भूराजकीय चिंता, स्थानिक युनिटसाठी मर्यादित नफा असल्याचे विदेशी चलन व्यापाऱ्यांनी सांगितले. आंतरबँक विदेशी चलन बाजारात रुपया ९०.७६ वर उघडला आणि सत्रादरम्यान डॉलरच्या तुलनेत ९०.६७-९०-८९ च्या श्रेणीत व्यवहार केला आणि अखेर ९०.८७ वर तो स्थिरावला.

### नेपाळमध्ये बस नदीत कोसळून १९ ठार

**काठमांडू** : नेपाळमध्ये प्रवासी बस त्रिशुली नदीत कोसळल्याने १९ जणांचा मृत्यू झाला तर २५ प्रवासी जखमी झाले आहे. मृतकांमध्ये न्यूझीलंडमधील दोन पर्यटकांसह महिला व पुरुषांचा समावेश आहे. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू असून मृतकांची संख्या वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ही घटना सोमवारी पहाटे घडली. बस पोखराहून काठमांडूला जात असताना हा अपघात झाला. बसमध्ये ४४ प्रवासी असल्याचे सांगण्यात येत आहे. प्राप्त माहितीनुसार, प्रवासी बस सोमवारी पहाटे १ वाजताच्या सुमारास पोखराहून पृथ्वी महामार्गावरून जात असताना चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले आणि बस उतारावरून सुमारे ३०० मीटर खोल त्रिशुली नदी पात्रात कोसळली.

### शरद पवारांची प्रकृती उत्तम

**पुणे** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार) ज्येष्ठ नेते शरद पवार यांची प्रकृती सुधारत असून सध्या ते रुग्णालयात विश्रांती घेत आहेत. ते व्यवस्थित आहार घेत असून आता पूर्णपणे बरे झाले आहेत, असे रुबी हॉल क्लिनिक या रुग्णालयाचे व्यवस्थापकीय विश्वस्त व मुख्य हृदयरोगतज्ज्ञ डॉ. परवेज ग्रँट यांनी सोमवारी सांगितले.शरद पवार यांना रविवारी पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक येथे दाखल करण्यात आले होते. सर्व वैद्यकीय तपासण्या पूर्ण झाल्या असून अहवाल समाधानकारक आले आहेत.

# परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र 'नंबर वन'

### राज्यपाल देवव्रत यांचे प्रतिपादन

◆ **मुंबई, २३ फेब्रुवारी**



दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत ३० लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार झाले. देशाच्या एकूण जीडीपीमध्ये महाराष्ट्राचा वाटा १३ टक्के असून, सर्वाधिक परकीय गुंतवणूक आकर्षित करणारे राज्य म्हणून महाराष्ट्र पुन्हा अव्वल स्थानावर असल्याचे प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.

विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सुरुवात आज राज्यपालांच्या अभिभाषणाने झाली. राज्यपालांनी भाषणाची सुरुवात मराठीतून केली. दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत त्यांनी राज्य सरकारच्या कामगिरीचा आढावा घेत आगामी वर्षाचा विकास आराखडा स्पष्ट केला.

आगामी आर्थिक वर्षात राज्य सरकार औद्योगिक गुंतवणूक, पायाभूत सुविधा, शेतीतील तंत्रज्ञान आणि सीमाप्रश्न यावर आक्रमक धोरण राबविणार आहे. विकसित महाराष्ट्र हे केवळ घोषवाक्य नसून, ठोस कृती आराखड्यासह पुढे नेले जात असल्याचा दावा राज्यपालांनी केला.

**शेतीत 'एआय'चा वापर**

पीक नियोजनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात् एआयचा वापर, उत्पादकता वाढविण्यावर भर आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा प्रयत्न सरकार करणार आहे. तंत्रज्ञानाधारित शेतीमुळे हवामान अंदाज, पाण्याचे व्यवस्थापन आणि बाजारपेठेतील दर यांचा अचूक अंदाज घेता येणार असून, शेतकऱ्यांना याचा थेट फायदा होणार असल्याचे राज्यपाल म्हणाले.

**पोलिसांसाठी विशेष गृहनिर्माण योजना**

राज्याच्या सुरक्षा व्यवस्थेचा कणा असलेल्या पोलिस दलासाठी विशेष गृहनिर्माण योजना राबवली जाणार आहे. यामुळे हजारो पोलिस कुटुंबांचा घराचा प्रश्न मार्गी लागेल, असे राज्यपालांनी सांगितले. (तभा वृत्तसेवा)

#### गडचिरोलीत 'स्टील हब'; 'समृद्धी'चा विस्तार

सरकार गडचिरोलीचे 'स्टील हब'मध्ये रूपांतर आणि पूर्व विदर्भाला स्वतंत्र 'स्टील कॉरिडॉर' म्हणून विकसित करीत आहे. त्यासाठी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाचा विस्तार वाढवणपर्यंत केला जाणार असल्याचे राज्यपालांनी सांगितले. नक्षलग्रस्त ओळखीपासून औद्योगिक केंद्राकडे गडचिरोलीचा प्रवास सुरू झाला आहे. ग्रामीण भागातील रस्ते आणि शेतीसाठी 'मुख्यमंत्री बळीराजा शेत रस्ते योजना' प्रभावीपणे राबवली जात असल्याचेही ते म्हणाले.

# प्रकल्प वेळेत अन् उच्च दर्जासह पूर्ण व्हावा : पालकमंत्री गोरे

### पंढरपूर कॉरिडॉर संदर्भात मंत्रालयात झाली बैठक

**पंढरपूर,दि.२३ फेब्रुवारी -**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या श्रीक्षेत्र पंढरपूर कॉरिडॉर संदर्भात सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी मुंबई येथे मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

या बैठकीत कॉरिडॉर प्रकल्पाच्या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. विविध प्रशासकीय आणि तांत्रिक बाबींवर सखोल चर्चा करून भाविकांना अधिक सुलभ, सुरक्षित आणि सुव्यवस्थित सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. प्रकल्प निर्धारित वेळेत आणि उच्च दर्जासह पूर्ण व्हावा, यासाठी विभागांमधील समन्वय अधिक बळकट करण्यावर विशेष भर देण्यात आला. यावेळी सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, आमदार समाधान आवताडे आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

# अजितदादा हे महाराष्ट्राला न मिळालेले सर्वोत्तम मुख्यमंत्री : देवेंद्र फडणवीस

- **अजितदादांना अनोखी श्रद्धांजली वाहताना मुख्यमंत्री भावूक**
- **विधानसभेत अजित पवार यांच्या शोकप्रस्तावावर बोलताना अनेकांना अश्रू अनावर**



**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.२३ फेब्रुवारी-**

अजित पवारांविषयी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत भावनिक शब्दांत त्यांचे कौतुक केले. अजितदादा हे महाराष्ट्राला न मिळालेले सर्वोत्तम मुख्यमंत्री होते, असे स्पष्ट विधान त्यांनी केले. क्षमता, निर्णयक्षमता आणि प्रशासनातील पकड यांचा विचार केला तर मुख्यमंत्रीपदासाठी आवश्यक असलेले सर्व गुण दादांमध्ये होते, असे त्यांनी सांगितले. राज्याला एक चांगला मुख्यमंत्री मिळू शकला असता; मात्र ते घडले नाही, ही खंत त्यांनी व्यक्त केली. महाराष्ट्रात वसंतदादा आणि अजितदादा ही दोन नावं त्यांच्या कामामुळे कायम स्मरणात राहतील, असेही त्यांनी नमूद केले.



फडणवीस म्हणाले की, दादांची राजकीय कारकीर्द मोठी आणि प्रभावी होती. राजकारणात ते अजून मोठी इनिंग खेळतील, अशी अपेक्षा अनेकांना होती. मात्र जीवनाच्या प्रवासात त्यांनी पहिल्यांदाच टायमिंग चुकवले, असे भावनिक विधान त्यांनी केले. दादांचा वक्तशीरपणा सर्वपरिचित होता, त्यामुळे हे अचानक घडलेले वास्तव अधिक वेदनादायी असल्याचे त्यांनी सांगितले. याची सर्वाधिक हळहळ आपल्याला राहील, असेही ते म्हणाले. दादांच्या काम करण्याच्या पद्धतीबाबत बोलताना फडणवीस यांनी अनेक आठवणी सांगितल्या. मंत्रालयात कुठल्याही अधिकाऱ्यांपेक्षा आधी पोहोचणारे ते नेते होते. सकाळी नऊ वाजता ते आपल्या दालनात बसलेले असायचे. वेळेचे काटेकोर पालन आणि कामातील शिस्त हे त्यांच्या स्वभावाचे मुख्य गुण होते. एखादा निर्णय त्यांना योग्य वाटला नाही तर ते फाईल थांबवून सविस्तर चर्चा करत. निर्णय घाईत न घेता विचारपूर्वक घेण्याची त्यांची सवय होती, असे त्यांनी स्पष्ट केले. दादांच्या काही वैयक्तिक सवयींचाही फडणवीस यांनी उल्लेख केला. मुख्यमंत्री होण्याची क्षमता असूनही ती संधी त्यांना मिळाली नाही, ही खंत त्यांनी पुन्हा व्यक्त केली. राज्याच्या राजकारणात त्यांनी निर्माण केलेला ठसा कायम राहील आणि त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्र त्यांना नेहमी लक्षात ठेवेल, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. यंदा दादांनी आपला १२ वा अर्थसंकल्प सादर केला असता आणि पुढील वर्षी १३ वा अर्थसंकल्प मांडून बॅरिस्टर शेषराव वानखेडे यांच्या विक्रमाशी बरोबरी केली असती, असे त्यांनी नमूद केले. पुढील काळात सर्वाधिक अर्थसंकल्प मांडणारे अर्थमंत्री म्हणून त्यांचे नाव नोंदले गेले असते; मात्र अचानक त्यांच्या जाण्यामुळे ही परंपरा थांबली, असेही ते म्हणाले. उध्दव ठाकरे, जयंत पाटील, मंत्री छगन भुजबळ, मंत्री आदिती तटकरे, आ. रोहित पवार, आ. भास्कर जाधव, आ. जितेंद्र आव्हाड, मंत्री हसन मुश्रिफ यांच्यासह अनेकांना अश्रू अनावर झाले.

**दादा तूमचा निर्णय चूकला, माघारी या : एकनाथ शिंदे**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा दिला. दादा म्हणजे स्पष्टवक्तेपणा आणि वक्तशीरपणाचं प्रतीक होतं, असे सांगताना शिंदे यांचा आवाज दाटून आला. दादा, तुमचा हा निर्णय चुकलेला आहे, माघारी या, असे शब्द उच्चारत त्यांनी सभागृहातील प्रत्येक सदस्याला भावूक केले. आज सभागृहात नजर टाकली की ते डोळ्यासमोर उभे राहतात, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

# दहशतवादविरोधी धोरण जाहीर

### आठ पानांचा 'प्रहार'

◆ **नवी दिल्ली, २३ फेब्रुवारी**

केंद्र सरकारने देशाचे पहिले दहशतवादविरोधी धोरण सोमवारी जाहीर केले. यात दहशतवाद कदापि खपवून न घेणे, गुप्तचर आधारित हल्ले रोखणे आणि अतिरेकी हिंसाचार मोडून काढण्यावर बहुस्तरीय रणनीती मांडण्यात आली. याचा उद्देश दहशतवाद्यांना, त्यांच्या वित्तपुरवठादारांना आणि समर्थकांना निधी, शस्त्रे आणि सुरक्षित आश्रयस्थानांपर्यंत पोहोचण्यापासून रोखण्याचा आहे. आठ पानांच्या या धोरणाला 'प्रहार' नाव देण्यात आले.

हे धोरण भारत किंवा विदेशातून येणाऱ्या दहशतवादी धोक्यांचा सामना करण्यासाठी सात प्रमुख स्तंभांवर आहे. यात प्रतिबंध, प्रतिसाद अंतर्गत क्षमता एकत्रित करणे, मानवी हक्क आणि कायद्याचे राज्य आधारित प्रक्रिया तसेच कट्टरवादासह दहशतवाद फोफावेल अशी परिस्थिती कमी करणे, दहशतवादाला आळा घालण्यासाठी आंतरराष्ट्रीय प्रयत्नांना एकत्र आणणे आणि त्याला आकार देण्याचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

#### तिन्ही आघाड्यांवर धोक्याचा सामना

भारताला पाणी, जमीन आणि आकाश या तिन्ही आघाड्यांवर दहशतवादी धोक्याचा सामना करावा लागतो. सीमा सुरक्षा दल आधुनिक तंत्रज्ञान आणि उपकरणांनी सुसज्ज आहेत. वीज, रेल्वे, विमान वाहतूक, बंदर, संरक्षण, अंतराळ आणि अणुऊर्जा यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांच्या सुरक्षेसाठी क्षमता वाढवण्यात आली आहे, असे सरकारने 'प्रहार'मध्ये म्हटले आहे.

# कुनोत येणार बोत्सवानाचे आठ चित्ते

### एकूण संख्या ४६ होणार

◆ **शिवपूर, २३ फेब्रुवारी**



मध्यप्रदेशच्या कुनो राष्ट्रीय अभयारण्यात चित्त्यांची संख्या आता वाढणार असून, २८ फेब्रुवारी रोजी आफ्रिकेतून आणखी आठ चित्त्यांना आणले जाणार आहे. यासह भारतातील चित्त्यांची एकूण संख्या ४६ होईल, असे अधिकाऱ्यांनी सोमवारी सांगितले.

बोत्सवाना येथून येणाऱ्या चित्त्यांमध्ये सहा मादी आणि दोन नर चित्त्यांचा समावेश आहे. ते भारतीय वायुदलाच्या विमानाने ग्वाल्हेरला पोहोचतील आणि त्यानंतर २८ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेनऊ वाजता हेलिकॉप्टरने कुनो अभयारण्यात जातील, अशी माहिती मध्यप्रदेशचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) शुभरंजन सेन यांनी वृत्तसंस्थेला सांगितले.

नामिबिया आणि दक्षिण आफ्रिकेतून यापूर्वी आणलेल्या चित्त्यांनंतर, आफ्रिकेतून येणारी ही चित्त्यांची तिसरी खेप राहील. कुनोत बंदिस्त परिसर तयार करण्यात आला आहे. तिथे येणारे नवीन चित्ते जवळपास एक महिना विलगीकरणात राहतील. त्यांच्या सुरक्षित लॅण्डिंगसाठी पाच हेलिपॅड बांधण्यात आले आहेत आणि वायुदलाने याची हेलिकॉप्टरने चाचणी घेतली आहे.

भारतात जवळपास सात दशकांपूर्वी चित्ता नामशेष झाला होता. सप्टेंबर २०२२ मध्ये नामिबियातून पहिल्यांदा आठ चित्ते आणले. त्यानंतर फेब्रुवारी २०२३ मध्ये दक्षिण आफ्रिकेतून १२ चित्ते आणले गेले. मागील वर्षी भारतात १२ शावकांचा जन्म झाला होता. परंतु, सहा शावक जगू शकले नाहीत. या वर्षी ७ ते १८ फेब्रुवारीदरम्यान आठ बछडे जन्माला आले. (वृत्तसंस्था)

#### संख्या ५० वर नेण्याचे उद्दिष्ट

**आणखी चित्त्यांच्या आगमनामुळे देशातील चित्त्यांच्या पुनरुज्जीवन कार्यक्रमाला बळकटी मिळेल. केंद्र सरकारच्या सहकार्यासह चित्त्यांची संख्या ५० वर नेण्याचे उद्दिष्ट आम्ही ठेवले आहे, असे चित्ता प्रकल्पाचे क्षेत्र संचालक उत्तम शर्मा यांनी सांगितले.**

# वानखेडेवर कॅरेबियन वादळ!

### वेस्ट इंडिजचा झिम्बॉब्वेवर १०७ धावांनी दणदणीत विजय

### षटकारांचा पाऊस; दोन्ही संघानी मिळून लगावले ३१ षटकार

**मुंबई** : आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ च्या सुपर-८ फेरीत वेस्ट इंडिजने आपला दबदबा निर्माण केला आहे. सोमवारी मुंबईतील ऐतिहासिक वानखेडे स्टेडियमवर झालेल्या चौथ्या सामन्यात वेस्ट इंडिजने झिम्बॉब्वेचा १०७ धावांच्या मोठ्या फरकाने पराभव केला. शिमरॉन हेटमायर आणि रोव्हमन पॉवेल यांच्या तुफानी फटकेबाजीच्या जोरावर वेस्ट इंडिजने स्पर्धेतील सर्वोच्च धावसंख्या उभारली. झिम्बॉब्वेने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, जो त्यांच्या अंगाशी आला. वेस्ट इंडिजच्या फलंदाजांनी सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेतला. २५५ धावांच्या विशाल लक्षाचा पाठलाग करताना झिम्बॉब्वेची सुरुवात अत्यंत खराब झाली. वेस्ट इंडिजच्या अचूक गोलंदाजीसमोर झिम्बॉब्वेचा कोणताही फलंदाज टिकू शकला नाही. या विजयासह वेस्ट इंडिजने उपांत्य फेरीच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले आहे. वेस्ट इंडिजची २५४ ही धावसंख्या या विश्वचषकातील आतापर्यंतची सर्वोच्च टीम स्कोअर ठरली आहे. या विजयामुळे वेस्ट इंडिजने सुपर-८ च्या गुणतालिकेत आपले स्थान मजबूत केले असून त्यांचा नेट रनरेटही सुधारला आहे.




**हेटमायर**
धावा : ८५
चेंडू : ३४
चौकार : ०७
षटकार : ०७

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# अवकाळी पावसाचा शेतकऱ्यांना दणका

## द्राक्षे, गहू, ज्वारी, हरभरा, कांदा पिके जमीनदोस्त

### रब्बी हंगामातील पिकांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.२३ फेब्रुवारी-**

सोमवारी दुपारी मंद्रूप व भंडारकवठे परीसरात झालेल्या अवकाळी पावसामुळे रब्बी हंगामातील गहू, ज्वारी, हरभरा व कांदा यांच्यासह द्राक्षे पिकांचे मोठ्या प्रमणात नुकसान झाले. यामुळे शेतकरी चिंतेत सापडला आहे

हवामान विभागाने आठ दिवसपूर्वीच २३ फेब्रुवारी दरम्यान अवकाळी पावसाचा अंदाज व्यक्त केला होता. त्यानुसार शुक्रवार २० फेब्रुवारी पासून ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. त्यानुसार सोमवारी दुपारी ४ च्या सुमारास अचानक अवकाळी पावसाला सुरुवात झाले. यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांवर संकट कोसळला आहे. तर गहू, ज्वारी व हरभरा पिके जमीनदोस्त झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. तर अवकाळी पावसामुळे द्राक्षे पिकावर परीणाम झाले असून



शेतकरी आर्थिक विवंचनेत दिसून येत आहे. यामुळे गहू व ज्वारी पिकांच्या उत्पादनावर परीणाम झाले आहे. त्यामुळे सरकारने नुकसानग्रस्त शेतकर्यांना भरपाई देण्यात यावे, अशी शेतकर्यांकडून मागणी होत आहे.

**दहा एकरवरील ज्वारी जमीनदोस्त**

सोमवारी दुपारी झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतातील दहा एकर ज्वारी जमीनदोस्त झाली. तर पाच एकरवरील गहू पिकावरही परीणाम झाले आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकर्यांना त्वरीत नुकसानभरपाई द्यावे.

**- योगिनाथ तोडकरी, शेतकरी, मंद्रुप**

**द्राक्षे पिकावर परीणाम**

सध्या द्राक्षे पिक काढणीला आली आहेत. चार एकरमधील द्राक्षेवर पावसाचे थेंब पडल्याने द्राक्षगळती होणार आहे. तसेच द्राक्षे कुजल्याने बागेत दुर्गंधी पसरणार आहे. वर्षभर सांभाळलेल्या द्राक्षेवर अवकाळी पाऊस पडल्याने वर्षभराचे उत्पन्न मिळणे मुश्किल बनले आहे.

**- जावीद शेख, द्राक्ष उत्पादक शेतकरी, मंद्रूप**

# प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी विकास भांगे यांना आरोग्यरत्न पुरस्कार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था, डॉक्टर, पत्रकार व आरोग्य कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यासाठी मुंबई येथे आयोजित वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार आणि महाआरोग्य सन्मान २०२६ वितरण सोहळा यशवंतराव चव्हाण केंद्र येथे पार पडला. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या हस्ते प्राथमिक आरोग्य केंद्र कोंडी येथील प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी विकास भांगे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. आरोग्यरत्न पुरस्कारांतर्गत २३ मान्यवरांना प्रत्येकी एक लाख रुपये, प्रशस्तीपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच राज्यातील विविध स्तरांवर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या १७४ डॉक्टर, अधिकारी व कर्मचाऱ्यांना महाआरोग्य सन्मान २०२६ देण्यात आला. प्राथमिक आरोग्य केंद्रांपासून जिल्हा रुग्णालयांपर्यंत सेवा देणारे वैद्यकीय अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, आरोग्य अधिकारी, आशा स्वयंसेविका आदींचा यामध्ये समावेश होता.


## महत्वाचे...



### ईच्छा भगवंताची परिवाराच्यावतीने नूतन जि.प. सदस्या संस्कृती सातपुते यांचा सत्कार

**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील दहीगाव जिल्हा परिषद सदस्यपदी माजी आमदार राम सातपुते यांच्या पत्नी संस्कृती राम सातपुते यांची निवड झाल्याबद्दल माळशिरस येथील श्री राम निवास येथे 'ईच्छा भगवंताची मित्रपरिवार'च्या वतीने त्यांचा उत्स्फूर्त सत्कार करण्यात आला. विजयाबद्दल आनंद व्यक्त करत कार्यकर्त्यांनी त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २२ चे भाजप नगरसेवक किसन जाधव, युवा नेते चेतन नागेश गायकवाड, उमेश जाधव, शरदराव शिंदे, माणिक कांबळे, यल्लप्पा शहापूरे उपस्थित होते. सर्वांनी पुष्पगुच्छ देत आणि घोषणाबाजी करत विजयाचा आनंद साजरा केला. यावेळी माजी आमदार राम सातपुते यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. किसन जाधव यांच्या हस्ते त्यांना टोपी, शाल आणि पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.



### प्रभाग ५ बाळे हद्दवाढ, पुना नाका नाला भागात ड्रेनेज लाईन कामाचा शुभारंभ

**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

प्रभाग ५ बाळे हद्दवाढ परिसरातील महाराष्ट्र शासन जिल्हास्तर नगरोत्थान योजना अंतर्गत वारद फार्म -ग्रीन्स अपार्टमेंट - पुना नाका नाला भागात ड्रेनेज लाईन टाकणे कामाचा शुभारंभ करण्यात आला.महाराष्ट्र शासनाच्या जिल्हास्तर नगरोथान योजने अंतर्गत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आमदार विजय कुमार देशमुख यांच्या माध्यमातून माजी गटनेते आनंद चंदनशिवे यांनी सोलापूर शहरातील हद्दवाढ भागासह इतर ठिकाणी ड्रेनेज टाकण्याकरिता शासनाकडे निधी उपलब्ध करण्याची मागणी केली होती त्यानुसार सन २०२०-२४ च्या अंदाजपत्रकामध्ये ३६३ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला होता. या अनुषंगाने बाळे परिसरातील वारद फार्म व ग्रीन अपार्टमेंट या भागातील नागरिकांनी या भागात ड्रेनेज लाईन व सांडपाणी मोठ्या प्रमाणात रस्त्यावर वाहत असल्याने परिसरात दुर्गंधी व रोगराई पसरत होती. यानुसार माजी गटनेते आनंद चंदनशिवे यांनी प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे, कृषिमंत्री यांच्या मार्गदर्शना नुसार संबंधित विभागास वारद फार्म ते ग्रीन्स अपार्टमेंट ते नाला परिसर या भागातील अडचण दूर करण्याबाबत पाठपुरावा केला.



### महापालिकेच्या वतीने थोर संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी

**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने थोर संत गाडगेबाबा यांच्या जयंती निमित्त कौन्सिल हॉल येथील महापौर यांच्या कार्यालयात थोर संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सभागृह नेते नरेंद्र काळे, नगरसेवक विनोद भोसले, नगरसेवक ज्ञानेश्वर म्याकल, नगरसेवक प्रशांत पल्ली,नगरसेवक सात्विक बडवे, नगरसेविका कल्पना कदम,नगरसेविका राजश्री दोडमणी, नगरसेविका सारिका खजुरे, नागेश खरात, अनिल कंदलगी, राहुल काटकर, अजय सोनटक्के, सुभाष गायकवाड, सचिन मस्के, अंकुश ननवरे,विजय वाघमारे,खंडू सोनटक्के, सागर गवळी, दत्तात्रय दळवी, महादेव काटकर उपस्थित होते.



### मौलाना अबुल कलाम आझाद यांना अभिवादन

**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

नवी पेठ येथील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासनधिकारी मल्हारी माने यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे पर्यवेक्षक संतोष बुलबुले, सुरेश कासार, महेश वालावलकर, महादेव वाघुले, नईम मुच्छाले, कदिर शेख आदी उपस्थित होते.

# कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याचे पोलीस अधीक्षकांचे निर्देश

### शांतता कमिटीची घेतली बैठक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी -**

बार्शी शहरातील तणावाच्या पार्श्वभुमीवर पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी शांतता कमिटीची बैठक घेऊन हिंदू-मुस्लीम समाजातील प्रतिनिधींशी संवाद साधत कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याचे निर्देश दिले.

२२ फेब्रुवारी रोजी बार्शी शहरात एकमिनार मस्जीदजवळ बारंगुळे प्लॉट येथे शिवजयंतीनिमित्त चालू असलेल्या कार्यक्रमाचे ठिकाणी फटाके फोडण्याच्या कारणावरून दोन समाजात वाद निर्माण झाला होता. पोलीसांनी तात्काळ दोन्ही समाजातील लोकांना शांत करुन आपसात गुन्हे दाखल केले. हिंदू-मुस्लीम समाजामध्ये निर्माण



झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर बार्शी शहर पोलीस ठाणे येथे शांतता व कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलण्यात आली. पोलीस अधीक्षक कुलकर्णी यांनी स्वतः बार्शीत त्यांनी दोन्ही समाजातील मान्यवर, धर्मगुरू, सामाजिक कार्यकर्ते व प्रतिष्ठित नागरिक यांच्यासोबत शांतता समितीची बैठक घेतली. सर्वांना संयम राखण्याचे, अफवांवर विश्वास न ठेवण्याचे तसेच सोशल मिडीयावर आक्षेपार्ह संदेश प्रसारित करू नयेत, असे स्पष्ट निर्देश दिले. कायदा व सुव्यवस्था भंग करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. नागरिकांनी कोणतीही अफवा अथवा संशयास्पद बाब त्वरित पोलिसांना कळवावी, असे आवाहन केले.

यावेळी अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर तसेच संजय जगताप, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, सोलापुर ग्रामीण तसेच बार्शी शहर पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक, बालाजी कुकडे हे उपस्थित होते.

# शिक्षणाधिकारी जगताप यांनी दिला स्कॉलर मुलाला सुखद धक्का; परीक्षेच्या आदल्या दिवशीच मिळाली एन्ट्री

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

सोमवार दिनांक २३ फेब्रुवारी रोजी स्कॉलरशिप परीक्षा आणि रविवारी एका स्कॉलर मुलाला समजते आपला फॉर्मच भरला गेलेला नाही. त्या स्कॉलर मुलासह शिक्षक टेन्शनमध्ये असताना सहज चाचपणी म्हणून त्यांनी शिक्षण अधिकाऱ्यांना फोन केला अन माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी प्रयत्न करून त्या स्कॉलर मुलाला परीक्षेसाठी एन्ट्री मिळवून दिली आहे.



संदेश महादेव कापसे या स्कॉलर विद्यार्थ्यांच्या बाबतीत रविवारी हा किस्सा घडला. स्कॉलरशिप परीक्षेच्या तयारीसाठी तो कोल्हापूरला होता, गावातीलच शाळेत शिक्षण घेत असल्यामुळे परीक्षेसाठी तो गावी दाखल झाला. त्याला आई नाही व वडील कामानिमित्त बाहेर असतात. तरीही शिकून मोठे होण्यासाठी शिक्षकांच्या सहकार्याने त्याचा प्रामाणिक प्रयत्न सुरू होता. उद्याच्या परीक्षेसाठी एक दिवस आधी तो गावी आल्यानंतर त्याला आपल्या परीक्षेचा फॉर्मच भरला नाही असे समजले. त्यामुळे तो निराश होऊन एका कोपऱ्यात जाऊन बसला.

त्याच्या शिक्षकांना हा सर्व विषय समजल्यानंतर काही प्रयत्न करता येतील का म्हणून तालुक्याच्या वरिष्ठ अधिकारी यांना संपर्क साधून विचार ना करण्यात आली. त्यावर त्यांनी ९९.९९% नाही असे उत्तर दिले. त्याचबरोबर शिक्षणाधिकारी जगताप यांना फोन करा तेच काही मार्ग काढतील असा सल्लाही दिला.शेवटचा प्रयत्न म्हणून त्या शिक्षकानी शिक्षणाधिकारी जगताप यांना फोन लावला व सर्व प्रकार सांगितला, शिक्षणाधिकारी जगताप यांनी शांतपणे त्यांचे बोलणे ऐकून घेतले. मी पुण्याला फोन लावून विचारतो, जर होत असेल तर तुम्हाला ८ वाजता फोन करतो. आनंदाची गोष्ट म्हणजे खरंच बरोबर ८ वाजता शिक्षणाधिकारी जगताप यांचा त्यांना फोन गेला. त्यांनी सांगितले की सुपर लेट फीने फॉर्म भरून घ्या आणि उद्या त्याला परीक्षेसाठी पाठवा व माझ्या शुभेच्छा सांगा. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून एका प्रामाणिक, गरजवंत विद्यार्थ्यांला न्याय मिळवून दिल्याबद्दल त्या शिक्षकांनी शिक्षणाधिकारी जगताप यांचे आभार मानले. शिक्षण विभागात घडलेल्या या आकस्मित घटनेने इतर शिक्षकांनाही असे होऊ शकते असा विश्वास निर्माण झाला आहे.

### दारातून दुचाकी का काढलास म्हणत मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

राहत्या घराजवळ आमच्या दारातून आमची दुचाकी का काढलास असे म्हणून आठ जणांनी मिळून लाथा एका युवकास मारहाण करण्यात आली. या हकीकत अशी की, रुपेश संजय बाबरे वय २०, रा. बुधवार पेठ सोलापूर याला राहत्या घराजवळ आमच्या दारातून आमची दुचाकी का काढलास असे म्हणून विश्वास तळभंडारे व इतर सात जणांनी मिळून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. त्यात त्याला डोक्यास, चेहऱ्यास व सर्वांगास मुकामार लागल्याने उपचारासाठी शासकीय रुग्णालय येथे तो स्वतः दाखल झाला अशी नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे.

# होळीनिमित्त विशेष रेल्वे गाड्या



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी रेल्वे एसएमव्हीटी बेंगळुरू-बीदर आणि बेंगळुरू कॅन्टोन्मेंट-कलबुरगि विशेष गाड्यांच्या सेवा सुरू ठेवणार आहे.

एसएमव्हीटी बेंगळुरू-बीदर द्वि-साप्ताहिकविशेषगाड्यांच्या१८ फेऱ्या होतील.यामध्ये एसएमव्हीटी बेंगळुरू - बिदर द्वि-साप्ताहिक विशेष २७.०२.२०२६ पर्यंत धावण्यासाठी सूचित केले होती, आता ती दर शुक्रवार आणि रविवारी २९.०३.२०२६ पर्यंत धावणार आहे. बीदर - एसएम व्हीटी बेंगळुरू द्वि-साप्ताहिक विशेष २८.०२.२०२६ पर्यंत धावण्यास सूचित केली होती, आता ती दर शनिवार आणि सोमवारी ३०.०३.२०२६ पर्यंत धावणार आहे. बेंगळुरू कॅन्टोन्मेंट - कलबुरगि विशेष २८.०२.२०२६ पर्यंत धावण्यास सूचित केली होती, आता दर शनिवारी २८.०३.२०२६ पर्यंत धावणार आहे. कलबुरगि - बेंगळुरू कॅन्टोन्मेंट विशेष ०१.०३.२०२६ पर्यंत धावण्यास सूचित केली होती, आता दर रविवारी २९.०३.२०२६ पर्यंत धावणार आहे. या गाड्यांच्या फेऱ्या ८ असतील तर गाड्यांच्या रचनेत आणि थांब्यात कोणताही बदल होणार नाही.

# मोहोळ पुतळा प्रकरणी अज्ञातांविरूध्द गुन्हा दाखल

### राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्याने केली तक्रार

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२३ फेब्रुवारी-**

मोहोळमध्ये छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा अनाधिकृतपणे व कोणतीही परवानगी न घेता बसविणा-या अज्ञात लोकांच्या विरुध्द मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




मोहोळ पोलीस ठाण्यातून मिळालेल्या माहितीनुसार याची फिर्याद भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्याने दिली आहे. त्यानुसार २३ फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल केला. दि. २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.१५ वाजण्यापूर्वी काही अज्ञात इसमांनी राष्ट्रीय महामार्ग क्र. ९६५ चा टप्पा क्र. १ मोहोळ-वाखरीच्या उजव्या बाजुच्या जागेत हा पुतळा मोहोळ एस.टी. स्टॅन्डजवळ उभारल्याचे दिसले. शासनाची कोणतीही परवानगी न घेता अनाधिकृतपणे एका लोखंडी स्टॅन्डवर छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा बसविला असल्याचे दिसून आले. मात्र सदरची जागा ही राष्ट्रीय महामार्गची असल्याने मोहोळ पोलीस स्टेशन येथे अज्ञात लोकांचे विरुध्द सोमवारी भारतीय राजमार्ग प्राधिकरणाचे उपप्रबंधक मुकेश सिंह यांच्या फिर्यादी नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर, पोलीस निरीक्षक बाजीराव पोवार यांच्या मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक किरण पाटील करीत आहेत. या घटनेनंतर सध्या मोहोळ शहर व परिसरात शांतता आहे.

# त्याग, पराक्रम आणि सेवा समाज घडणीसाठी आवश्यक

### डॉ. अनघा लवळेकर; 'नारी तू नारायणी' परिषदेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. २३ फेब्रुवारी-**

त्याग, पराक्रम आणि सेवा समाजघडणीसाठी आवश्यक आहे. महिलांमध्ये ऋजुता असते. त्यामुळे सेवेची प्रेरणा मुळातच त्यांच्या अंगी असते. संकल्प, सहृदयता, समय आणि सातत्य यांच्या आधारे स्त्रियांनी अनेक क्षेत्र पादाक्रांत केली आहेत. समाजाच्या उत्थानासाठी पंचपरिवर्तानातील सर्व क्षेत्रात सेवा आवश्यक आहे आपण कृतीतून सर्वत्र पोहोचुया असा संदेश डॉ. अनघा लवळेकर यांनी दिला.

राष्ट्र सेविका समिती आणि ज्ञानभारती यांच्या वतीने 'नारी तू नारायणी' परिषदेचे आयोजन कर्वेनगर येथील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या के. बी. जोशी सभागृहात समारोप सत्रात त्या बोलत होत्या. जिजामाता स्मारक समिती आणि बाया कर्वे स्त्री अभ्यास आणि संशोधन केंद्र या परिषदेचे सह आयोजक होते. यावेळी राष्ट्र सेविका समितीच्या प्रांत कार्यवाहिका शैलजा देशपांडे, जिजामाता



स्मारक समितीच्या अध्यक्ष आशा साने, कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या युनिट हेड स्वाती रानडे, ज्ञान भारतीच्या प्रांत समन्वयक सुनिता पेंढारकर उपस्थित होत्या.

'नारी तू नारायणी' या विषयावर डेक्कन कॉलेजच्या डॉ. प्रज्ञा कुलकर्णी यांचे बीजभाषण झाले. सात हजार वर्षे मागे जाऊन पाहिले तर वेदकाळापासून आपण स्त्री -पुरुष एक सारखे नाहीत पण समान आहोत हाच धागा सापडतो. वेदकालीन सर्व पातळीवरील महिलांना समान स्थान होते. त्या यज्ञ करत, सारथ्य करत,निर्णय घेत आणि त्याकाळी महिलांचे पुनर्विवाह झालेले सुद्धा आढळतात,असे त्यांनी सांगितले. यावेळी 'कृती ते कर्तृत्व' या सत्रात दोन महिला संशोधकांच्या मुलाखती घेण्यात आल्या. यामध्ये 'पोर्टेबल बायो-टॉयलेट'च्या संशोधक डॉ. आरती शास्त्री यांनी स्वच्छ भारत,पोर्टेबल बायो-टॉयलेटची गरज ओळखून समाजाच्या सेवेसाठी अर्पण केलेल्या उपक्रमाची सविस्तर माहिती दिली. प्रत्येक घरात, सोसायटीत अशा उपकरणांची गरजही त्यांनी अधोरेखित केली. तर येणाऱ्या संकटांवर मात करत स्वतःचे आणि समाजाचे संरक्षण करण्यासाठी 'फ्लड फोरकास्ट मॉडेल'वर काम करणाऱ्या डॉ. प्रज्ञा दीक्षित यांनी विविध उदाहरणे देत ए आय च्या मदतीने उभारलेल्या विविध मॉडेलची माहिती यावेळी दिली. वैष्णवी सहस्रबुद्धे यांनी सूत्रसंचालन केले, स्वाती जोशी यांनी आभार मानले. प्राची पाठक यांनी म्हणलेल्या संपूर्ण वंदेमातरम्ने परिषदेचा समारोप झाला.

# अंडाशयास रबर अडकवून 'कुत्र्या'चा जीव धोक्यात

### ॲनिमल राहतच्या तत्परतेमुळे वाचले प्राण

**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी**

गंगामाई हॉस्पिटल परिसरात नर कुत्र्याच्या टेस्टिकलला (अंडाशय) अज्ञात व्यक्तीने रबर अडकविल्याची माहिती प्राणिमित्र सुरेश कांबळे यांनी निमल राहतच्या आपत्कालीन क्रमांकावर दिली. याचे गांभीर्य ओळखून डॉ. स्नेहा सुरवसे यांनी तात्काळ कार्यवाही सुरू केली. डॉ. सुरवसे यांनी ही माहिती अजित मोटे यांना देत त्वरित घटनास्थळी पोहोचण्याच्या सूचना



दिल्या. अवघ्या पंधरा मिनिटांत पथक घटनास्थळी दाखल झाले. सदर कुत्र्याची पाहणी केल्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्याला भुलीचे इंजेक्शन देण्यात आले. भूल दिल्यानंतर टेस्टिकलला घट्ट अडकलेले रबर अत्यंत काळजीपूर्वक काढण्यात आले.

मुक्या प्राण्याबाबतीत घडलेली घटना अत्यंत वेदनादायक आणि संतापजनक आहे. मुक्या प्राण्यांवर अशा प्रकारचे अमानुष कृत्य करणे हे मानवतेला काळिमा फासणारे आहे. सुदैवाने निमल राहतच्या टीमने तात्काळ प्रतिसाद दिल्यामुळे शॉनचे प्राण वाचले. सर्व नागरिकांना विनंती करतो की, अशा घटना दिसल्यास त्वरित माहिती द्यावी आणि प्राण्यांप्रती संवेदनशीलता ठेवावी. मुक्या जीवांचे रक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. **- पप्पू जमादार, प्राणीमित्र**



महाराष्ट्राला एका धडाकेबाज नेतृत्वाला मुकावे लागले. मी फार सामान्य कार्यकर्ता आहे. माझे शेणाचे हात पेनाला लावणारा माणूस म्हणजे अजितदादा होय. मला कोणताही राजकीय वारसा नसताना त्यांनी मला सामान्य व्यक्तीपासून आमदार केले.
**-अमोल मिटकरी**, आमदार


तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
मंगळवार, २४ फेब्रुवारी २०२६ ३


आपण म्हणतो, मराठी बोला, मराठीसाठी आग्रह धरतो, पण, दुसरीकडे पुरस्कार सोहळ्यांना इतर सिनेसृष्टीतील अमराठी कलाकारांना आमंत्रित करून पहिल्या रांगेत स्थान देतात. ज्या ज्येष्ठ मराठी कलाकारांनी ३०-४० वर्ष काम केले त्यांना मागच्या रांगेत स्थान दिले जाते.
**-सई ताम्हणकर**, अभिनेत्री



# मेक्सिकोत मादकपदार्थ तस्कर अल मेंचोचा खात्मा

**लष्कराची कारवाई**



**१३६ कोटींचे होते बक्षीस**

**संतापलेल्या समर्थकांची हिंसक निदर्शने**

**विमानतळावर तोडफोड**

**वाहने पेटवली**



अल मेंचोच्या मृत्यूनंतर त्याच्या समर्थकांनी तोडफोड करीत वाहनेही जाळली

◆ **मेक्सिको सिटी, २३ फेब्रुवारी**
मेक्सिकन सैन्याने रविवारी एका ऑपरेशनमध्ये देशातील सर्वात मोठ्या ड्रग कार्टेलच्या नेत्याला ठार केले. नेमेसियो रुबन ओसेगुएरा सर्व्हेंटेस उर्फ अल मेंचो जलिस्को न्यू जनरेशन कार्टेलचा नेता होता आणि जगातील सर्वाधिक वॉन्टेड गुन्हेगारांपैकी एक होता.

जालिस्कोमध्ये सैन्याच्या कारवाईदरम्यान तो जखमी झाला. त्याला हवाई रुग्णवाहिकेने मेक्सिको सिटीला नेत असताना वाटेत त्याचा मृत्यू झाला, अशी माहिती संरक्षण मंत्रालयाने दिली.

त्याच्या मृत्यूनंतर जालिस्कोसह अनेक राज्यांमध्ये अल मेंचोच्या समर्थकांनी हिंसक निदर्शने केली. अनेक ठिकाणी वाहनांची जाळपोळ आणि महामार्ग रोखण्याच्या घटना समोर आल्या. ग्वाडलाहारा आणि प्युर्टो वालार्टा येथून धूर आणि गोंधळाचे व्हिडीओ व्हायरल झाले आहेत.

मेक्सिकोतील सर्वात कुख्यात गुन्हेगारी गट सिनालोआ कार्टेलइतकेच या कार्टेलला शक्तिशाली मानले जात. अमेरिकेच्या ५० राज्यांमध्ये त्याची व्याप्ती पसरली आहे. अमेरिकन सरकारने अल मेंचोवर १३६ कोटी रुपयांचे बक्षीस ठेवले होते. लोक भीतीने विमानतळाकडे धावत होते. एअर कॅनडाने प्युर्टो वालार्टासाठीची विमानांची उड्डाणे रद्द केली आहेत आणि ग्राहकांना त्यांच्या विमानतळावर न जाण्याचा सल्ला दिला आहे.

यूएस स्टेट डिपार्टमेंटने अल मेंचोच्या अटकेत मदत करणाऱ्यास किंवा माहिती देणाऱ्याला १५ दशलक्ष डॉलर्सपर्यंतचे (१३६ कोटी रुपये) बक्षीस जाहीर केले होते. मेक्सिकोमधील सर्वात शक्तिशाली आणि वेगाने वाढणाऱ्या गुन्हेगारी संघटनांपैकी एक जलिस्को न्यू जनरेशन कार्टेल आहे. हे कार्टेल २००९ मध्ये तयार झाले होते. याच वर्षी फेब्रुवारीमध्ये ट्रम्प प्रशासनाने या कार्टेलला परदेशी दहशतवादी संघटना म्हणून घोषित केले.

मेक्सिको जगातील सर्वात मोठ्या मादकपदार्थ तस्करी नेटवर्कचा गड मानला जातो. येथून कोकेन, हेरोईन, मेथ आणि फेंटेनाईल यासारखे अत्यंत धोकादायक मादकपदार्थ अमेरिकेपर्यंत पोहोचतात. अमेरिकेत मादकपदार्थांचा सर्वात मोठा पुरवठा मेक्सिकन कार्टेल्सद्वारे होतो, असे अमेरिका तपास यंत्रणांचे म्हणणे आहे. (वृत्तसंस्था)

### न्यू जनरेशन कार्टेलकडे मशीनगन अन् टँकही

मेक्सिकोमधील सर्वात मोठ्या सिनालोआ कार्टेलकडे ६०० पेक्षा जास्त विमाने आणि हेलिकॉप्टर आहेत. ही संख्या मेक्सिकोमधील सर्वात मोठी एअरलाईन एयरो मेक्सिकोपेक्षा पाचपट जास्त आहे. कार्टेल्स आता ड्रोन आणि चिलखती वाहनांवर अधिक लक्ष केंद्रित करीत आहेत. जलिस्को न्यू जनरेशन कार्टेलकडे मशीन गन, रणगाडे आणि बॉडी आर्मरने सुसज्ज गट आहेत. एकूणच, कार्टेल्सच्या भाडोत्री सैनिकांची संख्या २०२२-२०२३ मध्ये १६०,००० ते १८५,००० इतकी होती.

### मेक्सिकोमध्ये सर्वाधिक कमाई ड्रग्ज कार्टेल्सची

मेक्सिको सरकार कार्टेलकडून जप्त केलेली शस्त्रे नष्ट करते. यांचा पुन्हा वापर केला जात नाही. कार्टेल ही शस्त्रे अमेरिकन माफियांकडून मादकपदार्थांच्या पुरवठ्याच्या बदल्यात मिळवतात. गेल्या पाच वर्षात कार्टेलने रॉकेट लाँचर्सही मिळवले आहेत. यांचा वापर सरकारी टेहळणी विमानांवर हल्ला करण्यासाठी केला जातो. मेक्सिकोमध्ये सर्वाधिक कमाई ड्रग कार्टेल्सची असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## लाल किल्ला-दिल्ली विधानसभा बॉम्बने उडवण्याची धमकी

◆ **नवी दल्ली, २३ फेब्रुवारी**
लाल किल्ला आणि दिल्ली विधानसभा बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारा मेल सोमवारी दिल्ली पोलिसांना मिळाला. धमकीचा हा मेल एका खलिस्तानी संघटनेच्या नावाने पाठवण्यात आला आहे.

मेल मिळाल्यानंतर सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. धमकी मिळाल्यानंतर तातडीने दिल्ली विधानसभेचा परिसर रिकामा करून संपूर्ण परिसरात शोधमोहीम सुरू करण्यात आली. बॉम्बनाशक पथक आणि इतर सुरक्षा यंत्रणांनी संपूर्ण परिसराची तपासणी केल्यानंतर त्यांना कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही.

तपासणीदरम्यान दिल्ली पोलिसांना कोणतीही संशयास्पद वस्तू मिळाली नसली, तरी सुरक्षिततेची उपाययोजना म्हणून आवश्यक ती पावले उचलली जात आहेत. धमकीचा हा मेल कोणी आणि कुठून पाठवला याचा तपास केला जात आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन सायबर सेलने मेल प्रकरणाचा तपास हाती घेतला आहे. परिस्थितीवर करडी नजर असल्याचे सुरक्षा यंत्रणांनी सांगितले.

**आपच्या माजी आमदारालाही धमकी**

आम आदमी पार्टीचे नेते आणि माजी आमदार दिलीप पांडे यांनाही हत्येची धमकी देण्यात आली. धमकीचा मेल त्यांच्या वैयक्तिक मेलवर आला. दिलीप पांडे यांनी याबाबतची माहिती 'एक्स'वर पोस्ट करीत तसेच दिल्ली पोलिसांकडे तक्रार दाखल केली. (वृत्तसंस्था)

# भारतीय नागरिकांना इराण सोडण्याचे आवाहन

**● अमेरिका हल्ला करण्याची शक्यता ● तेहरानमध्ये पुन्हा निदर्शने सुरू**



◆ **नवी दिल्ली, २३ फेब्रुवारी**
वाढत्या सुरक्षा परिस्थितीच्या पृष्ठभूमीवर भारताने सोमवारी इराणमध्ये राहणाऱ्या आपल्या सर्व नागरिकांना व्यावसायिक विमानांसह सर्व उपलब्ध वाहतुकीच्या मार्गांनी देश सोडण्याचा सल्ला दिला.

तेहरानमध्ये नव्याने सुरू झालेल्या निदर्शनांच्या आणि अमेरिकी हल्ल्याच्या वाढत्या भीतीच्या पृष्ठभूमीवर इराणमधील भारतीय दूतावासाने भारतीय नागरिकांना एक नवीन सूचना जारी केली आहे. मागील महिन्यात तेहरानने निदर्शकांवर केलेल्या क्रूर कारवाईनंतर इराणमधील अनेक विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांनी सरकारविरोधात निदर्शने केली.

जानेवारीत अधिकृत अंदाजानुसार, विद्यार्थ्यांसह १० हजारांपेक्षा जास्त भारतीयांचे इराणमध्ये वास्तव्य आहे. भारत सरकारने ५ जानेवारी रोजी जारी केलेल्या सल्ल्यानुसार आणि इराणमधील बदलती परिस्थिती लक्षात घेता, सध्या इराणमध्ये असलेल्या भारतीय नागरिकांना व्यावसायिक विमानांसह उपलब्ध वाहतुकीच्या मार्गांनी इराण सोडण्याचा सल्ला देण्यात येत आहे, असे दूतावासाने म्हटले आहे.

सर्व भारतीय नागरिक आणि पीआयओ (भारतीय वंशाच्या व्यक्ती) यांनी योग्य ती काळजी घ्यावी, निदर्शने किंवा निदर्शने होणारी ठिकाणे टाळावीत आणि भारतीय दूतावासाच्या संपर्कात राहावे, असे दूतावासाने सांगितले.

दरम्यान, इराणने आमच्या अटी मान्य केल्यास हल्ला केला जाऊ शकतो, असा इशारा अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी तीन दिवसांपूर्वीच दिला आहे. एकीकडे चर्चेची तयारी सुरू असताना दुसरीकडे अमेरिकेने युद्धसज्जताही सुरू ठेवली आहे. खाडी देशांमध्ये सैन्य उपस्थिती वाढविली असून युद्धसामानही मोठ्या प्रमाणात जमविले आहे.

गेल्या महिन्यात इराणध्ये झालेल्या निदर्शनांदरम्यान इराणी सुरक्षाबलाने कडक कारवाई करताना हजारो नागरिकांचे बळी घेतले आहेत. याचा निषेध अजूनही सुरूच असून दोन दिवसांपासून राजधानी तेहरान आणि अन्य शहरांमध्ये नागरिक सरकारविरोधा रस्त्यावर उतरले आहेत. (वृत्तसंस्था)

### २६ फेब्रुवारीला जीनेव्हात चर्चा

अमेरिका आणि इराण यांच्यात २६ फेब्रुवारीला जीनेव्हा येथे आण्विक मुद्यावर चर्चा होणार आहे. दोन्ही देशांमध्ये मध्यस्थाची भूमिका पार पाडणाऱ्या ओमानने ही माहिती दिली आहे. अमेरिकेसोबत चर्चा होण्यापूर्वी ओमान आणि इराण यांनी प्राथमिक बोलणी यापूर्वीही केली आहे, अशी माहिती ओमानचे परराष्ट्रमंत्री बद्र अल-बुशैदी यांनी दिली आहे.

### अमेरिकेच्या हालचालींवर आमचे लक्ष

खाडी क्षेत्रात शांतता प्रस्थापित व्हावी, यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. जीनेव्हा येथे होणारी चर्चा सकारात्मक होईल, अशी आम्हाला आशा आहे. असे असले तरी देशहिताला बाधा पोहचेल, असा करार आम्ही स्वीकारणार नाही. कराराची व्यवहार्यता तपासल्या जाईल. खाडी क्षेत्रात अमेरिकेच्या ज्या हालचाली सुरू आहेत, त्यावर आमचे बारीक लक्ष आहे, अशी प्रतिक्रिया इराणचे राष्ट्रपती मसूद पेजेशकियान यांनी दिली आहे.

# बर्फवृष्टीदरम्यान जवानांनी वाचविले ४६ पर्यटकांचे प्राण

◆ **कोलकाता, २३ फेब्रुवारी**
सिक्कीमच्या पूर्व जिल्ह्यातील उंच भागात मुसळधार बर्फवृष्टीमुळे अडकलेल्या ४६ पर्यटकांना भारतीय लष्कराच्या जवानांनी वाचवले असल्याचे संरक्षण निवेदनात सोमवारी म्हटले आहे.

रविवारी पूर्व सिक्कीम जिल्ह्यात अचानक तापमानात शून्याखाली आल्याने तीव्र बर्फवृष्टी झाली. यामुळे रस्त्यांवर अनेक पर्यटक वाहने अडकली. पर्यटक आणि स्थानिकांना या खराब हवामानाचा सामना करावा लागला. परिस्थिती कळताच, लष्कराच्या जवानांनी तातडीने बाधित भागात धाव घेऊन बचाव आणि मदत उपाययोजना सुरू केल्या. एकूण ४६ पर्यटकांना वाचवून जवळच्या लष्करी छावणीत हलवण्यात आले. तिथे त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आणि आवश्यक मदत साहित्य पुरवण्यात आले.

पुढील हालचालीपूर्वी सुटका केलेल्या सर्व व्यक्ती स्थिर आहेत आणि त्यांची पुरेशी काळजी घेण्यात आली आहे याची खात्री घटनास्थळी असलेल्या वैद्यकीय पथकांनी केली. लष्कराने १५० हून अधिक पर्यटक वाहनांना सुरक्षित ठिकाणी सुरक्षित आणि सुव्यवस्थितपणे नेण्याची सुविधा देखील दिली, असेही त्यात म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# पोटगी नाकारणे मानसिक क्रौर्यच

**राजस्थान हायकोर्टाची टिप्पणी; घटस्फोट मंजूर**

◆ **जयपूर, २३ फेब्रुवारी**
पत्नीचा पूर्णपणे त्याग करणे, न्यायालयीन निर्देशांचे जाणीवपूर्वक उल्लंघन करणे आणि वारंवार सांगूनही पोटगी न देणे हे मानसिक क्रौर्य आहे. अशा परिस्थितीत पत्नीने पतीसोबत राहण्याची अपेक्षा करणे अयोग्य आहे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत राजस्थान उच्च न्यायालयाने जोडप्याचा घटस्फोट मंजूर केला.

कौटुंबिक न्यायालयाने क्रौर्याच्या आधारावर दाखल केलेली घटस्फोटाची याचिका फेटाळली होती. या निर्णयाला पत्नीने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. न्या. अरुण मोंगा आणि न्या. योगेंद्र कुमार पुरोहित यांच्या खंडपीठाने सुनावणीवेळी म्हटले की, पतीने आपल्या वैवाहिक आणि कायदेशीर जबाबदाऱ्यांपासून जाणीवपूर्वक पळ काढल्यास, त्याला कायदेशीर प्रक्रियेत बाजू मांडण्याचा किंवा प्रकरणाला विरोध करण्याचा अधिकार उरत नाही.

पोटगीच्या प्रकरणांत वसुली वॉरंट निघूनही पती न्यायालयात हजर झाला नाही. गेल्या तीन वर्षांपासून त्याने कोणतीही पोटगी दिलेली नाही. कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत सुरू असलेल्या कारवाईतही २०२२ पासून तो अनुपस्थित राहिल्याने न्यायालयाला एकतर्फी निकाल देण्याचा निर्णय घ्यावा लागला. (वृत्तसंस्था)

### ...हा तर जाणीवपूर्वक केलेला छळ

पतीने कोणत्याही भीतीशिवाय आपल्या वैवाहिक आणि वैधानिक जबाबदाऱ्या पार पाडण्यास वारंवार नकार दिला आहे. यामुळे तक्रारदार महिलेला सततचा छळ, मानहानी आणि आर्थिक टंचाईचा सामना करावा लागला. पतीच्या या कृती केवळ चुका नसून, तो जाणीवपूर्वक केलेला छळ आहे. कौटुंबिक न्यायालयाने प्रत्येक घटनेकडे स्वतंत्रपणे पाहिले, जे चुकीचे होते. मानसिक क्रौर्याचा विचार करताना सर्व परिस्थितीचा एकत्रितपणे विचार करणे आवश्यक असल्याचे खंडपीठाने आदेशात म्हटले.



गुजरातमधील राजकोट शहरात अजी नदीचा किनारा आणि जंगलेश्वर परिसरातील टीपी रोडवर असलेली अवैध घरे आणि अन्य बांधकाम पाडण्याचे काम महानगरपालिकेने सुरू केले आहे

# मादकपदार्थ जप्त करून चौघांना अटक

◆ **इटानगर, २३ फेब्रुवारी**
अरुणाचल प्रदेशमध्ये मादकपदार्थ जप्त केल्यानंतर एका हवालदारासह चार जणांना अटक करण्यात आली असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. रविवारी बांदेरदेवा येथे दोन जणांच्या ताब्यातून ५० हजार रुपयांपेक्षा जास्त किमतीचे हेरॉइन जप्त करण्यात आले.

या प्रकरणी दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुप्त माहितीवरून कारवाई करताना, पोलिस पथकाने रविवारी पश्चिम सियांग जिल्ह्यातील आलो येथील हेड कॉन्स्टेबल रोनाल लेया यांच्या निवासस्थानी छापा टाकला आणि सुमारे १२ हजार रुपये किमतीचा ६.४४ ग्रॅम गांजा जप्त केला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. हवालदाराला अटक करण्यात आली आहे आणि एनडीपीएस कायद्यांतर्गत तपास सुरू आहे. पश्चिम सियांग जिल्ह्यात ७७ हजार रुपये किमतीचे १२.२६ ग्रॅम हेरॉइन जप्त केले. (वृत्तसंस्था)

## युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्याला अटक

◆ **नवी दिल्ली, २३ फेब्रुवारी**
मागील आठवड्यात एआय समिटमध्ये अर्धनग्न आंदोलन प्रकरणी दिल्ली पोलिसांनी युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्याला ग्वाल्हेरमधून अटक केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली.

जितेंद्र यादव असे या आरोपीचे नाव असून, त्याला मध्यप्रदेशातील ग्वाल्हेर येथून अटक करण्यात आली. यासह या प्रकरणात अटक झालेल्यांची संख्या पाच झाली असल्याचे पोलिसांनी सांगितले. भारत मंडपम् येथे शुक्रवारी झालेल्या एआय इम्पॅक्ट समिटदरम्यान भारतीय युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांच्या गटाने अर्धनग्न निदर्शने केली. सरकार आणि भारत-अमेरिका व्यापार कराराच्या विरोधात घोषणा लिहिलेले टी-शर्ट हातात घेऊन ते फिरत होते. परंतु, कार्यक्रमस्थळी उपस्थित असलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्यांना तेथून पळवून लावले.

निदर्शने झाली, त्या दिवशीच दिल्ली पोलिसांनी युवक काँग्रेसच्या चार कार्यकर्त्यांना अटक केली. या प्रकरणातील व्यापक कट रचण्याचा दृष्टिकोन तपासाधीन आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. या मुद्यावरून राजकीय वाद निर्माण झाला. (वृत्तसंस्था)

# नासाने जारी केली 'आयरिश नेब्युलाची' प्रतिमा

**● अद्वितीय रंगामुळे आहे विशेष महत्त्व ● ताऱ्याच्या परावर्तित प्रकाशातून चमकतात**

◆ **वॉशिंग्टन, २३ फेब्रुवारी**
अंतराळात फिकट निळ्या आणि गुलाबी रंगाच्या फुलासारखा दिसणारा आणि चमकणारा ढग शास्त्रज्ञ तसेच आकाश निरीक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे. 'आयरिस नेब्युला' त्याच्या अद्वितीय रंगांमुळे शास्त्रज्ञांसाठी विशेष महत्त्वाचा आहे. या ढगाला 'कॅल्डवेल ४' असे म्हणतात. याला 'आयरिस नेब्युला' किंवा 'एनजीसी ७०२३' असेही म्हणतात. हे ढग खास आहे कारण ते स्वतःचा प्रकाश तयार करत नाही तर जवळच्या ताऱ्याचा प्रकाश परावर्तित करून चमकते, असे वृत्त नासाने दिले आहे.

रात्रीच्या आकाशात दिसणारे बहुतेक तेजोमेघ हे 'उत्सर्जन तेजोमेघ' असतात. हे धूळ आणि वायूचे विशाल ढग आहेत. ते



त्यांच्या अति उष्णतेमुळे स्वतःचा प्रकाश निर्माण करतात. याउलट, 'कॅल्डवेल ४' हा एक परावर्तित तेजोमेघ आहे, म्हणजेच त्याचा रंग त्याच्या केंद्रस्थानी असलेल्या ताऱ्याच्या विखुरलेल्या प्रकाशामुळे तयार होतो. हा तारा सेफियस नक्षत्रातील दाट ताऱ्यांमध्ये स्थित आहे. 'आयरिस नेब्युला' पृथ्वीपासून अंदाजे १,४०० प्रकाशवर्षे अंतरावर आहे आणि त्याचा तेजस्वी वायू अंदाजे सहा प्रकाशवर्षे पसरलेला आहे. १८ ऑक्टोबर १७९४ रोजी जर्मन-ब्रिटिश खगोलशास्त्रज्ञ विल्यम हर्शेल यांनी 'आयरिस नेब्युला'चा शोध लावला. त्यांनी युरेनस ग्रहाचाही शोध लावला आणि १८१६ मध्ये त्यांना सन्मानित करण्यात आले. या 'नेब्युला'चे परिमाण ७ अशी नोंदवले गेले.

'कॅल्डवेल ४' हे उत्तर खगोलीय ध्रुव आणि ध्रुव तारा पोलारिस जवळ स्थित आहे. यामुळे, दक्षिण गोलार्धातून ते पाहणे जवळजवळ अशक्य आहे. उत्तर गोलार्धात शरद ऋतूच्या सुरुवातीला ते दुर्बिणीने उत्तम प्रकारे पाहिले जाऊ शकते. ते शोधण्यासाठी, 'सेफियस' नक्षत्रातील दोन तेजस्वी तारे मार्गदर्शक म्हणून वापरले जा तात. हा तेजोमेघ मंद आणि पसरलेला असल्याने, शहराच्या प्रकाशापासून दूर असलेले स्वच्छ, गडद आकाश पाहण्यासाठी आदर्श आहे. (वृत्तसंस्था)

### हबल निअर इन्फारेड कॅमेऱ्याचा वापर

**खगोलशास्त्रज्ञांनी 'कॅल्डवेल ४'मध्ये असलेल्या रासायनिक घटकांची ओळख पटविण्यासाठी 'हबल'चा 'निअर इन्फ्रारेड कॅमेरा' आणि 'मल्टी-ऑब्जेक्ट स्पेक्ट्रोमीटर', याला 'निकमॉस' म्हणून ओळखले जाते. याचा वापर करण्यात आला आहे.**

## चित्रपट वार्ता

### विजय-रश्मिकाने केले लग्नावर शिक्कामोर्तब

**चेन्नई** : साऊथचा सुपरस्टार विजय देवरकोंडा आणि अभिनेत्री रश्मिका मंदाना यांच्या लग्नाच्या चर्चा अनेक दिवसांपासून रंगल्या होत्या. आता या जोडप्याने समाज माध्यमावर पोस्ट शेअर करत लग्नाच्या वृत्तावर शिक्कामोर्तब केले आहे. इतकेच नाही तर, रश्मिका आणि विजयने या पोस्टमध्ये त्यांच्या लग्नाला 'द वेडिंग ऑफ विरोश' असे नाव दिले आहे. हे नाव निवडण्यामागे कोणताही वेडिंग प्लॅनर किंवा कौटुंबिक परंपरा नसून, हे नाव त्यांच्या चाहत्यांनी अनेक वर्षांपूर्वी प्रेमाने दिले होते. हे नाव हळूहळू प्रेम आणि भावनेचे प्रतीक बनले आणि आता त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठ्या क्षणाची ती ओळख झाले आहे.



### अरिजीतने गायले आमिरसाठी गाणे

**मुंबई** : बॉलिवूड गायक अरिजित सिंगने मागच्या महिन्यात कोणतेही नवीन पार्श्वगायन प्रकल्प हाती घेणार नसल्याची घोषणा केली होती. मात्र संगीताची आवड असल्यामुळे ते पूर्णपणे सोडून देणार नाही. गायकाच्या निवृत्तीच्या घोषणेनंतर सुपरस्टार आमिर खानने त्याच्या घरी भेट दिली. आमिर त्याचा मुलगा जुनैदच्या 'एक दिन' या नवीन चित्रपटाचे शीर्षकगीत घेण्यासाठी अरिजीतकडे गेला होता. या बैठकीचा एक व्हिडीओ समोर आला आहे. यामध्ये अरिजीतने गायलेले शीर्षकगीत ऐकू येते. व्हिडिआमध्ये आमिर त्याला बॉलिवूड गाणी गाणे थांबवणार आहे का, असे विचारतो. अरिजीत काहीच उत्तर देत नाही. तथापि, आमिर त्याला सांगतो की जर गायकाने गाणे थांबवले तर त्या सर्वांचे मोठे नुकसान होईल. सर्वजण हसतात.



### 'बाफ्टा' महोत्सवात मणिपुरी चित्रपटाचा डंका




**मुंबई** : 'बूंग' या मणिपुरी चित्रपटाने २०२६ च्या बाफ्टा (ब्रिटिश अकादमी ऑफ फिल्म अँड टेलिव्हिजन आर्ट्स) पुरस्कारांमध्ये इतिहास रचला. सर्वोत्कृष्ट बाल आणि कौटुंबिक चित्रपट श्रेणी जिंकणारा हा पहिला भारतीय चित्रपट ठरला. लक्ष्मीप्रिया देवी दिग्दर्शित या मणिपुरी चित्रपटाच्या निर्मात्यांपैकी फरहान अख्तर एक आहेत. पॅडिंग्टन बेअरने मंचावर पुरस्कार प्रदान केला. बाफ्टा पुरस्कारांमध्ये 'बूंग'चा विजय भारतीय चित्रपटांसाठी, विशेषतः ईशान्येकडील चित्रपटांसाठी एक मोठी कामगिरी आहे. दिग्दर्शक लक्ष्मीप्रिया देवी, फरहान अख्तर आणि शिवनी दांडेकर हे देखील पुरस्कार सोहळ्याला उपस्थित होते. पुरस्कार जिंकल्यानंतर लक्ष्मीप्रियाने ज्युरी सदस्यांचे आणि बाफ्टाचे आभार मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# जगण्याचे मरणमार्ग

गरज आणि हव्यास ही मानवी स्वभावाची दोन टोके जेव्हा एकमेकांशी तीव्र संघर्ष करू लागतात तेव्हा संस्कार, संस्कृती, माणुसकी, परंपरा आदी शब्द लाजेने तोंड लपवितात. 'हे जीवन सुंदर आहे' वगैरे विचार म्हणजे भरल्या पोटीच्या केवळ कविकल्पना वाटू लागतात. गरजेपोटी नाडलेल्यांचे जगणे आणि हव्यासापोटी गरजवंतांना नागविणाऱ्यांचे जगणे यांमधील संघर्ष हाच जगाचा खरा व्यवहारवाद वाटू लागतो. खरे पाहता, माणुसकी हा माणसाचा जन्मजात स्वभावधर्म मानला जातो. तो काही मनावर घडविण्याचा संस्कार नव्हे. माणुसकी ही माणसाची मक्तेदारी मानली जाते. अन्य प्राण्यांतही विवेकबुद्धी असते. त्यानुसार ते जेव्हा वागतात, तेव्हा त्यांच्यातील माणुसकीचे दर्शन घडल्यास ते आश्चर्य मानले जाते. माणसाने माणुसकीने वागणे हा माणसाचा स्वभावधर्म मानला जात असल्याने त्याच्या विपरीत वागणाऱ्या माणसाचे वागणे मात्र 'पाशवी' म्हटले जाते. पण व्यवहारवाद वाढत चालला आणि माणसाच्या अंगीचे माणुसकीचे मूळ गुण दुर्मिळ होत चालले. तसे काही दर्शन माणसाच्या अंगी एखाद्या प्रसंगी घडलेच, तर ते आश्चर्य मानले जाऊ लागले आणि माणुसकीच्या वागण्याच्या बातम्या होऊ लागल्या. साधारणतः जेव्हा एखादी नैसर्गिक गोष्ट सहजपणे घडून जाते तेव्हा ती बातमी नसते. विशिष्ट हंगामात झाडांना येणारा मोहोर, फुलांनी बहरणाऱ्या वेली, कोकिळेचे कूजन या बाबी नैसर्गिक असल्याने झाडे मोहरली, वेली बहरल्या किंवा कोकिळांच्या सुरांनी रानावनांवर संगीताचा साज चढला तर त्यामुळे मनाला आनंद होत असला, तरी तसे घडणे अपेक्षितच असल्याने त्याचे काही वेगळेपण वाटत नाही. उलट, त्या त्या हंगामात तसे घडले नाही तर मात्र त्याचे आश्चर्य वाटून त्याची बातमी होते. माणुसकी हा नैसर्गिक स्वभाव मानला जात असल्याने माणुसकीशून्य व्यवहारांचे आश्चर्य व्यक्त व्हायला हवे. प्रत्यक्षात व्यवहारवाद, चंगळवाद आणि आटत चाललेली माणुसकी यांमुळे माणसाच्या मनामध्ये होणारे बदल एवढे सहज वाटू लागले आहेत की, त्यातून घडणाऱ्या माणुसकीशून्य व्यवहारांचाच सर्वत्र सुळसुळाट सुरू झाल्याने माणुसकी आश्चर्याची बाब ठरू लागली असून पाशवी व्यवहारांच्या बातम्यांनी माणुसकीचे अस्तित्व संकटात आणले आहे.

जन्माला आल्यानंतर नैसर्गिकपणे मृत्यू येईपर्यंत जगणे हा माणसाचाच नव्हे, तर कोणत्याही सजीवाचा जन्मसिद्ध हक्क मानला जातो. नैसर्गिकपणे जगण्याच्या या हक्काची जपणूक व्हायला हवी, असे तीव्रतेने वाटण्याजोगे काही अस्वस्थ प्रकार अलिकडे बेसुमारपणे वाढत आहेत. महाराष्ट्रात स्त्री बीजांड विक्री नावाचे एक भयंकर प्रकरण समोर येत आहे. हा विषय नैतिक, कायदेशीर आणि सामाजिकदृष्ट्या संवेदनशील असल्याने त्याची गांभीर्याने चर्चा व्हावयास हवी. हे प्रकरण थेट माणुसकीलाच आव्हान देणारे ठरले आहे. विज्ञानाच्या प्रगतीने वंध्यत्वावर मात करण्यासाठीचे मार्ग शोधले असले, तरी त्याचा व्यापार सुरू होतो तेव्हा विज्ञान हा माणुसकीला काळिमा लावणारा प्रकार ठरू शकतो. विज्ञानाचे रूपांतर जेव्हा व्यवहारवादी व्यवसायात होते, तेव्हा अनेक प्रश्न उभे राहतात. महाराष्ट्रातील काही महानगरांत आणि त्यांच्या आसपास फोफावणाऱ्या शहरांत एका व्यावसायिक तंत्रज्ञानाची मोठी उलाढाल होत असते. 'एआरटी' म्हणजे, 'असिस्टेड रीप्रॉडक्टिव टेक्नॉलॉजी' असे या तंत्रज्ञानाचे नाव आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करून वंध्यत्वावर मात करता येते आणि पालकत्वाच्या आस लागलेल्यांना अपत्यप्राप्तीचा मार्गदेखील या तंत्रज्ञानातून सुलभतेने मिळवून दिला जातो. कदाचित यामुळेच आर्थिक शोषणाचा नवा धंदा सुरू झाला असून अनेकदा जगण्याच्या संघर्षात मेटाकुटास आलेल्या व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील महिलांना पैशांचे आमिष दाखवून बीजांडदानासाठी प्रवृत्त केले जाते, असे उघडकीस आले आहे. या क्षेत्रातील दलालांची साखळी अशा गरजवंत महिलांच्या शोधात सक्रिय असते. ते अशा महिलांचा शोध घेतात आणि त्यांना पैशांचे आमिष दाखवून बीजांड विक्रीस प्रवृत्त करतात, असा हा धंदा सध्या फोफावला असून त्याची पाळेमुळे वेगवेगळ्या ठिकाणी खोलवर रुजलेली असावीत, अशी शंका व्यक्त होत आहे. ठाणे जिल्ह्यातील बदलापूर नावाचे शहर गेल्या काही वर्षांत अनेक प्रकरणांमुळे वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. या शहरातच गेल्या काही दिवसांत या धंद्याचे बीभत्स रूप समोर येत असून बीजांड विक्रीच्या व्यवसायात गरजू महिलांना गुंतविले जात असल्याचे काही प्रकार उघडकीस आले आहेत. धंदेवाईक आणि दलालांचे एक व्यापक जाळे या धंद्यात मुरले असल्याचे काही महिलांवर झालेल्या कारवाईतून समोर येत आहे आणि सुमारे २० महिला या जाळ्यात गुरफटून बीजांड विक्रीसाठीच्या आमिषाला बळी पडल्याचा संशय व्यक्त होत आहे. केवळ २०-२५ हजारांच्या मोबदल्यात स्त्री बीजांडे खरेदी करून अपत्यहिनांकरिता मुलांचे उत्पादन करून देणारे कारखाने म्हणून अशा पीडित महिलांचे आयुष्य वेठीस धरले जात असल्याची विषण्ण जाणीव करून देणाऱ्या या प्रकारामुळे माणुसकीच्या कल्पनेस मोठा धक्का बसला आहे. भारतीय समाजात स्त्रीदेह आणि मातृत्व या संकल्पना अत्यंत पवित्र मानल्या जातात. बीजांड विक्रीच्या या अनैतिक धंद्यामुळे या संकल्पनांच्या पावित्र्यालाच मोठा धक्का पोहोचला असून संस्कार, संस्कृती, परंपरांना खुंटीवर टांगणाऱ्या धंदेवाईकपणापुढे माणुसकीने मान टाकली आहे. बीजांडाची विक्री हा जीवनाच्या मूलभूत अंशाचा व्यापार असल्याने नैतिकदृष्ट्या हा धंदा गुन्हेगारी स्वरूपाचाच ठरतो. त्यामुळे अशा गैरप्रकारास आळा घालण्याकरिता कठोर उपाययोजना आणि गुन्हेगारांवर कठोर कारवाई ही आजच्या महाराष्ट्राची सर्वात प्राधान्याची गरज ठरली पाहिजे. कारण बीजांड विकणारी स्त्री आणि अपत्यास जन्म देणारी माता यांच्यातील संघर्षात आता परंपरा जपली जाणार की व्यावसायिकता प्रभावी ठरणार, हा मुद्दा ऐरणीवर आला आहे. सुमारे चार वर्षांपूर्वी २०२२ मध्ये तामिळनाडूतील इरोडमध्ये एका जन्मदात्रीने आपल्या १६ वर्षांच्या मुलीच्या वयाचे बनावट दाखले तयार करून आठ वेळा तिच्या बीजांडाची विक्री केल्याचे धक्कादायक प्रकरण उघडकीस आल्यानंतर देश हादरला होता. या प्रकरणानंतर तामिळनाडूतील चार इस्पितळांना टाळे ठोकण्यात आले आणि गुन्हेगारांवर कायदेशीर कारवाई झाली. त्यानंतर आता महाराष्ट्रात हाच प्रकार उघडकीस येत असल्याने अशा धंद्याचे एखादे आंतरराज्य किंवा आंतरराष्ट्रीय जाळे आहे का, ते कोठपर्यंत पसरलेले आहे, याचा तातडीने तपास व्हायला हवा. कारण मानवी देहाचा व्यापार मांडणारा हा प्रकार एखाद्या संघटित गुन्हेगारीचा आणि आंतरराष्ट्रीय टोळ्यांच्या कॉर्पोरेट गुन्हेगारी सिंडिकेटसारखा असल्याचा संशय व्यक्त होत आहे. सोयीच्या जागा हेरून हा धंदा केला जात असून विदेशी ग्राहकांसाठी भारतीय बीजांडांची बाजारपेठ असे याचे स्वरूप नाही ना, याचाही तपास व्हावयास हवा. अलिकडे समाजमाध्यमे, डार्क वेब नावाचे आभासी तंत्रज्ञान विकसित झाल्यापासून अशा धंद्याचे जाळे पसरविणे सहज शक्य होत असल्याने या माध्यमांवरही लक्ष ठेवावयास हवे. केवळ बीजांड विक्रीच नव्हे, तर गरजवंतांच्या मूत्रपिंडांचा व्यापारदेखील चिंताजनक स्वरूप धारण करीत असल्याचे घडकीस येत आहे. गरजवंत, कर्जबाजारी शेतकरी आर्थिक आव्हानांपुढे गुडघे टेकून आपल्या गरजा भागविण्यासाठी किडनी विक्री करीत असल्याच्या बातम्या समाजाच्या परंपरा, संस्कृती, माणुसकी आदी संस्कारांना वाकुल्या दाखवत आहेत. ऊस तोडणी कामगार महिलांवर रोजगार बुडू नये म्हणून गर्भाशये काढून टाकण्याची वेळ येते, गरजवंत महिलांवर पैशांसाठी बीजांडे विकण्याची वेळ येते, गरजू, कर्जबाजारी शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून मार्ग काढण्यासाठी किडनी विकावी लागते, तेव्हा हे प्रकार केवळ आर्थिक गरजांवरील उत्तरे शोधणारे राहात नाहीत तर संस्कृती, परंपरा आणि माणुसकीच्या मूल्यांना आव्हाने देणारे ठरतात. मूल्ये, परंपरा आणि संस्कृतीचा ऱ्हास होत असतानाच्या काळाची संधी साधून धंदेवाईकपणापुढे मानवतेलाच नमविणाऱ्या या प्रकारांची पाळेमुळे कायमची खणून काढावयास हवीत. अन्यथा माणसाच्या मूलभूत स्वभाव धर्माचे अस्तित्वच संपुष्टात येईल.

## आंतरराष्ट्रीय

### प्रा. जयसिंग यादव

# झाकोळला गेलेला महत्त्वाचा दौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या आठवड्यात केलेला मलेशिया दौरा हा जगातील आणि भारतातील महत्त्वाच्या घडामोडींमुळे काहीसा दुर्लक्षित राहिला असला, तरी त्याची दखल घेणे आवश्यक आहे. मलेशिया हे दक्षिण आशियातील छोटे राष्ट्र असले, तरी मोदी यांनी त्यांच्या गेल्या एका तपातील पंतप्रधानपदाच्या काळात मलेशियाला तिसऱ्यांदा भेट दिली. यावरून या देशाचे भू-राजकीय महत्त्व लक्षात यायला हरकत नाही. मोदी यांच्या भेटीमुळे केवळ प्राचीन संस्कृती आणि सांस्कृतिक संबंधच पुनरुज्जीवित झाले नाहीत, तर संरक्षण आणि डिजिटल पेमेंट क्षेत्रातही भारताचे महत्त्व स्थापित झाले. पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांनी केलेले मोदी यांचे भव्य स्वागत हे भारताच्या वाढत्या जागतिक सामर्थ्याचे प्रतीक आहे. मोदी यांच्या दौऱ्यातील सर्वात मोठी बातमी म्हणजे भारताची डिजिटल पेमेंट प्रणाली आता मलेशियामध्येही कार्यरत होईल. भारताच्या 'नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया' (एनपीसीआय) ची आंतरराष्ट्रीय शाखा 'एनआयपीएल' आणि मलेशियाच्या 'पेनेट' यांच्यात एक ऐतिहासिक करार झाला आहे. मोदी यांनी स्वतः ही घोषणा केली. आता भारतीय पर्यटक आणि व्यावसायिक मलेशियामध्ये डिजिटल व्यवहार सहज करू शकतील. हे भारताच्या 'फिनटेक' कौशल्याचे प्रमाणपत्र आहे.

मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांनी राजशिष्टाचार मोडून मोदी यांचे स्वतः विमानतळावर जाऊन स्वागत केले. दोन नेत्यांमधील ही 'केमिस्ट्री' जगाने पाहिली. दोन्ही नेत्यांनी 'सलामत दातांग' (स्वागत आहे, मोदीजी) कार्यक्रमात भाग घेतला. यावेळी १२ हजारांहून अधिक मलेशियन आणि अनिवासी भारतीयांच्या गर्दीने 'मोदी, मोदी!' असा जयघोष केला. सांस्कृतिक आघाडीवरही इतिहास रचला गेला. ८०० मलेशियन नर्तकांनी एकाच व्यासपीठावर भारतीय शास्त्रीय आणि लोकनृत्य सादर केले. या उल्लेखनीय कामगिरीची नोंद 'मलेशियन बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये झाली. भारतीय संस्कृती तिथे किती खोलवर रुजली आहे, हे यावरून दिसून येते. ऑगस्ट २०२४ मध्ये दोन्ही देशांनी त्यांचे संबंध व्यापक धोरणात्मक भागीदारीत वाढविल्यानंतर मोदी यांचा आग्नेय आशियाई देशाचा हा पहिलाच दौरा होता. यापूर्वी नोव्हेंबर २०१५ आणि २०१८ मध्ये त्यांनी मलेशियाला भेट दिली होती. मलेशिया हा सेमीकंडक्टरच्या सर्वात मोठ्या निर्यातदारांपैकी एक आहे. तो जागतिक स्तरावर सहाव्या क्रमांकावर आहे. मलेशियाच्या सरकारी आकडेवारीनुसार, हे क्षेत्र जीडीपीमध्ये सुमारे २५ टक्के योगदान देते. भारत सेमीकंडक्टरच्या बाबतीत चीन, तैवानवर अवलंबून आहे. भारत सेमीकंडक्टर उत्पादनाला प्रोत्साहन देत असला, तरी ते स्थिर व्हायला वेळ लागणार आहे. अशा वेळी मलेशियाशी झालेला करार अतिशय महत्त्वाचा आहे.



मलेशियाला या क्षेत्रामध्ये सुमारे ३० ते ४० वर्षांचा अनुभव आहे. दोन्ही देशांनी अक्षय ऊर्जा, सेमीकंडक्टर, आपत्ती व्यवस्थापन आणि शांतता प्रयत्नांसह ११ करारांवर स्वाक्षरी केली. मोदी यांनी मलेशियामध्ये नवीन भारतीय वाणिज्य दूतावास स्थापन करण्याची घोषणा केली. क्वालालम्पूरमधील मलाया विद्यापीठात एक समर्पित तिरुवल्लूवर केंद्र जाहीर करण्यात आले. मलेशियामध्ये भारतीय वंशाचे सुमारे २७ लाख ५० हजार लोक राहतात. मलेशियाच्या एकूण लोकसंख्येत हे प्रमाण नऊ टक्के आहे. त्यापैकी अंदाजे २० लाख लोक तमिळ भाषा बोलतात. मलेशिया आणि भारतामध्ये १९५७ पासून राजनैतिक संबंध आणि परस्पर भागीदारी आहे. ऑगस्ट २०२४ मध्ये ही भागीदारी व्यापक धोरणात्मक भागीदारी (सीएसपी) मध्ये परावर्तित करण्यात आली. मोदी यांच्या भेटीदरम्यान दोन्ही बाजूंनी व्यापार, संरक्षण, ऊर्जा आणि डिजिटल तंत्रज्ञानातील संबंध मजबूत करण्यावर लक्ष केंद्रित केले आणि वादग्रस्त मुद्यांवर सार्वजनिकरीत्या चर्चा न करण्याची काळजी घेतली. त्यामुळेच संयुक्त निवेदनात झाकीर नाईकच्या प्रत्यार्पणाबद्दल काहीही उल्लेख नाही. भारत आणि मलेशियाने दहशतवादविरोधी सहकार्य, गुप्तचर माहिती सामायिकरण आणि संयुक्त राष्ट्र संघ आणि वित्तीय कृती कार्य दलाशी या मुद्यावर समन्वय या मुद्यांवर चर्चा केली.

मोदी यांनी २०१४ मध्ये सत्ता स्वीकारल्यानंतर 'पूर्वेकडे पहा' धोरण सुरू केले. त्याचे चांगले परिणाम दिसून येत आहेत. भारत-मलेशियाच्या संयुक्त निवेदनात म्हटले आहे की, भारत आणि मलेशिया सीमापार दहशतवादाचा स्पष्टपणे निषेध करतात. त्यात सीमापार दहशतवादाचा समावेश आहे. हा पाकिस्तानला दिलेला झटका आहे. मलेशिया आणि भारताने २०१५, २०१७ आणि २०२४ मध्ये दहशतवादावर संयुक्त निवेदने जारी केली होती; परंतु पहिल्यांदाच सीमापार दहशतवादाचा उल्लेख करण्यात आला. हे भारताचे यश आहे. कारण भारतात दहशतवादी कृत्ये घडवण्यास पाकिस्तानमधून प्रोत्साहन दिले जाते. हे संयुक्त निवेदन पाकिस्तानसाठी चिंतेचे कारण असू शकते. मोदी यांची भेट आणि झालेले करार दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये विश्वास निर्माण करेल. महाथिर मोहम्मद यांच्या काळात भारत आणि मलेशियाचे संबंध बिघडले होते. आता ते सुधारत आहेत. महाथिर यांनी संयुक्त राष्ट्रांमध्ये काश्मीरचा मुद्दा उपस्थित केला होता. मलेशिया आणि भारत आसियान गटाचा भाग आहेत. 'आसियान फोरम'मध्ये भारताला मिळत असलेला पाठिंबा पाकिस्तानसाठी चिंतेचे कारण असू शकते. भारताने 'आसियान फोरम'मध्ये दहशतवादाचा अजेंडा आणल्याने पाकिस्तानला काळजी वाटणे स्वाभाविक आहे. कारण मलेशिया आणि भारत २०२७ पर्यंत आसियान दहशतवादावरील उपसमितीचे सह-अध्यक्ष आहेत. संयुक्त निवेदनात सीमापार दहशतवादाचा उल्लेख केल्याने पाकिस्तानच्या चालू कारवाया आसियान आणि इतर मंचांवर आणणे सोपे होईल.

भारत-मलेशिया संबंधांचा परिणाम पाकिस्तानवरही होऊ शकतो. मोदी यांचा दौरा पाकिस्तानचे नौदल प्रमुख ॲडमिरल नवीद अशरफ यांच्या भेटीच्या वेळीच झाला. त्यांनी 'रॉयल मलेशियन' नौदल प्रमुख झुल्हेल्मी बिन इंथानियन यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान प्रादेशिक सागरी सुरक्षा, संयुक्त सराव, माहितीची देवाणघेवाण, चाचेगिरी आणि दहशतवाद यासारख्या धोक्यांशी लढण्यावर चर्चा झाली. तथापि, अधिकृत निवेदनांमध्ये व्यावसायिक नौदल संबंध मजबूत करणे आणि परस्पर फायद्यासाठी सागरी सहकार्य वाढविणे यावर भर देण्यात आला. मलेशिया आणि पाकिस्तानमध्ये १९५७ पासून जवळचे राजनैतिक आणि संरक्षण संबंध आहेत. भूतकाळाच्या पलीकडे जाऊन मलेशिया आता भारताकडे पाहात आहे. याचे एक कारण म्हणजे चीन आणि अमेरिका यांच्यातील वाढता तणाव. पाकिस्तानशी दीर्घकालीन संबंध असले, तरी मलेशिया भारताशीही संबंध मजबूत करू इच्छित आहे. भारत आणि मलेशियामधील चर्चा संरक्षण आणि दहशतवादावर केंद्रित असताना व्यापार आणि उत्पादनाशी संबंधित क्षेत्रांवर चर्चा झाली. भारत मलेशियातून पाम तेल आणि इलेक्ट्रॉनिक्स उत्पादने आयात करतो. ॲल्युमिनियम आणि पेट्रोलियम उत्पादने निर्यात करतो. मलेशिया आणि भारताने सेमीकंडक्टरबाबत करार केला आहे. त्यात तांत्रिक सहकार्य समाविष्ट आहे. भारत या वर्षाच्या अखेरीस ब्रिक्स शिखर परिषदेचे अध्यक्षपद भूषवेल. संयुक्त निवेदनात भारताने मलेशियाच्या सदस्य होण्याच्या आकांक्षांचा फक्त उल्लेख केला. याचा अर्थ मलेशिया आता 'ब्रिक्स' परिषदेचा सदस्य होऊ शकतो. पाकिस्तान सध्या 'ब्रिक्स' परिषदेचा सदस्य नाही. तथापि, पाकिस्तानने २०२३ मध्ये या गटात सामील होण्यासाठी अधिकृत अर्ज केला आहे; भारताच्या मान्यतेशिवाय पाकिस्तानला सदस्यत्व मिळणे अवघड आहे. मलेशियासाठी दरवाजे उघडले जात आहे, ही एक व्यूहात्मक चाल आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

### नितीन शिरसाट

# कचरा संकलनात नागरिकांचा सहभाग

भारत सरकारने सुरू केलेल्या स्वच्छ भारत अभियान या व्यापक उपक्रमाने देशात स्वच्छतेबाबत नवे भान निर्माण केले. २ ऑक्टोबर २०१४ रोजी महात्मा गांधींच्या प्रेरणेने सुरू झालेला हा उपक्रम केवळ स्वच्छता नव्हे तर सामाजिक परिवर्तनाचा संदेश देतो. या अभियानाद्वारे लाखो स्वच्छतागृहे उभारण्यात आली, कचरा व्यवस्थापनाला चालना मिळाली आणि जनतेत स्वच्छतेबाबत जाणिवा जागृत झाल्या. महिलांच्या सुरक्षिततेसाठी, मुलांच्या शिक्षणासाठी आणि पर्यावरणाच्या दृष्टीने हे एक सकारात्मक पाऊल ठरले. मात्र, अंमलबजावणीत अडथळे आहेत. घराघरात कचरा वेगळा केला जात नाही. रस्त्यावर कचरा टाकणे थांबत नाही. माहिती असूनही नागरिक कृती करताना दिसत नाहीत. यातून एक गोष्ट स्पष्ट होते की, सरकारच्या योजना यशस्वी होण्यासाठी नागरिकांचा सहभाग अत्यावश्यक असतो. त्यामुळे शहरातील घनकचरा व्यवस्थापन यशस्वी करायचे असेल तर स्वच्छ भारत अभियानमधून मिळालेल्या अनुभवांचा अभ्यास करून त्यात आलेले अडथळे दूर करण्यासाठी सर्व स्तरांवर सकारात्मकरीत्या पुढील पावले उचलली पाहिजेत.काळानुरूप बदल घडविण्यासाठी शासनाने २०२५ साली घनकचरा व्यवस्थापनासाठी नव्या मसुदा नियमांची घोषणा केली. बुलढाणा जिल्ह्यातील शहरांच्या सीमारेषा झपाट्याने विस्तारत असताना घनकचऱ्याच्या वैज्ञानिक विल्हेवाटीचा प्रश्न अधिकच गंभीर बनत आहे. १० फेब्रुवारी रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत शहरी भागालगतच्या निमशहरी पट्ट्यातील कचरा व्यवस्थापनाचा मुद्दा केंद्रस्थानी आला. या विषयाकडे लक्ष वेधत संबंधित सदस्यांनी जिल्हास्तरीय समन्वित व दीर्घकालीन आराखडा तयार करण्याची गरज व्यक्त केली. शिंदेसेनेचे आ. संजय गायकवाड यांनी प्रकर्षाने या मुद्द्याला या बैठकीत हात घातला होता. जिल्ह्यातील नागरिक भागातील लोकसंख्या सध्या साडेसहा लाखांच्या घरात पोहोचली आहे. शहरांभोवती निमशहरी पट्टा वेगाने विकसित होत आहे; मात्र या भागात कचरा संकलन, वर्गीकरण व प्रक्रिया करण्यासाठी पुरेशा पायाभूत सुविधा उपलब्ध नाहीत. नीती आयोग तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने लहान व मध्यम शहरांसाठी विकेंद्रित कचरा प्रक्रिया प्रणाली, जैव विघटन प्रकल्प आणि कंपोस्ट निर्मिती केंद्रांची शिफारस केली आहे. सुरक्षित कचरा भराव जागा (सॅनिटरी लँडफिल) उभारणे आणि स्रोतस्थानी कचरा वर्गीकरण सक्तीचे करणे हे आवश्यक उपाय मानले जातात. सध्या निमशहरी पट्टा हा शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकार क्षेत्राबाहेर आणि ग्रामीण प्रशासनाच्या मर्यादित संसाधनांमध्ये अडकलेला आहे. पर्यावरणीय व सार्वजनिक आरोग्याच्या समस्या निर्माण होत आहेत. मुंबईत दररोज सुमारे सात हजार ते आठ हजार टन कचरा निर्माण होतो. पुणे, नाशिक, ठाणे, छत्रपती संभाजी नगर किंवा नागपूर यांसारख्या शहरांमध्ये ही संख्या लक्षणीय आहे. शहरांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था कचरा संकलन, वाहतूक आणि विल्हेवाट लावण्याचे काम करीत असल्या तरी अपुरी साधने, अपुरे मनुष्यबळ, नियोजनाचा अभाव यांमुळे ही व्यवस्था कोलमडते. प्रत्येकाच्या घरात इलेट्रॉनिक वस्तूंचा वापर प्रचंड वाढला आहे. परंतु या वस्तू खराब झाल्यावर त्यांचे काय करायचे, हा प्रश्न उत्पन्न होतो. याच समस्येवर मात करण्यासाठी पूर्णम इकोव्हिजन, पर्यावरण संरक्षण गतिविधी आणि परसिस्टंट फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'पहल २०२६' या भव्य ई-कचरा संकलन आणि जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. घरात वापरले जाणारे खराब मोबाईल, चार्जर, लॅपटॉप, टीव्ही, मिक्सर, जुन्या वायरी किंवा बॅटऱ्या यांसारख्या वस्तूंना फेकून देतात किंवा जाळतात. हा कचरा जाळल्यास त्यातून निघणारा धूर हवेत विषारी वायू सोडतो, ज्यामुळे श्वसनाचे विकार आणि कॅन्सरसारखे गंभीर आजार होऊ शकतात. हे अभियान केवळ साफसफाई नसून चक्रीय अर्थव्यवस्थेवर आधारित आहे. शहरातील सर्व शाळा, महाविद्यालये आणि कमर्शियल कॉम्प्लेक्स, दुकाने, कार्यालये, रहिवासी सोसायट्या आणि घराघरांतील संकलन संत गाडगेबाबा यांच्या स्वच्छतेच्या विचारांचा वारसा पुढे नेत या अभियानांतर्गत विशेष मोहीम राबविली जात आहे. नागरिकांनी ई-कचरा संकलनात स्वतः पुढाकार घेऊन पर्यावरणाच्या दृष्टीने सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे.



९८८१७१७८२८


## इतस्ततः

### दत्तात्रेय आंबुलकर

# अमेरिकन करावर करारी मात

अमेरिका-भारत दरम्यान नव्याने झालेल्या करकपातीच्या करारावर उभय देशांपेक्षा त्यांचे प्रमुख म्हणून डोनाल्ड ट्रम्प व नरेंद्र मोदी यांचे व्यक्तिमत्त्व व कर्तृत्व म्हणून प्रकर्षाने पाहिले गेले. त्यामुळे या आर्थिक मसुद्याला मुत्सद्देगिरीचा आयाम जागतिक स्तरावर मिळत गेला. अमेरिकन सिनेट असो वा भारतीय संसद, या उभय सभागृहांपासून जगात लोकशाही मानणाऱ्या या दोन्ही देशांमध्ये कर-आकारणी, वाढीव अतिरिक्त कर व शेवटच्या टप्प्यात अतिरिक्त कर-आकारणी प्रकरणी ट्रम्प यांनी आपल्या पुढाकारासह घेतलेली माघार घेतली. या साऱ्या प्रकरणातील आर्थिक व्यवहारांपेक्षा ट्रम्प यांच्या मनमानीवर मोदींच्या मुत्सद्देगिरीने मात केल्याचे उभ्या जगाने पाहिले. यानिमित्ताने अर्थशास्त्र आणि आर्थिक व्यवहार-उलाढाल, युद्धजन्य व आव्हानात्मक परिस्थितीत जागतिक पातळीवरील धोरणात्मक निर्णयांची परिणामकारकता आदी विविध प्रमुख मुद्यांवर जगाने ट्रम्प-मोदी या उभयतांना पाहिले, परखले हे यासंदर्भात उल्लेखनीय ठरले.

व्यवस्थापकीय क्षेत्रात मोठ्या जबाबदारीसह काम करणाऱ्या व्यक्तीमध्ये वक्तृत्व, नेतृत्व व कर्तृत्व हे गुण विशेषत्वाने महत्त्वाचे ठरतात. यासंदर्भात तुलनात्मक स्वरूपात सांगायचे म्हणजे, आंतरराष्ट्रीय संबंधांसंदर्भात असणारे रूढ व प्रस्थापित रूढी आणि संकेत, अमेरिका-भारत परस्पर संबंधांना असणारी दीर्घकालीन पृष्ठभूमी, आंतरराष्ट्रीय स्तरावर संबंधांमधील मैत्रीची महत्ता व मान्यता इ. सर्व संकेत डोनाल्ड ट्रम्प यांनी पायदळी तर तुडविलेच; त्याला जोड दिली ती अप्रासंगिक, बेताल वक्तव्ये आणि मनमानीपणाची! याउलट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वेळेत-वेळेनुसार व समयानुकूल-संयमित भूमिका घेत परिस्थिती हाताळली, हा फरक प्रामुख्याने लक्षात येतो. बदलती आंतरराष्ट्रीय परिस्थिती, अल्पकालीन; पण परिणामकारक छेडलेल्या युद्धात पाकिस्तानला दिलेला चाप, आंतरराष्ट्रीय स्तरावर आर्थिक-अस्थिरता व अनिश्चितता असताना पण देशात निर्माण केलेले सबळ अर्थकारण आदी संदर्भात घेतलेली ठोस भूमिका व सर्वात महत्त्वाचे म्हणजे, भारत आणि भारतीयांच्या आर्थिक प्रगतीबरोबर भारतातील शेती आणि शेतकरी, कृषी उत्पादन, मत्स्योत्पादन इ. संदर्भात कुठलीही तडजोड न करता, देशहिताला सर्वोपरी ठेवून घेतलेले निर्णय, याचीच परिणती ट्रम्प यांनी आपली मनमानी बोली, शैली व देहबोली सर्व बाजूला ठेवून पश्चातबुद्धीने का होईना; पण भारतावरील अतिरिक्त, अवास्तव आणि अवाजवी कर सपशेल मागे घेण्याचा निर्णय आणि करार करण्यात पुढाकार घेतला.



व्यवस्थापन आणि व्यवस्थापकांमध्ये विशेषतः उच्च व जबाबदारीच्या पदांवर काम करणाऱ्यांमध्ये वैचारिक ठामपणा, विलक्षण आकलनशक्ती, भावनांवर नियंत्रण ठेवणारी बुद्धिमत्ता, आव्हानात्मक परिस्थितीवर मात करण्यासाठी आवश्यक असणारी समतोलता, संपूर्ण आकलनासह निर्णयक्षमता, प्रसंगी विरोधाचा सामना करून आपले म्हणणे मांडून अपेक्षित यश गाठण्याची मानसिकता व प्रवृत्ती व या साऱ्यांचा परिस्थितीनुरूप ताळमेळ घालण्याचे कौशल्य आवश्यक ठरते.

व्यवस्थापन पद्धती आणि शैलीमध्ये कुठल्याही मोठ्या व महत्त्वाच्या व्यापार-व्यवसायविषयक करार-मदारात चर्चा, वाटाघाटी हे मुद्दे अपरिहार्यपणे महत्त्वाचे ठरतात. विशेषतः अशाप्रकारचे करार आंतरराष्ट्रीय पातळीवरील असल्यास त्याकडे अधिक गांभीर्याने पाहिले जाते. अशा करारांमध्ये विविध व विभिन्न देशांचे व्यापारी व सामरिक हित सामावले असते, हे यामागचे महत्त्वाचे कारण ठरते. अशा व्यापारी कराराच्या प्रक्रियेत उच्च पातळीवर व नेतृत्वासह चर्चा करणाऱ्या व्यक्तींकडे संवाद कौशल्यांच्या जोडीलाच उच्चस्तरावरील सातत्यपूर्ण एकाग्रता, लवचीकता, विवेकशीलता, सामंजस्य व त्याच वेळी ठामपणाची जोड, आपला मुद्दा मांडतानाच प्रसंगी पुढच्याची अडचण समजून घेणे, विविध पैलूंचा गांभीर्याने व साधक-बाधक पद्धतीने विचार करतानाच आपले 'स्व' आणि स्वहिताला बाधा पोहोचू नये अशी खबरदारी घेणे या बाबी महत्त्वाच्या ठरतात. वरील महत्त्वाच्या पृष्ठभूमीवर ट्रम्प-मोदी यांच्या दरम्यान झालेल्या चर्चा-बैठकी, संवाद-प्रतिवाद इ.चा ढोबळमानाने विचार केल्यास काय दिसते?

ट्रम्प यांनी अगदी सुरुवातीपासूनच भारताकडून होणाऱ्या निर्यातीवर अचानक व आकस्मिकपणे अतिरिक्त कर लावला. यासाठी उभ्या जगापुढे स्पष्ट केले की, मोदी सरकार युक्रेनपासून पाकिस्तानपर्यंतच्या विविध आंतरराष्ट्रीय मुद्यांवर डोनाल्ड ट्रम्प यांची 'री' ओढत नसल्याने असे मुद्दाम करण्यात येत असल्याचे उद्दामपणे जाहीर केले. याला प्रत्युत्तर-प्रतिसाद म्हणून मोदींनी कुठल्याही दबावाला बळी न पडण्याची आपली भूमिका जगजाहीर केली व त्यावर ते ठाम राहिले. व्यावसायिक-व्यवस्थापनात आपले मुद्दे ठामपणे मांडतानाच त्याला धीरोदात्तपणे व ठोस भूमिकेची जोड देणे फार महत्त्वाचे ठरते. त्यातून संबंधित नेतृत्वाचे विषयाशी निगडित धीरोदात्त गांभीर्य स्पष्ट होते व त्यातून वाटाघाटी-चर्चेची व्यावसायिक इतिश्री संबंधितांच्या फायद्यात होते, हे विसरून चालणार नाही. नरेंद्र मोदींमधील हे सारे गुण यादरम्यान प्रकर्षाने स्पष्ट झाले.

दरम्यान, ट्रम्प यांच्या अवास्तव व अवाजवी दडपण-डरकाळ्यांना भीक न घालता मोदींनी युरोपीय देश-समूहांशी धूर्तपणे व्यापारी करार करून आणला. मोदींची ही व्यापारी-व्यावसायिक चाल बेजोड ठरली. यातून ट्रम्प आणि त्यांच्या अमेरिकी दडपणांना भीक न घालता, भारत आणि युरोपीय देशांनी परस्पर व्यापार संबंधांना मोठी चालना देण्याचे करार केले. यातूनच ट्रम्प यांचे सारे मनसुबे ढासळले व त्यांनी अखेर करारासाठी पुढाकार घेतला. ट्रम्प-मोदी कराराची मोठी फलश्रुती म्हणजे, अगदी सुरुवातीपासूनच नरेंद्र मोदींनी भारतीय कृषी, मत्स्योत्पादन क्षेत्राला संरक्षण देण्याचे ट्रम्प यांच्याकडून मान्य करवून घेतले. याशिवाय, सारे वाढीव कर ट्रम्प यांनी मागे घेतल्याने त्यांची पिछेहाट झाली, तर मोदींसह भारत वरचढ ठरला. यामागे अशी व्यवस्थापन धोरणाची पृष्ठभूमी महत्त्वाची ठरली.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)
९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### अलर्ट राहणे गरजेचे आहे

अलीकडे सावधान, अलर्ट या सूचना वर्तमानपत्र, टीव्हीमध्ये सतत येत असतात. यामुळे सामान्य माणसाचा जीव कासावीस होतो. पूर्वी आपण जंगलातील वाघ-सिंहांना भीत होतो. आता त्यापेक्षा जास्त भीती माणसाची वाटते आहे. मनुष्य हा प्राणी होत आहे, हे स्पष्ट दिसू लागले आहे. घरातले पैसे-दागिने सुरक्षित नाही. बँकेतील पैसे-सोने-चांदीही असुरक्षित वाटते आहे. आता दोन प्रकारचे मानव-प्राणी समाजात निर्माण झाले आहेत. एक समाज'शील'प्राणी आणि दुसरे समाज'थ्रील' म्हणजे थरारक प्राणी. या समाजथ्रील प्राण्याला नियंत्रित करणे सरकार आणि त्यांच्या पोलिस खात्याला पूर्णपणे शक्य होत नाही. त्यामुळे अलर्टचा नारा द्यावा लागत आहे. पूर्वी असे समाजथ्रील प्राणी गरीब घरातले होते, परंतु आता हे प्राणी महागड्या कार-विमानात फिरतात आणि आपल्यासोबत इतर समाजशील मानव प्राण्याला घेऊन लुटतात. हाव आणि हेवा यांनी ते ग्रासले असतात. सामाजिक थ्रील प्राणी कितीही दिवस जेलमध्ये राहू शकतात. मानव रूपातील प्राणी ऑनलाईन, ऑफलाईन; कधी भीती दाखवून तर कधी गोड बोलून लूट करतात. शिक्षा भोगून आल्यावर पुन्हा नवीन गुन्हे करतात. अशा थ्रील सामाजिक प्राण्यांवर मानसोपचार गरजेचा आहे. असे झाले तरच ते समाजशील मानव होऊ शकतात.

**शशिकांत पांडे**/७५८८७४१९९६

### पोलिसांवर हल्ले करणाऱ्यास कडक शिक्षेची तरतूद हवी

तरुण भारतच्या २९ जानेवारीच्या अंकात 'पोलिसाला मारहाण करणाऱ्या दोन युवकांवर गुन्हे दाखल' ही बातमी वाचली. देशाचे अंतर्गत रक्षण करणाऱ्यास काही देशद्रोही युवक व इसम घोर अपमानित करतात व त्यांना मारहाण करून आपले अघोरी ईप्सित साध्य करण्याचा केविलवाणा प्रयत्न करतात. २७ जानेवारीला सकाळी आर्णी तालुक्यातील तेंडोळी येथील मातलेल्या दोन युवकांनी पेट्रोलिंगवर असणारे पोलिस नितीन वास्टर यांना शिवीगाळ करीत लाथाबुक्क्यांनी छातीवर मारले व त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. हे दोन्ही युवक विद्यार्थिनींची छेड काढून टवाळकी करीत होते. यासंदर्भात वास्टर यांनी जाब विचारला असता या माथेफिरूंचे माथे फिरले व त्यांनी कर्तव्यावर असलेल्या कर्तव्यनिष्ठ पोलिसावर जीवघेणा हल्ला केला. महाराष्ट्रात ग्रामीण व शहरी भागात सातत्याने पोलिसांवर हल्ल्याचे प्रमाण वाढले आहे. हे हल्ले केवळ देशद्रोहीच करतात, असे आढळून आले आहे. ही सकस लोकशाहीच्या दृष्टीने अतिशय चिंतेची बाब आहे. या विकृतीला चाप लावावा, असे सुजाण नागरिकांना वाटतेय. शासनाने या हल्लेखोरांविरुद्ध कडक कारवाई करावी, तेव्हाच पोलिसांना खऱ्या अर्थाने न्याय मिळेल. नक्षलवादी, प्रत्येक क्षेत्रातील तस्कर, गुन्हेगार हे पोलिस विभागालाच टार्गेट करतात व कुटिल योजना आखतात. सन १९७० पासून त्या अगोदरच्या तुलनेत हे प्रमाण वाढलेले आहे. उत्तरप्रदेशातील गोरखपूर व परिसरात गोरगरीब तरुणींची देहव्यापारासाठी विक्री होत आहे. मुंबई, ठाणे व बहुतेक शहरात या तरुणींना देहव्यापारासाठी अड्ड्यांवर आणले जात आहे. देशातील मोठ्या शहरात सोन्या-चांदीची तस्करी वाढलेली आहे. आंतरराष्ट्रीय तस्करांनी आपल्या एजंटांकरवी तस्करीचे सोने व चांदी, हिरे व बहुमूल्य वस्तू देशातील बहुतांश व्यापाऱ्यांना विकण्याचा सपाटा लावला आहे. मौल्यवान खनिज उत्खनन व रेती तस्करांचे प्रमाण वाढलेले आहे. या सर्व गुन्हेगारांवर कायदेशीररीत्या कडक शिक्षा व्हावी, तेव्हाच देशात सुव्यवस्था नांदेल व सर्वसामान्य नागरिकांना व समग्र पोलिसांना यथोचित न्याय मिळेल.

**अरविंद महल्ले**/९७६६१९७३८३

### इथे ओशाळली सभ्यता

२० फेब्रुवारी २०२६, भारत मंडपम येथे झालेल्या जागतिक एआय समिटमध्ये जे घडले, ते पाहून वाटले की आपण प्रगती करत आहोत की अधोगती? ज्या वास्तूत जगातील राष्ट्राध्यक्ष आणि तंत्रज्ञानाचे दिग्गज मानवजातीच्या भविष्यावर मंथन करत होते, तिथेच काही राजकीय कार्यकर्त्यांनी अंगातील कपडे (टीशर्ट) काढून बीभत्स प्रदर्शन केले. या कृतीमुळे जागतिक नेत्यांसमोर देशाच्या प्रतिमेचे धिंडवडे निघाले, वैचारिक विरोधाची जागा आता अश्लीलतेने घेतली आहे का, असा प्रश्न निर्माण होतो. ज्या मंचावर विद्वत्तेचा कस लागत होता, तिथेच बाहेर 'निर्लज्जपणाचा' उत्सव साजरा झाला. 'तंत्रज्ञान माणसाला समृद्ध करण्यासाठी असते, संकुचित करण्यासाठी नाही. कपडे उतरवून क्रांती होत नसते, त्यासाठी विचारांची प्रगल्भता लागते.' हा केवळ एका पक्षाचा निषेध नाही, तर हा आपल्या संस्कृतीचा होत असलेला ऱ्हास आहे. आपण विचार करायला हवा की आपण पुढच्या पिढीला नेमके कोणते संस्कार देत आहोत?

**श्रीकांत तिजारे**/९४२३३८३९६६

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

## CHANGE IN NAME

I hereby declare that my old name **Vishwasrao Arjunrao Barbole** has been changed to **Vishwas Arjunrao Barbole**
Resi add - Kasarwadi road, Barshi, Dist. Solapur Mob. No. 8390555505
**Affidavit No. 0617/2026**
**Date : 23/02/2026**

## जाहीर नोटीस

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. १५५/२०२५

१. पंचशिला सिद्राम खरात — **अर्जदार**
रा. कन्हेरी ता. वाशी जि. धाराशिव
(असल्यास, तर्फे वकीलसुरज पोपट ढावारे)

**विरुध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी — **गैरअर्जदार**
न. प. बार्शी

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. कन्हेरी ता. वाशी जि.धाराशिव यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ३० मार्च १९६८ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ३० मार्च १९६८ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**(एफ. आर. शेख)**
**तहसिलदार बार्शी**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं ५८/२०२५

## अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्ययाधिश कनिष्ठ स्तर साहेब यांचे कोर्टात

**१) बंदूभाई मौलाली जमादार**
वय-४५ वर्षे, धंदा नोकरी,
रा.मु. पो. कोन्हाळी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

**२) सुरय्या इलाई शेख**
वय-३८ वर्षे, धंदा घरकाम,
रा. मु. हणमगांव, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर.

**३) लालबी नुरअहमद शेतसंदी**
वय-३७ वर्षे, धंदा घरकाम,
मु. सिंदखेड, पो. आहेरवाडी, — **अर्जदार**
ता. द. सोलापूर, जि. सोलापूर

**४) नुरजहॉ रमजान मुल्ला**
वय-४७ वर्षे, धंदा घरकाम,
रा. मडी वस्ती, कुमठे, सोलापूर

**५) मुमताज मशाक भुसनुर**
वय-३८ वर्षे, धंदा घरकाम,
रा. ३०२, जुना दुधनी रोड, मैंदर्गी,
ता. अक्कलकोट, जि. सोलापूर.

विरूध्द

**कोणी नाही** — **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांनी हमीदा मौलाली रमादार ही दिनांक २३/१०२०२२ रोजी मयज झाले असून अर्जदार हमीदा मौलाली रमादार यांच्या नांवे बँक ऑफ बडोदा शाखा अक्कलकोट या बँकेत बचत खात्यावर जमा असलेली रक्कम रूपये ३१,०००/- मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी यातील अर्जदारांच्या नांवे वारस दाखला देण्यास अन्य कोणचेही काही हरकत अथवा कोणाचे म्हणणे असेल तर अशा हरकतदारांनी सदरचे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आंत किंवा नेमलेली तारीख २३/०३/२०२४ रोजी मे. कोर्टात हजर राहून आपल्या हरकती नोंदवून वर नमुद वेळेत कोणची हरकत आली नाही तर सदरचे मे. कोर्ट अर्जदारांच्या नांवे वारस प्रमाणपत्र देण्याबाबत हुकुम करेल. त्यानंतर कोणाची हरकत चालणार नाही, याची नोंद घ्यावी

हे जाहीर प्रसिध्दीकरण केले तारीख २१/०२/२०२६

**सही/-**
**लिपीक**

**सही/-**
**सहा अधिक्षक दिवाणी न्यायाधिश क स्तर अक्कलकोट**

## जाहीर प्रसिध्दीकरण

एस.आर जन्म-मृत्यु
अर्ज १७७/२०२६/५०/२६

### सोलापूर येथील मे. उत्तर सोलापूर तहसिलदार यांचे समोर

**अब्दुलगनी अजीज पटेल**
वय : ६९ वर्षे, धंदा : सेवानिवृत्त
राहणार :- प्लॉट नं. ३१, मुमताज नगर, सोलापूर — **अर्जदार**

विरुध्द

**मा. अधिक्षक जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी**
**सोलापूर महानगरपालिका, इंद्रभुवन सोलापूर** — **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांचे मुलगा नामे महंमदगौस अब्दुलगनी पटेल यांचे दिनांक २४/०९/१९८३ रोजी भावनाऋषी हॉस्पिटल, सोलापूर येथे जन्म झालेले आहे व अर्जदार यांनी त्यांच्या जन्माची नोंद मा. अधिक्षक तथा जन्म-मृत्यू अधिकारी, जन्म-मृत्यू नोंदणी कार्यालय, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर येथे जन्माची नोंदणी कायद्याप्रमाणे होऊन मिळणेकरिता हल्लीचा अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी सदर अर्जाचेकामी अर्जदार यांना त्यांच्या मुलाचा जन्म दाखला मिळणेकामी कोणाची काही हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत किंवा नेमलेल्या तारीख १०/०३/२०२६ रोजी स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला मुलाचे देण्यात येईल.

हे आज दिनांक २३/०२/२०२६ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याचे प्रसिध्द केले असे.

(शिक्का)

**सही/-**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी**
**उत्तर सोलापूर, सोलापूर**

## जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. १४८/२०२५

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

**१. नौशादबी अब्दुल काझी** — **अर्जदार**
रा. ३८६८/४ भवानी पेठ, बार्शी, ता. बार्शी
(असल्यास, तर्फे वकील विजय न. कुलकर्णी)

विरुध्द

**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी** — **गैरअर्जदार**
**तभा मुख्याधिकारी न.प. बार्शी**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. ३८६८/४ भवानी पेठ, बार्शी, ता. बार्शी यांचा मौजे बार्शी स्कानके क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी याठिकाणी दिनांक ०१ जुन १९६५ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ जुन १९६५ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी याठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १७/०२/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

(शिक्का)

**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार, बार्शी**

## जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु प्रकरण
अर्ज क्र. १५३/२०२५

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

**१. पार्वती काशीनाथ उर्फ आप्पा काळे** — **अर्जदार**
रा. ममदापूर ता. बार्शी जि सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील ए. व्ही सुरवसे)

विरुध्द

**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी** — **गैरअर्जदार**
**तथा ग्रामसेवक ग्रा. प. ममदापूर**

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदाराची मुलगी राहीबाई काशीनाथ काळे, रा. ममदापूर ता. बार्शी जि सोलापूर यांचा मौजे ममदापूर ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी दिनांक २० मे १९९० रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची मुलगी राहीबाई काशीनाथ काळे यांचा दिनांक २० मे १९९० रोजी मौजे ममदापूर ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

(शिक्का)

**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार, बार्शी**

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमांम लोकांस जनतेस आमचे अशिलांनी दिलेल्या माहितीवरुन आणि सांगितल्यावरून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, जिल्हा व उपजिल्हा, पैकी जिल्हा परिषद सोलापूर व ता. पंचायत समिती अक्कलकोट पैकी मौजे कर्जाळ ता. अक्कलकोट जि. सोलापूर, या गावचे ग्रामपंचायत हद्दीतील शेतजमीनीचा तपशील आणी त्यासी चतुःसिमा ही खालीलप्रमाणे आहे.

| गट नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| ८६/२ | हेक्टर - आर | रुपये = पैसे |
| ची संपुर्ण गटाची | २ = ०२ | ४ = ३० |
| जिरायत शेतजमीन | -------------- | |
| | २ = ०२ | |

**यासी चतुःसिमा ही खालीलप्रमाणे आहे.**

पूर्व : गट नंबर ८१ ची शेतजमीन. दक्षिण : गट नंबर ८७ व ८८ ची शेतजमीन. पश्चिम : गट नंबर ८६ / १ पैकी ची शेतजमीन उत्तर : गट नंबर ८५ ची शेतजमीन.

सदरची शेतजमीनी ही मैनोद्दीन सिकंदर शेख वगैरे ८ यांच्या मालकीची आहे व ती त्यांनी आमचे आशीलांना खरेदी देण्याची ठरवुन त्यांच्याकडुन इसारा रक्कम घेवुन त्यांच्या नावे इसारापावतीचा दस्त लिहुन दिलेला आहे आणी सदरची शेतजमीन ही निर्वेध, निजोखमीची व बिनबोज्याची असल्याची खात्री त्यांनी आमच्या अशिलांना दिलेली आहे. तरी सदरच्या वर कोणाचाही कसल्याही प्रकारचा बोजा, गहाण, दान, लीज, पोटगी टाच, बक्षीस, साठेखत, खरेदीखत, हिबानामा, तोंडी बक्षीसपत्र, वहिवाटीचा हक्क, वहिवाटीचा रस्त्याच्या हक्काबाबत तक्रार हरकत, अथवा अन्य कसल्याही प्रकारचा वारसा, दावा, हक्क, हित-संबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ (सात) दिवसाच्या आत खाली दिलेल्या पत्यावर सर्वसंबधीत लेखी कागदपत्रे घेऊन समक्ष भेटुन अथवा कळवुन आपल्या हक्काबाबत आमचे आशीलांना खात्री करुन द्यावी. वर नमुद मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार व हरकत न आल्यास ज्यांचा हक्क आहे त्यांनी तो स्वखुशीने सोडुन दिला आहे असे ग्राह्य धरुन आमचे अशील सदरचा व्यवहार पुर्ण करुन घेतील. मुदतीनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची येणारी तक्रार व हरकत ही आमचे आशीलावर आणी त्यांनी घेतलेल्या मिळकतीवर बंधनकारक राहणार आणी होणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणुन सदर जाहीर नोटीस दिली दिनांक २३.०२.२०२६.

**सही/-**
**अशील**

**सही/-**
**ॲड. मितेश जयंत कुलकर्णी**
म्यु.घर नंबर ९४४ बी/सी दत्तचरण
उत्तर सदर बझार, सात रस्ता, बँक ऑफ इंडीया जवळ
सोलापुर. ४१३००३ मो.नं. ९८६०६००३८६
आशीलातर्फे ॲडव्होकेट.

## जाहीर नोटीस

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. १६/२०२५

१. गणेश सदाशिव विभुते — **अर्जदार**
रा. पंकज नगर बार्शी
(असल्यास, तर्फे वकील सुरज पोपट ढावारे)

**विरुध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी — **गैरअर्जदार**
न. प. बार्शी

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदाराची मुलगी शरण्या गणेश विभुते, रा. पंकज नगर बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक २९ जुलै २०१७ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची मुलगी शरण्या गणेश विभुते यांचा दिनांक २९ जुलै २०१७ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**(एफ. आर. शेख)**
**तहसिलदार बार्शी**

## जाहीर नोटीस

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. १३३/२०२५

१. अजिनाथ उत्रेश्वर दळवी — **अर्जदार**
रा. सासुरे ता बार्शी जि सोलापूर
(असल्यास, तर्फे वकीलपदमाकर बि काटमोरे)

**विरुध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक — **गैरअर्जदार**
ग्रा. प. सासुरे

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. सासुरे ता बार्शी जि सोलापूर यांचा मौजे सासुरे ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०२ जुन १९६९ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०२ जुन १९६९ रोजी मौजे सासुरे ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**(एफ. आर. शेख)**
**तहसिलदार बार्शी**

## जाहीर नोटीस

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ९०/२०२५

१. विलास शहाजी करंडे — **अर्जदार**
रा. सासुरे ता बार्शी जि सोलापूर
(असल्यास, तर्फे वकीलपदमाकर बि काटमोरे)

**विरुध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक — **गैरअर्जदार**
ग्रा. प. सासुरे

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदाराची मुलगी प्रतिक्षा विलास करंडे, रा. सासुरे ता बार्शी जि सोलापूर यांचा मौजे सासुरे ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी दिनांक २१ ऑक्टोबर २०११ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदराची मुलगी प्रतिक्षा विलास करंडे यांचा दिनांक २१ ऑक्टोबर २०११ रोजी मौजे सासुरे ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**(एफ. आर. शेख)**
**तहसिलदार बार्शी**

## जाहीर नोटीस

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ७/२०२५

१. अनिकेत राजकुमार पवार — **अर्जदार**
रा. उपळे (दु) ता. बार्शी
(असल्यास, तर्फे वकील सुरज पोपट ढावारे)

**विरुध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी — **गैरअर्जदार**
न. प. बार्शी

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. उपळे (दु) ता बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक १५ नोंव्हेबर २००० रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक १५ नोंव्हेबर २००० रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**(एफ. आर. शेख)**
**तहसिलदार बार्शी**

## जाहीर नोटीस

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ६/२०२५

१. प्रभावती पोपट धुमाळ — **अर्जदार**
रा. बी ५०३ शिवाजी मार्केट सर्व्हे नं. ७७/१ एफ
पेणे सोलापूर रोड मांजरी पुणे
(असल्यास, तर्फे वकील सुरज पोपट ढावारे)

**विरुध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक — **गैरअर्जदार**
ग्रा. पं. धामणगाव (आ)

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचा मुलगा शशिकांत पाचट धुमाळ, रा. बी ५०३ शिवाजी मार्केट सर्व्हे नं. ७७/१ एफ पेणे सोलापूर रोड मांजरी पुणे यांचा मौजे धामणगाव (आ) ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी दिनांक २० ऑक्टोबर १९८३ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचा मुलगा शशिकांत पाचट धुमाळ यांचा दिनांक २० ऑक्टोबर १९८३ रोजी मौजे धामणगाव (आ) ता. बार्शी राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी, मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**(एफ. आर. शेख)**
**तहसिलदार बार्शी**

## जाहीर नोटीस

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. १३४/२०२५

१. दाजी केरबा केवडकर — **अर्जदार**
रा. सुभाष नगर बार्शी ता. बार्शी
(असल्यास, तर्फे वकीलसुरज पोपट ढावारे)

**विरुध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी — **गैरअर्जदार**
न. प. बार्शी

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदाराची मुलगी माधुरी दाजी केवडकर, रा. सुभाष नगर बार्शी ता. बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील हिरेमठ हॉस्पिटल बार्शी या ठिकाणी दिनांक २६ फेब्रुवारी १९८९ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची मुलगी माधुरी दाजी केवडकर यांचा दिनांक २६ फेब्रुवारी १९८९ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील हिरेमठ हॉस्पिटल बार्शी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**(एफ. आर. शेख)**
**तहसिलदार बार्शी**

## जाहीर नोटीस

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ७१/२०२५

१. समीर खलिल शेख — **अर्जदार**
रा. ४२२ गाडेगाव रोड बार्शी ता. बार्शी
(असल्यास, तर्फे वकीलसुरज पी ढावारे)

**विरुध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी — **गैरअर्जदार**
न. प. बार्शी

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. ४२२ गाडेगाव रोड बार्शी ता. बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरीया ठिकाणी दिनांक २४ जानेवारी १९८६ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक २४ जानेवारी १९८६ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**(एफ. आर. शेख)**
**तहसिलदार बार्शी**

## जाहीर नोटीस

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ८/२०२५

१. परमेश्वर महादेव मोरे — **अर्जदार**
रा. साकत ता. बार्शी
(असल्यास, तर्फे वकील सुरज पोपट ढावारे)

**विरुध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी — **गैरअर्जदार**
न. प. बार्शी

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदाराचा मुलगा दत्तात्रय परमेश्वर मोरे, रा. साकत ता. बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०४ मे २००८ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मल्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचा मुलगा दत्तात्रय परमेश्वर मोरे यांचा दिनांक ०४ मे २००८ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास तो त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**(एफ. आर. शेख)**
**तहसिलदार बार्शी**

## जाहीर नोटीस

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. १०/२०२५

१. सुनंदा तात्यासाहेब लंगडे — **अर्जदार**
रा. गौर ता.जि. उस्मानाबाद ह.मु बार्शी
(असल्यास, तर्फे वकील सुरज पोपट ढावारे)

**विरुध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी — **गैरअर्जदार**
न. प. बार्शी

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदाराचे पती तात्यासाहेब चंद्रभान लंगडे, रा. गौर ता.जि. उस्मानाबाद ह.मु बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र साई संजिवनी हॉस्पीटल बार्शी ता. बार्शी जि सोलापूर या ठिकाणी दिनांक २४ जानेवारी २०२३ रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचे पती तात्यासाहेब चंद्रभान लंगडे याचा दिनांक २४ जानेवारी २०२३ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र साई संजिवनी हॉस्पीटल बार्शी ता. बार्शी जि सोलापूर या ठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**(एफ. आर. शेख)**
**तहसिलदार बार्शी**

## जाहीर नोटीस

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. १९/२०२५

१. सारीका कचरु चव्हाण — **अर्जदार**
रा. गोकूल किल्ला वेअर हौस समोर बार्शी
(असल्यास, तर्फे वकील सुरज पोपट ढावारे)

**विरुध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी — **गैरअर्जदार**
न. प. बार्शी

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदाराची मुलगी आरती कचरू चव्हाण, रा. गोकूल किल्ला वेअर हौस समोर बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०८ ऑगस्ट २००७ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोटीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची मुलगी आरती कचरु चव्हाण यांचा दिनाक ०८ ऑगस्ट २००७ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**(एफ. आर. शेख)**
**तहसिलदार बार्शी**

## जाहीर नोटीस

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. १४/२०२५

१. अंकुश शंकर गावसाने — **अर्जदार**
रा. वैराग ता. बार्शी जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील सुरज पोपट ढावारे)

**विरुध्द**

२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी — **गैरअर्जदार**
न. प. बार्शी

सदर या जाहीर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदाराची मुलगी आकांक्षा अंकुश गावसाने, रा. वैराग ता. बार्शी जि. सोलापूर यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील मावस भाऊ यांच्या राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ११ एप्रिल २००६ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची मुलगी आकांक्षा अंकुश गावसाने यांचा दिनांक ११ एप्रिल २००६ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी जि सोलापूर येथील मावस भाऊ यांच्या राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ३० डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**(एफ. आर. शेख)**
**तहसिलदार बार्शी**



# टी-२० विश्वचषकाचा थरार



# पाकिस्तानसमोर इंग्लंडचे आव्हान

**पल्लेकेले, २३ फेब्रुवारी**

आयसीसी टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत मंगळवारी पल्लेकेले येथे इंग्लंड आणि पाकिस्तान यांच्यादरम्यान सुपर एट साखळी सामना खेळला जाणार आहे. दोन्ही संघ महत्त्वाचे गुण मिळवण्याच्या दृष्टीने आपल्या फिरकी गोलंदाजांचे लक्ष केंद्रित करतील.

पाकिस्तान आणि न्यूझीलंड दरम्यानचा पहिला सुपर एट सामना पावसामुळे रद्द करण्यात आला, त्यामुळे दोन्ही संघांना प्रत्येकी एका गुणावर समाधान मानावे लागले. इंग्लंडने श्रीलंकेवर ५१ धावांनी विजय मिळवून सुपर एटमध्ये आपली मोहीम सुरू केली, त्यामुळे त्यांचा नेट रन रेट लक्षणीयरीत्या वाढला व त्यांनी क्रमवारीत अव्वल स्थान मिळविले आहे.

श्रीलंकेविरुद्ध माफक धावसंख्येचा बचाव करताना इंग्लंडने परिस्थितीनुसार उत्तम खेळ केला. त्यांच्या फिरकी गोलंदाजांनी वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरसह श्रीलंकेच्या फलंदाजीचा नाट्यमय पराभव करण्यासाठी प्रभावी कामगिरी केली. सर्वकाळ विश्वासाई लेग स्पिनर आदिल रशीद व डावखुरा फिरकी गोलंदाज लियाम डॉसनने बळी टिपण्यासाठी चांगले सहकार्य केले आहे. दरम्यान, विल जॅक्स एक अशक्य सामना जिंकणारा खेळाडू म्हणून उदयास आला आहे. त्याचा ऑफ-स्पिन उपयुक्त ठरला आहे. सलामीवीर फिल साल्टने श्रीलंकेविरुद्ध सामना जिंकणारी खेळी करून फॉर्ममध्ये परतला. तथापि, जोस बटलरचा फॉर्म चिंतेचा विषय आहे. परंतु या अनुभवी फलंदाजाला त्याचा कर्णधार हॅरी ब्रुकचा पाठिंबा आहे.

इंग्लंडला येथील खेळपट्टी व वातावरणाची ओळख आहे. इंग्लंडने या महिन्याच्या सुरुवातीला येथे तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत ३-० असा विजय मिळविला व श्रीलंकेविरुद्ध सुपर एट सामनाही जिंकला.

याउलट, न्यूझीलंडविरुद्धचा सुपर एटचा पहिला सामना पावसामुळे वाया गेल्याने पाकिस्तान निराश झाला, त्यामुळे त्यांच्याकडे केवळ एक गुण आहे व चुकांसाठी फारशी जागा राहिली नाही. पाकिस्तानचा संघ आपल्या विविध फिरकी गोलंदाजीवर अवलंबून असेल. उस्मान तारिकच्या गूढ फिरकीसोबत, पाकिस्तानकडे सैम अयुब, अबरार अहमद, शादाब खान व मोहम्मद नवाजसारखे प्रभावी गोलंदगाज आहे. हे गोलंदाज इंग्लंडच्या फलंदाजीत अडथळा आणण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकतात. तथापि, पाकिस्तानची स्वतःची फलंदाजी चिंतेची बाब आहे. ते विशेषतः दर्जेदार फिरकी गोलंदाजांविरुद्ध चाचपडत खेळतात. सलामीवीर साहिबजादा फरहानने मात्र चांगली कामगिरी केली आहे, तर सैम अयुब व कर्णधार सलमान आगा सामना खेचून नेण्यात व वेग वाढविण्यास सक्षम आहे, पण त्यांनी अद्याप कामगिरी केलेली नाही.

(वृत्तसंस्था)



हॅरी ब्रुक



सलमान आगा

**आजचा सामना**

**इंग्लंड वि. पाकिस्तान**
**स्थळ** : पल्लेकेले स्टेडियम, पल्लेकेले
**वेळ** : सायंकाळी ७.०० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर



राष्ट्रीय मानांकन लॉन टेनिस

# सोलापूरच्या पुलगम, मुर्थी, हिरेमठ, ओक, राठी यांचा दुसऱ्या फेरीत प्रवेश

**सोलापूर २३ फेब्रुवारी-**

१२ वर्षाखालील राष्ट्रीय मानांकन लॉन टेनिस स्पर्धेत सोलापूरच्या पुलगम, मुर्थी , हिरेमठ, ओक, राठी यांनी दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना पुरस्कृत व अखिल भारतीय लॉन टेनीस संघटनेच्या अधिपत्याखाली आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन स्पोर्ट्स एरोबिक्सच्या आंतरराष्ट्रीय जज आणि प्रशिक्षक डॉ. मोहिनी मोरे ताकटे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी संध्याराणी बंडगर, तेजल कुलकर्णी, रोहन गाला, सुनंदा पवार आदी उपस्थित होते .

**आजचे निकाल : मुली :** शनया हिरेमठ (सोलापूर) वि वि वर्षा कृशांत (बँगलोर) ६-0, ६-२. गार्गी ओक (सोलापूर) वि वि कायरा बदाले (पुणे) ६-0, ६-१. **मुले :** अव्द्यान पुलगम (सोलापूर) वि वि विराज कल्याणशेट्टी (बेळगाव) ६-0 , ६-0 . विहान मुर्थी (सोलापूर) वि वि अच्युत प्रसाद (बँगलोर) ४-६ , ६-३ , ६-४ . रोनव राठी (सोलापूर) वि वि संप्रतीक्ष रेड्डी (हैदराबाद) ६-३ , ६ -0 .



# प्रथम ग्रासे मक्षिकापात:...

तर मित्रांनो ''अव्वल आठ'' या माझ्या कालच्या मनोगतात मी व्यक्त केलेले सगळे अंदाज सपशेल चुकले. दक्षिण आफ्रिकेचा संघ ''चोकर्स'' नाही हे त्यांनी आपल्या कालच्या नियोजनबद्ध खेळानं दाखवून दिलं. गेल्या विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यातील पराभवाची सव्याज परतफेड केली. सर्वप्रथम विजेत्यांचे अभिनंदन. म्हणतात ना Better side wins काल अगदी तसंच झालं. थोडक्यात sum up करायचं झालं तर A very bad day in the office आपल्यासाठी, तर दक्षिण आफ्रिकेसाठी त्यांच्या क्रिकेट इतिहासातील एक सर्वोत्तम दिवस. हा सामना आपण कसा जिंकलो याचं वार्तांकन करावं लागेल असं वाटलं होतं, पण सामना का हरलो याची कारणं शोधायची वेळ आली. असो, अजूनही सर्व काही संपलेलं नाही, आपण अजूनही सेमी फायनलमध्ये प्रवेश करू शकतो आणि कुणी सांगावं कदाचित दक्षिण आफ्रिकेबरोबरच अंतिम लढत होईल. आणि या लज्जास्पद पराभवाची परतफेड करण्याची संधी आपल्याला लाभेल. हा वेक अप कॉल होता असं समजून आता जागं होण्याची गरज आहे.

मुकुंद कुलकर्णी, सोलापूर
दूरभाष ९४२१४५४८८८

सामना सुरू झाला तेव्हा असं वाटलं होतं की सामना चुरशीचा होणार आणि शेवटी आपण जिंकणार. दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली तेव्हा आपण आफ्रिकेला किती धावात रोखणार याची उत्सुकता होती. सुरुवात झाली ही तशी. पहिल्या पॉवर प्ले मध्ये दक्षिण आफ्रिका तीन बाद एकेचाळीस, तेव्हा असं वाटलं की सामना आता खिशात आहे. क्रिकेटच्या सर्व प्रकारात बुमरा हा सर्वश्रेष्ठ गोलंदाज का आहे हे त्याने आपल्या पहिल्या स्पेलमध्ये दाखवून दिलं. अर्शदीपने त्याला तोलामोलाची साथ दिली. हीच काय ती वेळ, सामन्यावर आपली पकड मजबूत होती. त्यानंतर मात्र सगळा दक्षिण आफ्रिका शो होता. फलंदाजी, गोलंदाजी, क्षेत्ररक्षण तिन्ही विभागात दक्षिण आफ्रिकेने आपल्याला पुरतं नेस्तनाबूत केलं, अगदी धोबीपछाड मारला आपल्याला.

असं म्हणतात की वारुणी जेव्हा जुनी होते, मुरते तेव्हा ती आणखीनच रंगतदार होते. काल डेव्हिड मिलरने अशाच एका रंगतदार खेळीचा नजराणा आपल्याला पेश केला. मधल्या षटकांमध्ये त्याने नवख्या ब्रेव्हिसला हाताशी धरून जवळजवळ शंभर धावांची जलदगती भागीदारी केली आणि सामना हातातून केव्हा निसटला हे मैदानावर खेळाडूंना, सीमारेषेबाहेर प्रेक्षकांना आणि टीव्हीला नाक लावून बसलेल्या आपल्या सारख्या अजाण प्रेक्षकांना कळलं ही नाही! हे असं का झालं याची कारणमिमांसा करायला गेलो तर बरेच प्रश्न उभे राहतात, ज्यांची उत्तरं लवकरात लवकर शोधली नाहीत तर या स्पर्धेतून आपल्याला बाहेर पडावं लागेल. थोडक्यात माझे मुद्दे मांडतो, बघा पटतात का..

**दक्षिण आफ्रिकेचा नियोजनबद्ध खेळ....**

जेव्हा पहिल्या तीन विकेट केवळ वीस धावांवर गेल्या तेव्हा त्यांनी आपला प्रमुख गोलंदाज वरुणवर हल्ला चढवला आणि त्याला निष्प्रभ केलं. परंपरागत टेक्निकने खेळत समोर व्ही च्या पट्ट्यात उत्तुंग फटके मारुन वरूणला निष्प्रभ करता येतं हे मिलरनं दाखवून दिलं..

- वॉशिंग्टन सुंदरला घेऊन अक्षरला डावलणं महागात पडलं. अक्षर विकेट ही घेतो आणि धावा ही काढतो. काल वॉशिंग्टन सुंदर फेल गेला..
- सहसा एखादा स्पेशालिस्ट गोलंदाज फेल जातो काल वरुण आणि हार्दिक दोघेही फेल गेले..
- टी-ट्वेंटी प्रकारातही तज्ञ फलंदाज आणि गोलंदाज लागतात, आपण अष्टपैलू खेळाडूंवर विसंबून राहिलो..
- क्षेत्ररक्षणात सुधारणेला खूप वाव आहे..
- धावांचा पाठलाग करताना ठराविक अंतराने आपल्या विकेट गेल्या..
- दक्षिण आफ्रिकेने आपल्या प्रत्येक फलंदाजांचे कच्चे दुवे हेरले आणि त्याप्रमाणे मारा केला. अभिषेकला फटकेबाजीला संधी दिली नाही..
- सर्वच फलंदाजांना वेगवान चेंडू न टाकता धीम्या गतीने गोलंदाजी करून फटकेबाजी अवघड केली..
- थोडक्यात त्यांचं नियोजन आणि त्याची अंमलबजावणी अचूक होती, तिथं आपण कमी पडलो..
- काल रोहित आणि विशेषतः विराटची आठवण झाली. विराट नंतर तसा ''चेस मास्टर'' आपल्याकडे नाही..
- अजूनही वेळ गेलेली नाही. या सर्व प्रश्नांची उत्तरं शोधायला आपला संघ सक्षम आहे आणि थोडीशी रुळावरून घसरलेली गाडी पुन्हा विजय पथावर जोमाने धावायला लागेल..

**आता आपला पुढील सामना २६ तारखेला झिम्बाब्वे विरुद्ध आहे, त्याआधी preview घेऊया....**

# संजीवनी कॉर्पोरेट प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा शुक्रवारपासून

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

येथील संजीवनी सोशल फाउंडेशनतर्फे संजीवनी कॉर्पोरेट प्रीमियर लीग टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा २७, २८ फेब्रुवारी व १ मार्च दरम्यान आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती फाउंडेशनचे अध्यक्ष राकेश उदगिरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ही स्पर्धा दयानंद कॉलेज क्रिकेट स्टेडियम येथे आयोजित केली आहे. या स्पर्धेत आयएमए, भावसार पतसंस्था, सोलापूर श्रमिक पत्रकार संघ, नीमा, जोडभावी पेठ पोलिस, सोलापूर केमिस्ट, आरकेसीसी, वैद्यकीय प्रतिनिधी, इंजिनियर्स, रोटरी क्लब, सोलापूर ॲडव्होकेटस् आणि टीचर्स असे एकूण १२ संघ सहभागी होणार आहेत. ही स्पर्धा साखळी पद्धतीने होणार आहे. लकी ड्रॉ च्या माध्यमातून १ मार्च २०२६ रोजी अंतिम सामन्यानंतर मैदानात उपस्थित प्रेक्षकांसाठी विविध प्रकारचे आकर्षक भेट वस्तू देण्यात येणार आहे. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी फाउंडेशनचे सचिव सचिन गबुरे, संचालक गिरीष सुकलेचा, सदस्य अमोल शेट्टी व आयोजन समितीचे सदस्य सतीश सुरवसे, आनंद खमितकर, मयूर बासुतकर, बिरोबा सलगर, नरेंद्र दंतकाळे, सिद्धराम तंबाके, विकास संघानी, सचिन गायकवाड, करण चाकोते आदी परिश्रम घेत आहेत. या पत्रकार परिषदेला आनंद खमितकर, अमित काबणे, सतीश सुरवसे, सिद्धाराम तंबाके, बिरोबा सलगर, विकास संघानी, चंद्रशेखर उदगिरी, अमोल शेट्टी उपस्थित होते.



**एका षटकाराला एक झाड**

स्पर्धेदरम्यान जितके षटकार लगावले जातील व गडी बाद होतील, प्रत्येक वेळेस १ झाड लावण्यात येईल, असे ४०० हून अधिक फळझाडे लावून एक बाग संजीवनी सोशल फाउंडेशन तर्फे विकसित करण्याचे नियोजन आहे, जे ह्या स्पर्धेच्या माध्यमातून निसर्गाच्याप्रति एक मोठे पाऊल असेल.



# महापालिकेतही खेळाडूंना ५% आरक्षण देणार

## नूतन नगरसेविका रोहिणी तडवळकर यांचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

राज्य शासनाच्या धर्तीवर महापालिकेच्या सेवेतही राष्ट्रीय खेळाडूंना ५ टक्के आरक्षण देऊन त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन नूतन नगरसेविका रोहिणी तडवळकर यांनी दिले. भाजप क्रीडा प्रकोष्ठ, आरंभ फाऊंडेशन आणि विराट स्पोर्ट्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सत्कार समारंभात त्या बोलत होत्या.

नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर भाजप शहराध्यक्षा रोहिणीताई तडवळकर आणि ज्ञानेश्वर म्याकल यांची स्वीकृत नगरसेवक पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना तडवळकर आणि म्याकल यांनी खेळाडूंना व क्रीडा क्षेत्राला भरीव मदत व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. ''शहरातील खेळाडूंना सरावासाठी दर्जेदार मैदाने कशी उपलब्ध होतील, याकडे विशेष लक्ष दिले जाईल. तसेच, पालिकेचे जलतरण तलावही खेळाडूंना सरावासाठी उपलब्ध करून दिले जातील,'' असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

याप्रसंगी भाजपा क्रीडा प्रकोष्ट यशवंत पाथरूट, तरुण भारतचे वृत्त संपादक अजितकुमार संगवे, अथलेटिक्स संघटनेचे सचिव राजू प्याटी, एन.आय.एस. प्रशिक्षिका भारती लिंगडे, सूर्याजी लिंगडे, राष्ट्रीय खेळाडू निलेश वरवडकर, संतोष कदम, अंबादास बोगा, शांताराम शिंदे, प्रविण तळे, डॉ.रेश्मा, किशोर सोळस्कर, सिध्दू बिराजदार, निली जाधव आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष कदम यांनी केले.

# पुण्याचे चैतन्य शिंदे, दीक्षा यादव ठरले सर्वात वेगवान जलतरणपटू

## ६२ वी 'संक रॉक ओशन स्विमॅथॉन स्पर्धा
## सोलापूरची दीपाली जक्कल तृतीय

**मुंबई, दि. २३ फेब्रुवारी-**

'महाराष्ट्र स्टेट अमेच्युअर ॲक्वेटिक असोसिएशन' यांच्या वतीने आयोजित ऐतिहासिक '६२ वी संक रॉक ओशन स्विमॅथॉन २०२६' स्पर्धेत पुरुष गटात पुण्याच्या चैतन्य शिंदे आणि दीक्षा यादव यांनी सर्वात वेगवान जलतरणपटूचा किताब पटकाविला.

चैतन्यने ३९:१५ मिनिटांत सुवर्ण, सुरतचा युग अजय भाई सायलर ४०:०३ मिनिटात रौप्य आणि नाशिकचा वरद घनश्याम कुवर ४०:४९ मिनिटात कांस्य पदक संपादिले. महिला गटात पाच किलोमीटरमध्ये दीक्षाने ३९:३३ मिनिटांत सुवर्ण, तर सिंधुदुर्गची पूर्वा संदीप गावडे ४१:१६ मि. रौप्य आणि नागपूरची संजना सुनील जोशी ४३:२२ मि. कांस्य मिळविले. २६ ते ४५ वर्षे महिला गटात हुगळीची तुली बॅनर्जी ५०:४० मि. प्रथम, मुंबईची मृण्मयी भोईर १:१५:०४ द्वितीय, सोलापूरची दिपाली जक्कल १:२४:०७ तृतीय आली. महाराष्ट्रासह ६ राज्यांतील तब्बल ३३७ जलतरणपटूंनी गेटवे ऑफ इंडियाच्या साक्षीने समुद्राला आव्हान दिले. त्यापैकी ३३० जलतरणपटूंनी हि स्पर्धा विक्रमी वेळेत पूर्ण केली. बक्षीस वितरण सोहळा सचिवालय जिमखाना येथे खासदार अरविंद सावंत, पद्मश्री उदय देशपांडे, अर्जुन पुरस्कार विजेते राजू भावसार, ज्येष्ठ क्रीडा संघटक बाळ वाडवलिकर, द्रोणाचार्य तपन पाणीग्रही, क्रीडा संघटक बाळ तोरसकर, असोसिएशनचे अध्यक्ष आनंद माने आणि सरचिटणीस राजेंद्र पालकर यांच्या उपस्थितीत पार पडला.





## एक्सलेंट इंटरनॅशनल नर्सरी स्कूलचा अजिंक्य वाघमारे धावण्याच्या शर्यतीत द्वितीय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

आत्मन चिल्ड्रेन रन वे २०२६ स्पर्धेत एक्सलेंट इंटरनॅशनल नर्सरी स्कूलच्या अजिंक्य वाघमारे याने धावण्याच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक संपादिला. सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी अजिंक्याचे कौतुक केले. त्यांनी अजिंक्यला मेडल देऊन सन्मानित केले. अजिंक्यचे शाळेतील शिक्षक, विद्यार्थी व पालक वर्ग यांनी कौतुक केले.

# झारखंडविरुद्ध महाराष्ट्राला ३५७ धावांची आघाडी

- राजन दीप, शुभ शर्माची अर्धशतके
- विक्की ओस्तवालचे ४ बळी व नाबाद ८९ धावांची अष्टपैलू खेळी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर सुरू असलेल्या २३ वर्षाखालील कर्नल सी के नायडू क्रिकेट स्पर्धेत महाराष्ट्र विरुद्ध झारखंड सामन्यात तिसऱ्या दिवशी दुसऱ्या सत्रात महाराष्ट्राने झारखंड संघाला २९२ धावावर रोखले. दिवस अखेरीला हवामानात बदल झाल्याने अंधुक प्रकाशामुळे लवकर खेळ थांबला तेंव्हा महाराष्ट्राने दुसऱ्या डावात २ बाद १७२ धावा केल्याने ३५७ धावांची आघाडी घेतली आहे.

कालच्या धावसंख्येवरून सकाळी झारखंड ने पुढे खेळताना १० षटकात २५ धावांची भर घातली आणि ५८ धावांची भागीदारी केली असताना सत्या सेतू (३१) विकी ओस्तवाल चे गोलंदाजीवर यष्टिरक्षक कडे झेल देत बाद झाला. कर्णधार राजन दीपने त्यानंतर आलेल्या शुभ शर्मा सोबत पाचव्या विकेटसाठी ८६ धावांची भागीदारी रचली ती दोघांनी केलेल्या संयमी अर्धशतकांच्या जोरावर.

पहिल्या डावाच्या आधारे विजय मिळविण्यासाठी वापरलेली फिरकी गोलंदाजी सहज खेळत असल्याचे पाहून महाराष्ट्र कर्णधाराने पुन्हा मध्यमगती गोलंदाजी सुरू केली आणि अजय बोरुडेने कर्णधार राजन दीप (६८, १३६ चेंडू, ७ चौकार) याला झेल बाद केले व पुढच्याच चेंडूवर कौनैन कुरेशी याला देखील माघारी धाडले. प्रभात कुमार माहतो याचे सोबत शुभ शर्माने जेवणाला खेळ थांबेपर्यंत संघाची धावसंख्या २५३ (९१ षटके) पर्यंत नेली तेव्हा शुभ शर्मा ५५वर नाबाद होता.

दुसऱ्या सत्रात मात्र केवळ ३९ धावांची भर घालत झारखंडचा पहिला डाव २९२वर संपुष्टात आला तो प्रभात कुमार माहतो (१५) याला वैभव दारकुंडेने आणि मनिषी (१), अमित कुमार (0), शुभ शर्मा (७९) यांना विकी ओस्तवाल ने बाद केल्याने.

पहिल्या डावात १८५ धावांची मजबूत आघाडी मिळाल्यावर फॉलोऑन न देता महाराष्ट्र संघाने पुन्हा फलंदाजी करण्याच्या निर्णय घेत सलामीला नीरज जोशी सोबत विकी ओस्तवाल याला पाठविले आणि पहिल्याच षटकात चौकार लगावत नीरजने दमदार सुरुवात करत पहिल्या ९ षटकात दोघांनी ३८ धावा जोडल्या. पण कौनैन कुरेशी याने निरजला (२२) पायचीत करत जोडी फोडली. त्यानंतर कर्णधार सचिन धस फलंदाजीला आला आणि पुढील ६ षटकात दोघांनी फटकेबाजी करत ४४ धावांची भागीदारी केली आणि पहिल्या डावात धमाकेदार २00 धावा केलेल्या सचिनला (३३) अमिते स्वतःच्या गोलंदाजीवर बाद केले.

पुढील भरवशाचा फलंदाज दिग्विजय पाटील सोबत विकी ओस्तवालने ५0 धावांची भागीदारी करताना अष्टपैलू खेळी करत आपले वैयक्तिक अर्धशतक देखील पूर्ण केले ते ५ चौकार, ४ षटकार लगावत. दिग्विजय सोबत विकीने संघाचे शतक मग दीडशे धावा पूर्ण केल्या त्या चौफेर फटकेबाजी करत. दिवसाचे ९0 षटके पूर्ण होण्याच्या आधीच अचानक हवामानात बदल होऊन जोराचा वारा वाहू लागल्याने व अंधुक प्रकाशामुळे पंचांनी खेळ थांबविला तेव्हा १0 चौकार, ५ षटकार खेचत विकी ८९, तर दिग्विजय पाटील १८ धावांवर नाबाद असून शेवटच्या चौथ्या दिवशी महाराष्ट्र संघ आणखी किती धावा करतो हे आणि सोलापूरचा आर्शिन कुलकर्णी ची खेळी पाहणे, तसेच सामना अनिर्णित राहून पहिल्या डावाच्या आधारे निकाल लागतो की संपूर्ण हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

ह्या सामन्यातील विजयी संघ मुंबई विरुद्ध कर्नाटक या सामन्यातील विजयी (मुंबई) संघाशी १ मार्च पासूनच्या उपान्त्य सामन्यात भिडणार आहे.





विकी ओस्तवाल



राजन दीप



शुभ शर्मा

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### गंगाधर कोळी यांची पश्चिम महाराष्ट्र क्षेत्रीय प्रभारीपदी निवड

**मंगळवेढा, दि.२३ फेब्रुवारी-**
वलखड (ता. खानापूर) येथील अंतरराष्ट्रीय मानवाधिकार सामाजिक न्याय आयोग राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. संतोष बाजाज यांच्या परवानगीने राष्ट्रीय मुख्य उपाध्यक्ष अमरदीप आपणे, राष्ट्रीय संयोजक डॉ. विश्वदीप आपणे यांच्या उपस्थितीत आणि पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. संतोष डांगे यांच्या अध्यक्षतेखाली मासिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते. त्या कार्यशाळेत पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष सन्मानीय डॉक्टर संतोष डांगे आणि राष्ट्रीय उपाध्यक्ष अम रदीप आपणे यांचे हस्ते गंगाधर लक्ष्मण कोळी यांना पश्चिम महाराष्ट्र क्षेत्रीय प्रभारी नियुक्तीचे पत्र देण्यात आले. गंगाधर लक्ष्मण कोळी हे पीएमश्री के. नानासाहेब नागणे प्रशाला न.पा. मुलांची शाळा नं.४ नागणेवाडी, मंगळवेढा येथे मुख्याध्यापक पदी कार्यरत आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.



### माढा शालेय विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

**माढा, दि. २३ फेब्रुवारी-**
माढा येथे छत्रपती शिवाजी महाराज आणि स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त यशवंत फाउंडेशन या सामाजिक संस्थेच्या वतीने शहरातील जि.प.मुलींची शाळा नं. १, नं.२ व उर्दू या शाळेतील विद्यार्थ्यांना फाऊंडेशनचे अध्यक्ष तथा शिवसेना शहर प्रमुख देविदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली वह्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून शिवसेनेचे संतोष जुगदार प्रमुख पाहुणे म्हणून माढा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरिक्षक रोहित शिंदे, उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. प्रस्ताविक मुख्याध्यापक सुरेश माळी यांनी केले. यावेळी पोलीस निरीक्षक रोहित शिंदे, यशवंत फाउंडेशनचे अध्यक्ष देवीदास खरात, डॉ.यू.एफ.जानराव, संतोष जुगदार, दिनेश जगदाळे, व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश मोरे, बापू राऊत, दत्तात्रय राऊत, शिवाजी माने, किरण पवार, रवि सरवदे, विकास पवार, अमोल खरात, अनिकेत चवरे, पत्रकार मदन चवरे, शेखर म्हेत्रे, बिरुदेव वाघमोडे, अक्षय विद्यागज, हनुमंत माने, समाधान सुतार,शरद भांगे, कुंदन पवार, मोतीलाल सुतार उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक सुरेश माळी, सहशिक्षक चारुदत्त आष्टेकर, सोमनाथ शिंदे, प्रवीण भांगे आर्दीनी परिश्रम घेतले. आभार अमोल खरात यांनी मानले.



### चोपडी येथे शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा

**सांगोला, दि.२३ फेब्रुवारी -**
चोपडी (ता.सांगोला) येथे वक्ते सुनीलबापू लाड यांनी इतिहास सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. यावेळी डॉ.नवनाथ बाबर, पोपट यादव, बाळासाहेब यादव, भिकाजी बाबर, दगडू बाबर, जनार्दन बाबर, दशरथ बाबर उपस्थित होते. मिरवणूकीत बाळासाहेब देसाई कॉलेज व जि.प.प्रा.केंद्र शाळेच्या विद्यार्थ्यांनी मर्दानी खेळ, लेझीम सादर केले. भजनी मंडळानेही साथ दिली. वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी शिवरायांचा इतिहास दृष्टिक्षेपात आणला. कबीर मुलाणी व त्यांच्या सहकाऱ्यांनी पोवाडा व सुभाष बाबर यांनी शिवगौरवपर कविता सादर केली. आर्मीमध्ये निवड झालेल्या व कार्यरत प्रतीक बाबर, प्रदीप खंडागळे, रितेश खंडागळे, अतुल चव्हाण, सुमित बाबर यांचा तसेच प्रगतशील शेतकरी अभिजीत बाबर, गुलाब बाबर, पुरवठा अधिकारी विशाल मेखले यांचा सन्मान झाला. सतीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. राहुल बाबर व सुनील जवंजाळ यांनी सूत्रसंचालन केले. सेवानिवृत्त सुभेदार अमोल बाबर यांनी आभार मानले.

## निधन वृत्त...

### सुनील तोष्णीवाल



**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**
सम्राट चौक भगवती महावीर हौसिंग सोसायटी सुनील बाबुलाल तोष्णिवाल (वय-५३) यांचे सोमवारी (दि. २३) दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक विवाहित मुलगी, १ मुलगी, १ मुलगा, जावई, आई, वडील असा परिवार आहे. अंत्ययात्रा मंगळवार (दि.२४) रोजी ११ वाजता श्रीनाथ भगवती हौसिंग सोसायटी, सम्राट चौकाजवळ, सोलापूर येथून निघणार आहे.

### पार्वती मायनाळ



**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**
कर्णिक नगर येथील श्रीमती पार्वती शिवानंद मायनाळ यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९३ वर्षांचे होते. मरणोत्तर देहदान केले आहे. त्यांच्या पश्चात तीन मुली, जावई व सात नातवंडे १२ परतवंडे असा परिवार आहे.

# उजनीच्या पाण्यावरून ‘दक्षिण’ मध्ये श्रेयवाद

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**
एक महिन्यापासुन भीमा नदी पात्र कोरडे पडले असताना व सर्वच पक्षाचे नेते निवडणुकीत व्यस्त होते. शेतकरी व नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागले होते . यावेळी कोणत्याही पक्षाच्या नेत्यांनी याबाबत विचारणा केली नाही. मात्र निवडणुका संपल्यानंतर सर्वच पक्षाच्या नेत्यांना दक्षिणमधील पाणीटंचाईची जाणीव झाली आणि प्रत्येक पक्षाचा नेता जलसंपदामंत्री व गॉडफादरशी संपर्क साधून उजनी धरणातून भीमा नदीमध्ये पाणी सोडण्याची मागणी केल्याचे सांगत आहे. दोन दिवसांपूर्वी उजनीतून भीमा नदीत पाणी सोडण्यात आले. मात्र या पाण्यावरून दक्षिणमध्ये सध्या राजकीय वातावरण तापले असून सर्वच पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून श्रेय घेण्याचे काम सुरू आहे. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी व काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी उजनी धरणातील पाणी सोडण्यासाठी प्रयत्न केल्याचे सांगण्यात येत आहे.

उजनी धरणाच्या पाण्यावर भीमा नदीचे भवितव्य अवलंबून आहे. उजनी ते सोलापूर जलवाहिनी सुरू झाल्यामुळे भीमा नदी पात्रात पाणी सोडण्यात येणार नाही, अशा प्रकारची चर्चा सुरू आहे. त्यामुळे एक महिन्यापासून सोलापूरचा जॅकवेल व टाकळी परिसरातील भीमापात्र कोरडे पडले आहे. परिणामी परीसरातील दहा ते पंधरा गावांचा पाणीपुरवठा बंद आहे. सादेपूर बंधाऱ्यात पाणी असतानाही बंधाऱ्यांखालील सात ते आठ गावांमधील नागरिक व शेतकरी यांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागले. पशूंच्या चारा व पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे प्रत्येक पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून त्यांच्या नेत्यांमार्फत पाणी सोडण्याची विनंती करण्यात आली. मात्र सादेपूर बंधारा भरला असतानाही कर्नाटक सरकारने महाराष्ट्र सरकारकडून सोडण्यात आलेले पाणी खालच्या बंधाऱ्यांत सोडण्यास नकार दिल्यामुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. याकडे दुर्लक्ष करून सर्वच पक्षांच्या नेत्यांनी उजनी धरणातून पाणी सोडण्यासाठी दबाव सुरू केला. त्यामुळे पाणी नेमकं कोणाच्या प्रयत्नामुळे आले? यापेक्षा शेतकऱ्यांच्या अडचणीच्या वेळी पाणी मिळाले याला महत्त्व आहे. मात्र दक्षिण मधील कार्यकर्त्यांकडून उजनीच्या पाण्यावरून श्रेय घेण्याचे काम सुरू असल्याचे दिसून येत आहे.

दक्षिणमध्ये भीमा नदीकाठावरील गावांसाठी पाणी सोडावे यासाठी आमदार सुभाष देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पाठपुरावा केल्याचे त्यांच्या कार्यकर्त्यांकडून सांगण्यात येत आहे. भीमा पात्र कोरडे पडल्यामुळे लवंगी, औज, कारकल, टाकळी, कुरघोट व इतर अनेक गावातील शेतकऱ्यांनी आमदार सचिन कल्याणशेटी व माजी आमदार दिलीप माने यांची भेट घेऊन पाणी सोडण्याची मागणी केली. आजी-माजी आमदारांनीही मुख्यमंत्री व जलसंपदा मंत्र्यांकडे पाठपुरावा करून उजनीतून पाणी सोडण्यासाठी प्रयत्न केला.

> भीमा नदीतील पाणी संपल्याने नदीकाठावरील शेतकर्यांनी आमदार सचिन कल्याणशेटी यांची भेट घेऊन पाणी सोडण्याची विनंती केली होती. त्यानुसार आमदार कल्याणशेटी यांनी मुख्यमंत्री व जलसंपदामंत्री यांच्याकडे उजनी धरणातून पाणी सोडण्याची मागणी केल्यावर दक्षिणच्या शेतकर्यांसाठी पाणी सोडण्यात आले आहे. **- मळसिध्द मुगळे, पंचायत समिती सदस्य, मंद्रूप**

> आमदार सुभाष देशमुख यांनी मुख्यमंत्री व जलसंपदामंत्री यांच्याशी मोबाईलवरून संपर्क साधून दक्षिणमधील भीमा नदीकाठावरील शेतकर्यांची दयनीय अवस्था सांगितले. त्यानंतर उजनी धरणातून भीमा नदीत पाणी सोडण्यात आले आहे.
> **- नितीन रणखांबे, तालुकाध्यक्ष, भाजपा अनूसूचित जाती मोर्चा, दक्षिण सोलापूर**

## हरियानाप्रमाणे राज्यात ज्येष्ठ नागरिकांना पेन्शन चालू करा;

**सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे आ. पाटलांना निवेदन**

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.२३ फेब्रुवारी-**



हरियाना सरकारने ६५ वर्षावरील वृद्धांना तीन हजार पेन्शन चालू केली आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र सरकारने राज्यातील वृद्धांची हलाखीची परिस्थिती पाहता किमान पाच हजार रूपये दरमहा पेन्शन सुरू करण्याची मागणी आमदार अभिजीत पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

श्रीपूर येथील सेवानिवृत्त कामगार अरुण कुलकर्णी (मार्डीकर) यांनी आमदार पाटील यांचे या गंभीर समस्येकडे लक्ष वेधत ज्या कामगारांनी ३५ ते ४० वर्ष कारखान्यात वा उद्योगात कष्ट केले ते कर्मचारी आज तुटपुंज्या पेन्शनवर आपले वार्धक्य व्यतीत करीत आहेत. त्यासाठी आमदार पाटील यांनी येत्या अर्थसंकल्पावरील अधिवेशनात तरतुदीसाठी प्रयत्न करावेत असे निवेदनात म्हटले आहे. साखर कारखाने, विद्युत मंडळ, एस.टी. महामंडळ, शेती महामंडळ, यातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना ईपीएस-९५ ही पेन्शन योजना चालू आहे.

या योजनेतून किमान १००० व कमाल ३५०० अशी रक्कम सेवा निवृत्त कामगारांना मिळत आहे. महागाईमुळे तसेच वृद्धापकाळी उद्धावणारे आजार व त्यांचे औषधांच्या रकमेची सांगड घालणे अतिशय कठीण आहे.

गेल्या ११ वर्षापासून कर्नल अशोक राऊत हे दिल्ली येथे किमान ७५०० रु. पेन्शन मिळावी या मागणीसाठी आंदोलन करीत आहेत. परंतू केंद्र सरकारकडून या मागणीला प्रतिसाद नाही.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः माणकेश्वर तालुका भूम व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- ङि धाराशिव सब ङि व ता. भुमपैकी मौजे माणकेश्वर येथील घरजागा ग्रामपंचायत मिळकत नं. २५ याचे क्षेत्र १०३१.२५ चौ. फुट यांसी चतुःसिमा पुर्वेस - नागनाथ चिखले, दक्षिणेस - हमजा शेख, पश्चिमेस - शांतिलिग चिखले व इतर व उत्तरेस - बोळ व मशिद येणेप्रमाणे वर्णनाची खुली घरजागा ही श्री. केरबा विठ्ठल चिखले यांचे मालकीची असून सदरची जागा हक्कपत्रकी त्यांचे नांवे नोंद आहे. श्री. केरबा विठ्ठल चिखले हे सदरची मिळकत आपला मुलगा श्री. संकेत केरबा चिखले यांच्या नांवे हस्तांतरीत करुन सदर मिळकत बँकेस तारण देऊन त्यावर कर्ज घेऊ इच्छितात. तरी सदर मिळकतीवर कोणचेही कसलेही हक्क हितसंबंध, उदा. गहाण, दान, लीज, लीन, पोटगी, चोळी, बांगडी, टाच, बोजा, अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आमचे वकिलांना वर दिलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष भेटुन कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबीत करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील हे. सदर मिळकतीशी कोणाचाही, कसलाही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही व असल्यास त्याने तो स्वखुशीने सोडून दिलेला आहे, असे समजून सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून सदरची मिळकत आपल्या मुलाच्या नांवे खरेदीखताने अथवा बक्षीसपत्राद्वारे अथवा अन्य मार्गाने हस्तांतरीत करतील. सदरचा हस्तांतरणचा दस्त नोंदणीकृत झाल्यानंतर कोणची कसलीही हरकत आल्यास ती आमचे अशिलांच्या हक्काधिकारांवर बंधनकारक राहणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये, म्हणून ही खरेदीपूर्व हस्तांतरणपूर्व जाहीर नोटीस दिली असे. कळावे.

दिनांक - २३/०२/२०२६

सही/-
**ॲड. प्रवीण परशुराम करंजकर**
पाटील प्लॉट, कर्मवीर नगर, बार्शी
मो. नं. ९८२२०६५६६१

## IDFC FIRST Bank Limited

IDFC FIRST Bank
(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

### वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 85861379 | मालमत्तेवर कर्ज | 1. राहुल रामदास गडदे<br>2. मंगल रामदास गडदे | 30/01/2026 | INR 3,77,107.77/- |

**मालमत्तेचा पत्ता:** ग्रामपंचायत मिलकट क्रमांक २७७/१ वर, १०५०.०० चौरस फूट म्हणजेच ९७.५८ चौरस मीटर आरसीसी घर बांधणी क्षेत्रफळाचा सर्व भाग आणि पार्सल, गाव: वानेवाडी, ग्रामपंचायत: वानेवाडी येथे स्थित, उपनिबंधक बार्शी यांच्या अधिकारक्षेत्रात, तालुका: बार्शी, जिल्हा: सोलापूर, श्री. राहुल रामदास गरदरे यांच्या मालकीची मालमत्ता आणि पूर्वेला सीमा: नामदेव गायकवाड यांचे मिलकट, पश्चिमेला कृष्णा यादव यांचे मिलकट, उत्तर: ग्रामपंचायत रोड, दक्षिणेला शेतीची जमीन.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 166828468 | मालमत्तेवर कर्ज | 1. सागर अनिरुध्द बादले<br>2. सुधामती अनुरथ बादले | 11/02/2026 | INR 9,99,556.14/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिलकट क्रमांक ६९६ असलेले निवासी घराचे सर्व भूखंड आणि पार्सल, दगड, विटा आणि कॉंक्रीटने बांधलेले निवासी घर ज्याचे बांधकाम क्षेत्रफळ = १००० चौरस फूट आणि एकूण जमीन क्षेत्रफळ = ४३५६ चौरस फूट. मौजे येथे स्थित: नारी, तालुका: बार्शी, जिल्हा: सोलापूर, सोलापूर, महाराष्ट्र-४१३४०४. आणि पूर्वेला: कुबीर दिडवाल, पश्चिमेला: राजेंद्र बडाले, उत्तर: रस्ता, दक्षिणेला: रस्ता

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 96884320 | मालमत्तेवर कर्ज | 1. सुशील कृष्णा गायकवाड<br>2. अर्चना सुशील गायकवाड | 04/02/2026 | INR 5,29,396.24/- |

**मालमत्तेचा पत्ता :** दगड, विटा आणि कॉंक्रीटने बांधलेल्या निवासी घराचा तो सर्व तुकडा आणि पार्सल, ज्याचे क्षेत्रफळ तळमजला = २२५०.०० चौ. फूट. एकूण बांधलेले क्षेत्रफळ = १८७५.०० चौ. फूट., चाळे ता. पंढरपूर, जिल्हा सोलापूर येथे स्थित आहे आणि ग्रामपंचायत चाळेच्या रजिस्टरमध्ये मालमट्टा क्रमांक ११७९ येथे नोंदणीकृत आहे. एकूण जमीन क्षेत्रफळ २२५० चौ. फूट आहे आणि त्याची सीमा: उत्तर: ग्रामपंचायत रोड चाळे, दक्षिण: प्रताप पांडुरंग गायकवाड, पूर्व: गट क्रमांक ७०७/३सी, पश्चिम: ग्रामपंचायत रोड चाळे.

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीला आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे देय रक्कम वसूल करण्यासाठी वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेडम्हणून ओळखले जाते)**

दिनांक : **24/02/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
फोन नं-०२१७-२६२२९४४/२६२२९३३

### विक्री सुचना

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ मधील नियम ८ (६) व ९ नुसार स्थावर मालमत्तेची निविदा मागवून विक्री करण्याची सुचना**

येथे सूचना देण्यात येते कि, या ठिकाणी नमूद करण्यात आलेली स्थावर मिळकत ज्याचा ताबा सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अक्ति २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ नुसार घेण्यात आलेला असून निविदा मागवून मालमत्तेची विक्री करण्यात येत आहे. खाली नमूद केलेल्या मालमत्तेची विक्री पुढील अटी आणि शर्तीनुसार करण्यासाठी इच्छुक निविदादाराकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| **कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता** | **कर्जदार :**<br>१) हॉटेल त्रिशूल प्रोपाः अबेदा यासिर बागवान<br>राः गट नं. २१३, पाकणी, सिमको स्पिनिंग मिल, पुणे रोड, सोलापूर<br>**जामीनदार :**<br>२) नासीर अय्युब बागवान<br>३) यासीर अय्युब बागवान<br>दोघे रा : ७६४, शुक्रवार पेठ, सोलापूर |
| **कर्ज खाते क्र.** | ००४००३२१७००००४५ |
| **थकीत कर्ज रक्कम** | एकूण रक्कम रुपये ९,९८,५५५/- (अक्षरी रु. नऊ लाख अठ्ठाणव हजार पाचशे पंचाव्वन फक्त ) + दि. ०१/०४/२०२२ पासून १५% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + नोटीस व कोर्ट खर्च + इतर खर्च |
| **मागणी नोटीस दिनांक** | २१/०४/२०२२ |
| **ताबा घेतलेली दिनांक** | २५/०८/२०२२ |
| **तारण मालमत्ता तपशील** | डी डी. व सब. डी. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दवाड मधील कसबे सोलापूर येथील सर्वे नं. ११५/१/ब मधील जय प्रकाश नारायण नगर यातील प्लॉट नं. ३ याचे क्षेत्र ९२.९३ चौ. मी. (ऑनलाईन उताऱ्याप्रमाणे क्षेत्र ०.००.९३ हे. आर. चौ. मी.) व प्लॉट नं. ४ याचे क्षेत्र ९२.९३ चौ. मी. (ऑनलाईन उताऱ्याप्रमाणे क्षेत्र ०.००.९३ हे. आर. चौ. मी.) ऑनलाईन उताऱ्याप्रमाणे प्लॉट नं. ३ व ४ चे एकूण क्षेत्र ०.०१.८६ हे. आर. चौ. मी. यांची एकत्रित चतुःसीमा येणेप्रमाणेः पूर्वेस - प्लॉट नं. १ व २, पश्चिमेस प्लॉट - नं. ५ व ६, उत्तरेस - मुळेगाव रस्ता, दक्षिणेस - रस्ता |

**राखीव किंमत :-** रु. ८,८५,०००/- (रु. आठ लाख पंचाऐंशी हजार फक्त)

**बयाणा रक्कम :-** रु. ८८,५००/- (रु. अठ्याऐंशी हजार पाचशे फक्त)

**निविदा स्वीकृतीची तारीख आणि वेळ :-** दि. ११/०३/२०२६ - दुपारी ३:०० पर्यंत

**निविदा दाखल करण्याचे ठिकाण :-** मुख्य कार्यालय ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२

**अ) निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ :** दि. १२/०३/२०२६ - सायंकाळी ५:०० वाजता
**ब) निविदा उघडण्याचे ठिकाणः** मुख्य कार्यालय ६०/६१ पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२

**इतर अटी आणि शर्ती :-**
१) स्थावर मालमत्तेची विक्री **‘जेथे आहे, तशी आहे’** या तत्वावर आणि जर काही बोजा असेल तर त्यासह करण्यात येईल. (बँकेकडील माहितीनुसार मालमत्तेवर बोजा नाही)
२) राखीव किंमतीपेक्षा कमी किंमतीस मालमत्तेची विक्री केली जाणार नाही.
३) मालमत्तेची पाहणी दिनांक ०९/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी ४:०० पर्यंत करता येईल.
४) इच्छुक प्रस्तावकाने त्यांची निविदा मोहोरबंद पाकिटात त्यावर **‘बागवान यांची जय प्रकाश नारायण नगर येथील मालमत्ता खरेदीसाठी निविदा’** असे लिहून बयाणा रक्कम अनामत रक्कमेपोटी (ईएमडी) **रु. ८८,५००/-** जी राखीव किंमतीच्या अंदाजे १० टक्के आहे. **श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली.,** सोलापूर यांच्या नावे काढलेली डिमांड ड्राफ्टसह /आर.टी.जी.एस. इत्यादीद्वारे दिनांक ११/०३/२०२६ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत सादर करावी.
५) यशस्वी प्रस्तावकाच्या नावे विक्रीचा व्यवहार कर्ज देणाऱ्या बँकेच्या अनुमतीनंतर पूर्ण केला जाईल.
६) यशस्वी प्रस्तावकाने विक्रीच्या किंमतीच्या २५ टक्के रक्कम (आधी जमा केलेल्या बयाणा रक्कमेसह) विक्रीचा व्यवहार त्याचाशी झाल्यानंतर त्वरित आणि उर्वरित रक्कम १५ दिवसाच्या आत जमा करावयाची आहे. जर प्रस्तावकाने नमूद केल्यानुसार विक्रीची रक्कम जमा केली नाही तर त्याने जमा केलेली अनामत रक्कम जप्त होईल.
७) व्यवहारासाठी लागणारा अन्य खर्च, स्टॅम्प ड्यूटी, नोंदणी फी, इतर खर्च यशस्वी प्रस्तावकाने भरावयाचा आहे.
८) प्राधिकृत अधिकाऱ्याने कोणतेही कारण न देता लिलाव पुढे ढकलणे/रद्द करणे किंवा अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा संपूर्ण अधिकार राखून ठेवला आहे.
९) अधिक तपशीलासाठी मोबाईल क्र. ७०२०८३३०६० व कोणत्याही कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधता येईल.

**दिनांक : २३/०२/२०२६**
**स्थळ : सोलापूर**

सील

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**

## अुत्तम सेवा — मंगळवार दि. २४ फेब्रुवारी २०२६ — नोकरीच्या शोधात

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| **१)** | **भारतीय रेल्वे, RRB** | | | |
| १ | असिस्टंट/पॉइंट्समन/ ट्रॅकमन/ट्रॅकमेंटेनर (२२१९५) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | ३३ पर्यंत | ०२/०३/२६ |
| **२)** | **छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका** | | | |
| १ | कनिष्ठ अभियंता (३२ पदे) | पदवी (सिव्हील) उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | |
| २ | अग्निशामक (१०० पदे) | दहावी व अग्निशामक कोर्स उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| ३ | स्थापत्य अभि. निरीक्षक (२४ पदे) | डिप्लोमा (सिव्हील) किंवा संबंधित स्थापत्य अभियांत्रिकी कोर्स असावा | ३८ पर्यंत | १८/०३/२६ |
| ४ | स्वच्छता निरीक्षक (१२ पदे) | पदवी व संबंधित डिप्लोमा उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| ५ | रोखपाल (१२ पदे) | B.Com व इंग्जी-मराठी टायपिंग उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| **३)** | **केंद्रीय लोकसेवा आयोग, UPSC** | | | |
| १ | संयुक्त केंद्रीय सशस्त्र पोलीस दल (असिस्टंट कमांडंट) परीक्षा २०२६- (३४९ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | २५ पर्यंत | १२/०३/२६ |

**✲ मोफत सरकारी अपडेट ✲**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉट्सॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला "जॉईन" असा मेसेज व्हॉट्सॲप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| **४)** | **फेडरल बँक** | | | |
| १ | असोसिएट ऑफिसर | पदवी स्त्री/पुरुष उमेदवार असावे | २७ पर्यंत | ०४/०३/२६ |
| **५)** | **इंडियन आर्मी, (सैन्य भरती मेळावा - सोलापूर)** | | | |
| १ | अग्निवीर GD | दहावी (४५%) गुणांसह उत्तीर्ण असावे | २२ पर्यंत | |
| २ | अग्निवीर ट्रेड्समन | दहावी उत्तीर्ण असावे | २२ पर्यंत | ०१/०४/२६ |
| ३ | अग्निवीर क्लार्क | बारावी (६०%) गुणासह उत्तीर्ण असावे | २२ पर्यंत | |
| ४ | अग्निवीर टेक्निकल | बारावी (६०%) गुणासह उत्तीर्ण असावे | २२ पर्यंत | |
| **६)** | **रिझर्व बँक ऑफ इंडिया, RBI** | | | |
| १ | असिस्टंट (६५० पदे) | पदवी (५०%) गुणासह उत्तीर्ण असावे | २८ पर्यंत | ०८/०३/२६ |
| **७)** | **पंजाब नॅशनल बँक, PNB** | | | |
| १ | ॲप्रेंटिस (५१३८ पदे) | पदवी स्त्री/पुरुष उमेदवार असावे | २८ पर्यंत | २४/०२/२६ |

**सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.**
**२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)**
**३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.**

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा
१) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१.
www.uttamseva.org

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## पंचायत समितीचा वरिष्ठ सहाय्यक सुंदरराव नागटिळक एसीबीच्या जाळ्यात

**माळशिरस, दि. २३ फेब्रुवारी -** माळशिरस पंचायत समितीतील वरिष्ठ सहाय्यक सुंदरराव नागटिळक (वय ५६ वर्ष ) यास आज पाच हजाराची रुपयाची लाच घेताना पुणे येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. याबाबत मिळालेली माहिती अशी की तक्रारदार यांनी धर्मपुरी येथे सभा मंडपाचे काम घेतले होते ते पूर्ण केल्यानंतर सदरच्या कामाचे बिल सोलापूर कार्यालयाकडे दाखल केले होते सदरचे बिल सोलापूर येथून माळशिरस पंचायत समिती कार्यालयाकडे आल्यानंतर सभामंडपाचे काम पूर्ण झाल्याचा दाखला गटविकास अधिकारी यांच्याकडून मिळवून देण्यासाठी वरिष्ठ सहाय्यक सुंदरराव नागटिळक यांनी तक्रारदाराकडे दहा हजार रुपयाची मागणी केली होती.या बाबत तक्रारदार यांनी पुणे येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती.त्यानुसार आज पंचायत समिती कार्यालयात दुपारी दोनच्या सुमारास तडजोडी अंती दाखला देण्यासाठी पाच हजाराची रक्कम स्वीकारताना नागटिळक यांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले.या प्रकरणी लाचलुचपत विभागाने गटविकास अधिकारी यांची पडताळणी केली असता त्या पडताळणीत काहीही आढळून आले नाही .आरोपी नागटिळक विरोधात गुन्हा दाखल करून तो सोलापूर लाचलुजपत प्रतिबंधक विभागाकडे सदरचा गुन्हा वर्ग करण्यात येणार आहे. सदरची कारवाई पुणे लाचलितपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक खंडेराव रंजवे, महिला पोलीस कॉन्स्टेबल माकर, पोलीस कॉन्स्टेबल तावरे, कुमकर व चालक दिवेकर यांनी केली. ग्रामसेविका लाच घेताना पकडल्याची घटना ताजी असतानाच पंचायत समिती दुसरा अधिकारी पकडला गेला आहे.

## महाविरणच्या मनमानी धोरणामुळे
# पीएम सौरघर योजनेच्या ग्राहकांना फटका

### पोर्टलवरील मंजुरी ग्राहकांच्या मागणीनुसार करण्याची सोलर असोसिएशनची मागणी






**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**
महाराष्ट्रात महावितरणच्या मनमानी धोरणामुळे पी. एम. सौरघर योजनेच्या ग्राहकांना फटका बसत आहे. हे टाळण्यासाठी महावितरण पोर्टलवरील सौर-सिस्टीमची मंजुरी ग्राहकांच्या मागणीनुसार करण्यात आली, अशी मागणी सोलार असोसिएशन ऑफ सोलापूरचे अध्यक्ष गिरीश तिवारी यांनी पत्रकार परिषदेत केली.

महावितरणकडून अंमलात आणण्यात आलेल्या चुकीच्या नव्या धोरणात्मक बदलांमुळे राज्यातील जवळपास १०० टक्के निवासी सोलर ग्राहकांवर प्रतिकूल परिणाम होणार आहे. १३ फेब्रुवारीपासून पीएम सूर्यघर योजनेअंतर्गत सोलर क्षमतेच्या मंजुरीसंदर्भात बदल करण्यात आल्याने अनेक ग्राहकांना अपेक्षित क्षमतेची सोलार परवानगी मिळत नाही. पूर्वीच्या नियमांनुसार ग्राहकांना त्यांच्या वीज वापराच्या गरजेनुसार सोलर प्रकल्प उभारण्याची मुभा होती. मात्र नव्या नियमांनुसार ग्राहकांच्या मागील १२ महिन्यांच्या सरासरी वीज वापरावर आधारित मर्यादित क्षमतेलाच मंजुरी दिली जात आहे. परिणामी ज्या व्याहकांनी सोलार सिस्टमसांठी ऑर्डर दिलेले आहेत त्यांपैकी ९० टक्क्यांहून अधिक ऑर्डर प्रलंबित होतील.

संघटनेच्या मते, महाराष्ट्रातील वीज दर तुलनेने जास्त असल्याने ग्राहक सोलर पर्यायाकडे वळत आहेत. घरांमध्ये एसी, इलेक्ट्रिक वाहन, इंडक्शन कुकर, आधुनिक उपकरणे यांचा वापर वाढत असून भविष्यातील गरजा लक्षात घेऊन ग्राहक जास्त क्षमतेचे सोलर प्रकल्प बसवू इच्छितात. मात्र सध्याच्या मयदिमुळे त्यांना आवश्यक त्या प्रमाणात वीज निर्मिती करता येणार नाही.

विशेष म्हणजे, केंद्र सरकारच्या पीएम सूर्यघर योजनेअंतर्गत चछ्ठए कडून १० किलोवॅटपर्यंत ऑटो लोड एक्स्टेंशनची सवलत दिली गेली असताना महाराष्ट्रात त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नसल्याची तक्रार संघटनेने केली आहे. त्यामुळे सोलर मंजुरीची गती मंदावली असून उद्योग व व्यावसायिक क्षेत्रालाही याचा परिणाम होत आहे.

नव्या नियमांमुळे ग्राहकांच्या प्रलंबित अर्जावर परिणाम होईल, तसेच सोलर विक्रेत्यांचा व्यवसाय गंभीरपणे बाधित होईल. राज्यात पीएम सूर्यघर योजनेअंतर्गत दरमहा सुमारे ५० हजार घरे सोलर स्वीकारत असून देशातील एकूण सोलर स्वीकृतीत महाराष्ट्राचा सुमारे २५ टक्के वाटा आहे. नव्या धोरणामुळे हा वेग मंदावण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. यामुळे सोलार वेंडर्स कर्जबाजारी व दिवाळखोर होतील, लाखोंच्या संख्येने युवक बेरोजगार होतील. सद्यस्थितीमध्ये ग्राहकांनी बुकींग केलेले ऑर्डर्स मोठ्या प्रमाणात अडकून राहतील. या बदलांमुळे बँकींग इन्स्टिटयूटवरदेखिल परिणाम तसेच महाराष्ट्राला मिळणारे महसूल कमी होणार आहे.या आदेशामुळे संघटनेने कामबंद आंदोलन सुरू केले. हे लक्षात घेता संबंधित आदेश तात्काळ मागे घेवून महावितरण पोर्टलवरील सौर-सिस्टीम मंजूरी ही ग्राहकांच्या मागणीनुसार असावी अशी मागणी दोन्ही संघटनांतर्फे करण्यात आली. मागणीची दखल न झाल्यास राज्यव्यापी आंदोलन करण्याचा इशारा या संघटनांनी दिला आहे.

पत्रकार परिषदेस शशिकांत जमादार, बाबूलाल शेख, गुरुराज कुलकर्णी आदी उपस्थित होते.

## महत्वाचे...




### एसपीएम स्कूलमध्ये आजी-आजोबा मेळावा

**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**
शिक्षण प्रसारक मंडळी सोलापूर संचलित एसपीएम इंग्लिश स्कूलमध्ये आजी-आजोबा मेळावा आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमामुळे शाळेचा परिसर प्रेम, आपुलकी आणि कौटुंबिक जिव्हाळ्याने फुलून गेला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शोभा पुराणिक व सिद्राम पुराणिक होते. प्रमुख पाहुणे व आजी-आजोबांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून सरस्वती वंदना घेण्यात आली. प्राचार्या संगीता कोळी यांनी प्रास्ताविक केले. यावेळी विद्यार्थ्यांनी आजी-आजोबांवर आधारित सुंदर नाटिका सादर केली. प्रिशा डीसले हिने आजी-आजोबांविषयी कृतज्ञतेची भावना व्यक्त केली. कार्यक्रमात विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. संगीत खुर्ची, जुन्या गाण्यांवर आधारित प्रश्नमंजुषा,गाणे सादरीकरण व स्पर्धांमध्ये आजी-आजोबांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विजेत्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. यावेळी शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन श्राव्या कांबळे आणि ओम कुंभार यांनी केले तर आभार शाल्वी कॉम्पेली हिने मानले.

### शाळा गुणवत्ता मूल्यमापन योजनेत सिंहगड पब्लिक स्कूलला 'अ' प्लस श्रेणी

**सोलापूर, दि.२३ फेब्रुवारी-**
महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा अंतर्गत केगाव येथील सिंहगड पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज या शैक्षणिक संस्थेला 'अ' प्लस श्रेणी प्राप्त झाली आहे. या उल्लेखनीय यशामुळे शाळेचा लौकिक सोलापूर जिल्ह्यासह राज्यस्तरावर उंचावला आहे. सोलापूरला एसक्यूएफ अंतर्गत ही श्रेणी मिळाली. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे सखोल बाह्य मूल्यमापन करण्यात आले. शैक्षणिक गुणवत्ता, अध्यापन पद्धती, विद्यार्थीकेंद्रित उपक्रम, शालेय व्यवस्थापन, पायाभूत सुविधा तसेच सहशालेय व क्रीडा उपक्रम या सर्व निकषांवर शाळेने उत्कृष्ट कामगिरी केल्याने तिला 'अ' प्लस श्रेणी बहाल करण्यात आली. या यशामागे सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव व सिंहगड शिक्षण संकुल, केगाव, सोलापूरचे संकुल संचालक संजय नवले यांचे कुशल मार्गदर्शन लाभले. तसेच शाळेच्या प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक यांच्या सामूहिक प्रयत्नांचे हे फलित आहे. या यशामुळे परिसरातील शैक्षणिक क्षेत्रात सिंहगड पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेजचा मान अधिक उंचावला असून, संपूर्ण सोलापूर जिल्ह्यासाठी ही अभिमानाची बाब असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शाळा सदैव कटिबद्ध राहील, असे संजय नवले यांनी सांगितले.


### कृषी पुरस्कारांसाठी ऑनलाईन अर्ज करा; कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले

**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**
शेती पूरक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, महिला, व्यक्ती व संस्थांचा सन्मान दरवर्षी राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत विविध प्रतिष्ठित पुरस्कारांनी केला जातो. सन २०२५ पासून हे सर्व पुरस्कार अर्ज ऑनलाइन पद्धतीने स्वीकारले जाणार आहेत. या पुरस्कारांमध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), युवा शेतकरी पुरस्कार तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठीचा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार यांचा समावेश आहे. हे पुरस्कार राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते प्रदान केले जातात. आयुक्त कृषी यांनी इच्छुक शेतकरी, व्यक्ती व संस्थांना २०२५ पासूनचे अर्ज ऑनलाइन सादर करण्याचे आवाहन केले आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनीही शेतकऱ्यांनी तात्काळ अर्ज करावेत, असे आवाहन केले आहे.

## बायकोचा सासरी येण्यास नकार; पतीची आत्महत्या

### व्हिडिओ करत संपवले जीवन



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**
पत्नी नांदायला येत नसल्याने निराश झालेल्या पतीने राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार सोलापुरमध्ये घडला आहे. प्रेम अंकुश जाधव असं या तरुणाचे नाव आहे. आत्महत्येपूर्वी पतीला ऑडिओ तसेच व्हिडिओ संदेश पाठवला अन् त्याने मृत्यूला कवटाळले. या धक्कादायक घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, सोलापुरात पत्नीला नांदवण्यास न पाठवल्याने निराश झालेल्या पतीची व्हिडिओ करून आत्म हत्या केल्याची भयंकर घटना घडली आहे. मध्यरात्री बाराच्या सुमारास घराच्या वाश्याला साडीच्या साह्याने तरुणाने आयुष्य संपवले. अचानक आवाज आल्याने दुसऱ्या खोलीतील भावाने पळत येऊन वाचवण्याचा प्रयत्नही केला, त्यानंतर त्याला सिव्हिल रुग्णालयात नेण्यात आले तिथे डॉक्टरांनी मृत घोषित केले. तळे हिप्परगा येथील प्रेम अंकुश जाधव याचा एका वर्षापूर्वी प्रेम विवाह झाला होता.

दोन महिन्यांपूर्वी त्याला एक मुलगीही झाली. मुलीच्या डिलिव्हरीसाठी त्याची पत्नी माहेरी गेली होती. मात्र ती पुन्हा सासरी येण्यास नकार देत होती. मात्र दोन महिने होऊन गेले तरी पत्नी नांदवण्यास येत नसल्यामुळे प्रेम तणावात होता. तो तिला होळीच्या सणाला बोलावत होता, मात्र ती नकार देत होती. यामुळेच निराश झालेल्या प्रेमने टोकाचे पाऊल उचलले. आत्महत्येआधी त्याने व्हिडीओ केला. त्यामध्ये तो मुलगीला फ्लाईंग किस देताना दिसत आहे. सोबतच त्याने पत्नीला एक ऑडिओ संदेशही पाठवला होता. या संदेशामध्ये तो म्हणतो मी किती दिवस फोन करतोय, तू माझ्या लेकराचे तोंड दाखवत नाहीस. माझ्या शब्दाला मान न देता तू तुझ्या आईचंच ऐकत आहेस. माझ्याकडे काही चुकलं असेल तर माफी मागतो. माझ्या लेकराला चांगलं सांभाळ, चांगलं वळण लाव. तसेच तुला दुसरं लग्न करायचं असेल तर कर मला काही फरक पडत नाही. माझ्या मुलीला नीट सांभाळ, माझ्या मयतीलाही येऊ नका, असं तो म्हणत आहे. दरम्यान, प्रेम विवाह अन् वर्षभरातच त्याचा असा दुर्दैवी शेवट झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## सावरकर पुण्यतिथीनिमित्त आजपासून व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २३ फेब्रुवारी-**
येथील सावरकर प्रेमी मंडळ संचलित सावरकर मुक्तव्दार वाचनालयातर्फे स्वा.सावरकर पुण्यतिथी निमित्त दरवर्षी प्रमाणे याही वर्षी व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आलेले आहे. ही व्याख्यानमाला मंगळवार (दि.२४ फेब्रुवारी ) ते गुरुवारी (दि.२६ फेब्रुवारी ) या कालावधीत आयोजिण्यात आल्याची माहिती सावरकर प्रेमी मंडळाचे अध्यक्ष मोहन मंगळवेढेकर यांनी दिली.

मंगळवारी (दि.२४) पुणे येथील मयुर भावे यांचे महायोगी अरविंद या विषयावर व्याख्यान होणार आहे. प्राचीन भारतीय विद्यापीठे या विषयावर पुणे येथील श्वेता काजळे या बुधवारी (दि.२५) मार्गदर्शन करणार आहेत. या बरोबरच पंढरपूर येथील सेवानिवृत्त प्राचार्य मिलींद परिचारक यांचे गुरुवारी (दि.२६) एक सर अनेक स्वर या विषयावर मार्गदर्शन होणार आहे. दरम्यान ही सर्व व्याख्याने येथील स्वा.सावरकर क्रांतिमंदिर, सावरकर पथ येथे दररोज सायंकाळी सहा वाजता होणार आहेत.

### पुतळ्याचे पूजन

सावरकर पुण्यतिथी निमित्त येथील सावरकर चौकातील स्वा. वि.दा.सावरकरांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे पुजन गुरुवारी (दि.२६) सकाळी ८.३० वाजता करण्यात येणार आहे.

## पोलीस मुख्यालयाशेजारील अनधिकृत ८० खोक्यांवर हातोडा



### अतिक्रमण प्रतिबंधक विभागाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ फेब्रुवारी-**
शहरातील अशोक चौक, पाथरूट चौक परिसरातील सोलापूर पोलीस मुख्यालय वसाहतीच्या संरक्षक भिंतीलगत अनधिकृतरित्या उभारण्यात आलेले अनधिकृत सुमारे ७० ते ८० खोके जेसीबीच्या साह्याने जागेवरच निष्काशीत करण्यात आली. महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने आज सकाळी ही मोठी कारवाई करण्यात आली.

सोलापूर महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने ही धडक मोहीम राबवित परिसरातील अतिक्रमणांवर कारवाई केली. गेल्या काही महिन्यांपासून संबंधित ठिकाणी पत्रा शेड मारून टपऱ्या व खोके उभारण्यात आले होते. यामुळे वाहतूक कोंडी वाढत होती. पोलीस मुख्यालय परिसरातील सार्वजनिक जागेत अडथळा होत असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे सातत्याने येत होत्या. या पार्श्वभूमीवर या विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी नियोजनबद्ध पद्धतीने कारवाई हाती घेतली.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंम्बासे यांच्या आदेशानुसार नियंत्रण अधिकारी तपन डंके यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी परिसर सील करत खबरदारी घेतली. काही व्यावसायिकांनी कारवाईला विरोध करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली. कारवाईदरम्यान अनधिकृत खोके हटवून जागा मोकळी करण्यात आली.




## अश्विनी रुग्णालयाचा वर्धापन दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**
मल्टी स्पेशालिटी अश्विनी सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र नियमित ४४ वा वर्धापन दिन उत्साहाने साजरा करण्यात आला.

सुरुवातीस डॉ. श्री. व सौ. नम्रता आपटे यांच्या हस्ते श्री सत्यनारायण महापूजा करण्यात आली. तद्वंतरचेअरमन बिपीन पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली मा.व्हा.चेअरमन डॉ.विजय पाटील, संचालक चंद्रशेखर स्वामी, संचालक अशोक लांबतुरे, मा.संचालक श्री.विलास पाटील, वैद्यकीय अधिक्षक डॉ. प्रशांत औरंगाबादकर, प्रशासकीय अधिकारी सचिन बिज्जरगी यांच्या हस्ते मेल वॉर्ड, गायनेक वॉर्ड व बालरुग्ण विभागातील रुग्णांना फळेवाटप करण्यात आले. संस्थेच्या ४४ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून अश्विनी सहकारी रुग्णालय कामगार युनियन यांच्या सहकार्याने रुग्णालयामध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ७५ इतक्या रक्तदात्यांनी रक्तदान केलेले आहे. या शिबिराकरिता अश्विनी ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय यांच्या रक्तपेढीचे सहकार्य लाभले.

## सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील साहित्यिक पुरस्कारांचे वितरण




**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २३ फेब्रुवारी-**
येथील श्री विजय गणेशोत्सव मंडळ ट्रस्ट यांच्यावतीने साहित्यातील उल्लेखनीय योगदानाबद्दल मानाचे सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील साहित्यिक पुरस्कार- २०२६ चे वितरण माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते झाले.

सहकार महर्षी साखर कारखान्याच्या उदय सभागृहात सदरचा पुरस्कार सोहळा पार पडला. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचा सहकार महर्षी विशेष जीवनगौरव पुरस्कार प्राचार्या आसावरी शिंदे कदम यांनी स्विकारला. ग्रामीण जीवनाचे वास्तव मांडणारे प्रख्यात कादंबरीकार डॉ. सदानंद देशमुख यांना विशेष पुरस्कार व संवेदनशील कवी आणि लेखक नारायण सुमंत यांना साहित्यिक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. रोख रक्कम, सन्मानचिन्ह, फेटा, हार, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी अकलूज बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील, आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, सत्यप्रभादेवी मोहिते पाटील, पुरस्कार समितीच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील, नगराध्यक्षा रेश्मा अडगळे, ॲड. नितीन खराडे उपस्थित होते.

प्रस्ताविकात स्वरूपाराणी मोहिते पाटील म्हणाल्या, विजयदादांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या पुरस्कार सोहळ्याचे हे चौथे वर्ष आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात पुन्हा वाचन संस्कृती रुजावी व साहित्य क्षेत्रात कार्यरत असणाऱ्यांना प्रोत्साहन मिळावे. हा या सोहळ्याचा उद्देश आहे. कवि नारायण सुमंत म्हणाले, माझे बालपण संपन्न व समृध्द असणार्या अकलूजला गेले असल्याने साहित्यात व्यक्त होणारे सर्व प्रकार मला याच मातीतून मिळाले. माणूस संवेदनशील होत नाही तोपर्यंत तो समाजभिमुख होत नाही. शक्यतांचा शोध घेणे म्हणजे शिक्षण असल्याचे सांगून यावेळी त्यांनी बदलती शिक्षण पद्धती, निवडणुका, प्रचार यावर विडंबन गितेही सादर केली.

कादंबरीकार डॉ. सदानंद देशमुख म्हणाले, माझी आई आणि वडील व सभोवतालचा परिसर यामुळे माझ्यातील लेखक जन्माला आला. कलेचे माहेरघर असणाऱ्या अकलूजमध्ये सहकार महर्षींच्या नावे मिळालेला पुरस्कार हा आमच्यासाठी आनंद व प्रेरणा देणारा असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी रोहित देशमुख यांच्या कोलाहालाचे कोलाज या कविता संग्रहाचे प्रकाशन उपस्थितांच्या हस्ते झाले. प्रा.आसावरी शिंदे यांनी ही मनोगत व्यक्त केले. विनायक सूर्यवंशी यांनी सूत्रसंचालन केले. आभार रोहित देशमुख यांनी मानले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## महत्वाचे...




लक्ष्मण गायकवाड   आप्पासाहेब हिप्परगे

### आप्पासाहेब हिप्परगे, लक्ष्मण गायकवाड यांची निवड

**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**
भारतीय जनता पार्टी सोलापूर शहर उपाध्यक्षपदी माजी नगरसेवक व माजी परिवहन समिती सभापती लक्ष्मण गायकवाड यांची तर शहर अनुसूचित जमाती मोर्चाच्या अध्यक्षपदी आप्पासाहेब हिप्परगे यांची नियुक्ती करण्यात आली. या निवडीचे पत्र भाजपा शहर अध्यक्षा रोहिणी तडवळकर यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी नगरसेवक रुद्रेश बोरामणी, नगरसेविका सुनीता कामाठी, नगरसेवक ज्ञानेश्वर म्यालकल, नगरसेवक अक्षय अंजीखाने, नगरसेवक ऋषिकेश मेट्रे, सरचिटणीस सुधा आळीमोरे, माजी नगरसेविका इंदिरा कुडक्याल, विजया वड्डेपल्ली, मंडल अध्यक्ष नागेश सरगम, भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष विजय कुलथे, भाजपा ओबीसी मोर्चा विजय महिंद्रकर, नागेश गंजी, राहुल पाटील उपस्थित होते.

### इदारे-ए-बेगम बाजारच्या अध्यक्षपदी हाजी तौफीक हत्तुरे

**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**
भारतीय जनता पार्टी सोलापूर शहर उपाध्यक्षपदी माजी नगरसेवक व माजी परिवहन समिती सभापती लक्ष्मण गायकवाड यांची तर शहर अनुसूचित जमाती मोर्चाच्या अध्यक्षपदी आप्पासाहेब हिप्परगे यांची नियुक्ती करण्यात आली. या निवडीचे पत्र भाजपा शहर अध्यक्षा रोहिणी तडवळकर यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी नगरसेवक रुद्रेश बोरामणी, नगरसेविका सुनीता कामाठी, नगरसेवक ज्ञानेश्वर म्यालकल, नगरसेवक अक्षय अंजीखाने, नगरसेवक ऋषिकेश मेट्रे, सरचिटणीस सुधा आळीमोरे, माजी नगरसेविका इंदिरा कुडक्याल, विजया वड्डेपल्ली, मंडल अध्यक्ष नागेश सरगम, भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष विजय कुलथे, भाजपा ओबीसी मोर्चा विजय महिंद्रकर, नागेश गंजी, राहुल पाटील उपस्थित होते.



तौफीक हत्तुरे

# सोलापुरात रेशन सर्व्हर ठप्प

## ● हजाराहून अधिक नावदुरुस्ती अर्ज रखडले; २५% ई-केवायसी अपूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ फेब्रुवारी-**
शिधापत्रिकेतील नाव दुरुस्ती आणि नाव वाढवण्याची प्रक्रिया ऑनलाइन केल्याने पारदर्शकता वाढली असली, तरी तांत्रिक बिघाडामुळे ही यंत्रणा नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. मागील महिनाभरापासून अन्न पुरवठा विभागाचा सर्व्हर अत्यंत संथ गतीने चालत असून अनेकदा पूर्णपणे बंद पडत आहे. परिणामी, गेल्या दोन महिन्यांपासून १ हजारहून अधिक नावदुरुस्तीची प्रकरणे प्रलंबित आहेत.

तहसील कार्यालयांमध्ये अर्जदारांची सतत गर्दी होत असून, रखडलेली कामे कधी मार्गी लागणार? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. गंभीर आजारपणात किंवा रुग्णालयात दाखल सदस्याचे नाव शिधापत्रिकेत तातडीने नोंदवणे आवश्यक असते. मात्र, सर्व्हर डाऊन असल्याने अशा अर्जांवरही वेळेत प्रक्रिया होत नाही. त्यामुळे रुग्णांच्या कुटुंबियांना आर्थिक तसेच मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. कार्डधारक हयात आहेत की नाही याची खातरजमा करण्यासाठी ई-केवायसी मोहीम सुरू करण्यात आली आहे.आतापर्यंत ७५ टक्के ई-केवायसी पूर्ण झाली आहे. मात्र, उर्वरित २५ टक्के प्रकरणे सर्व्हर समस्येमुळे रखडली आहेत. विशेषतः ५ वर्षांखालील मुले आणि वृद्धांची केवायसी प्रक्रिया तांत्रिक अडचणींमुळे पूर्ण होत नाही. समस्या न सोडवता, सर्व्हर समस्येवर उपाययोजना करण्याऐवजी प्रशासनाने धान्य दुकानदारांना नोटिसा बजावल्या आहेत. ज्या दुकानदारांची ८० टक्के ई-केवायसी पूर्ण झालेली नाही, त्यांचे धान्य वितरण बंद करण्याचा इशारा देण्यात आला आहे. याचा थेट परिणाम नागरिकांवर होत आहे. रेशन दुकानांवर गोंधळ, ग्राहक-दुकानदार वाद वाढले आहेत.




गेल्या दोन महिन्यांपासून सर्व्हर डाऊन असल्याने रेशन दुकानांवर नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत आहे. संथ सर्व्हरची समस्या त्वरित सोडवून रखडलेली प्रकरणे मार्गी लावावीत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### ओटीपी वेळेवर येत नाही

ओटीपी वेळेवर येत नाही. बायोमेट्रिकवर अंगठ्याचे ठसे उमटत नाहीत. मशिन व सर्व्हर बंद असल्याच्या तक्रारी वारंवार केल्या जात आहेत. यामुळे अनेकदा नागरिकांना रिकाम्या हाताने परत जावे लागत असून, ग्राहक व दुकानदारांमध्ये वादही वाढत आहेत. रेशन धान्य दुकानदार संघटनेचे अध्यक्ष सुनील पेंटर यांनी प्रशासनाने तांत्रिक अडथळे दूर करावेत, अशी मागणी केली आहे.



# लेखिका संध्या धर्माधिकारी यांच्या ‘बेरं’ कथासंग्रहाला पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ फेब्रुवारी-**
येथील ग्रामीण कथा लेखिका संध्या सूर्यकांत धर्माधिकारी यांनी ‘बेरं’ कथासंग्रहाचा पुरस्कार नुकताच पुणे येथे स्वीकारला.

पुणे महापालिका, मराठी भाषा संवर्धन समिती, संवाद पुणे व यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी पुणे (यशदा) च्या वतीने शासकीय कर्मचारी-अधिकारी पुरस्कार जाहीर झाला होता. या पुरस्कारासाठी राज्यभरातून प्रतिथयश मान्यवर साहित्यिकांच्या १०० साहित्यकृती प्राप्त झाल्या आहेत.

त्यातील उत्कृष्ट व दर्जेदार १२ साहित्यकृती पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. ही निवड तज्ज्ञ परिक्षकांनी अत्यंत पारदर्शकपणे केली होती. हा पुरस्कार वितरण सोहळा बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे तेलंगणाचे भा.प्र.से. अतिरिक्त पोलिस महासंचालक महेश भागवत, भा.प्र.से. महासंचालक यशदा निरंजनकुमार सुधांशु, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाध्यक्ष भारत सासणे, किरण केंद्रे संपादक किशोर मासिक, व्यंकटेश कल्याणकर यशदा, सार्थक थोरवत आदींच्या उपस्थितीत देण्यात आला.

सौ. धर्माधिकारी यांच्या ’बेरं’ या कथासंग्रहाला हा चौथा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे. यापूर्वी त्यांचा ‘रकमा’ हा ग्रामीण कथासंग्रह देखील अनेक पुरस्कारांनी सन्मानित झालेला आहे.

## धक्काबुक्कीचे कारण; दोघांना मारहाण

**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**
लहान मुलासोबत धक्काबुक्की झाल्याच्या कारणावरून चौघांनी मिळून दोन युवकांना मारहाण केल्याचा प्रकार सोलापूर शहरात घडला आहे.

या हकीकत अशी की, खिजर मिनाज अहमद जमखंडी वय १९ राहणार साखरपेठ फजल मीनाज अहमद जमखंडी वय १५ यांना साखरपेठ येथील अकबर काशीन मज्जिद समोर लहान मुलासोबत धक्काबुक्की झाल्याच्या कारणावरून शोबू सरोडगी, अबरार शेख व इतर दोन जणांनी मिळून लोखंडी छन्नी व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. दोन्ही पेशंट यांना सर्वांगास मुकामार लागल्याने उपचारासाठी शासकीय रुग्णालय सोलापूर येथे दाखल करण्यात आले आहे, अशी नोंद सिविल पोलीस चौकी झाली आहे.

# मार्केट यार्डात हमाली, तोलाईत ३० टक्के दरवाढ

### सभापतींच्या निर्णयाचे कामगारांकडून स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ फेब्रुवारी**
श्री सिध्देश्वर कृषी उत्पन्न बाजार समिती सोलापूर मार्केट यार्ड येथे झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत हमाली, तोलाई आणि स्त्री हमाली दरात ३० टक्के वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. सभापती दिलीप माने यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत व्यापारी प्रतिनिधी, व्यापारी संघटना, कामगार प्रतिनिधी आणि कामगार संघटनांनी संयुक्तरीत्या सहभाग नोंदवला. सर्वानुमते दरवाढ मंजूर करण्यात आली असून माथाडी कामगारांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.



सुधारित दरानुसार, प्रति क्विंटल हमालीचा दर ७ रुपये ९० पैशांवरून ३० टक्के वाढीसह १० रुपये २७ पैसे झाला आहे. प्रति पिशवी हमाली दर आता १ रुपये ५६ पैसे असणार आहे. तोलाई दर ४ रुपये ७० पैशांवरून ६ रुपये ११ पैसे करण्यात आला आहे. तसेच स्त्री हमाली दरातही ३० टक्के वाढ करून प्रति पिशवी दरात ३६ पैशांची वाढ करण्यात आली आहे.

बाजार समितीचे अधिकृत परिपत्रक प्रसिद्ध झाल्यानंतरच हे सुधारित दर लागू होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर कामगारांच्या उत्पन्नात वाढ होणे आवश्यक असल्याची भूमिका बैठकीत मांडण्यात आली. व्यापारी आणि कामगार यांच्यात समन्वय साधत घेतलेला हा निर्णय बाजारातील व्यवहार सुरळीत ठेवण्यासाठी महत्त्वाचा मानला जात आहे.

याबैठकीस संचालक प्रथमेश पाटील, गफार चांदा, वैभव बरबडे, सचिव रजपूत, माजी संचालक शिवानंद पुजारी, भुसार व्यापारी संघाचे अध्यक्ष सुरेश चिक्काळी, तसेच व्यापारी प्रतिनिधी आणि माथाडी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरवाढीमुळे कामगारांना आर्थिक दिलासा मिळणार असल्याची प्रतिक्रिया कामगारांकडून व्यक्त करण्यात आली.



सोलापूर : येथील हवामान खात्याच्या वतीने महापालिकाजवळील रस्त्यावर शहरात प्रदूषण व हवामानाचे नव्याने डिस्प्ले बसवण्यात येत आहेत.

## बालविवाह मुक्तीबाबत १ मार्चला शोभायात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**
महात्मा फुले समाजसेवा मंडळ करमाळा या संघटनेतर्फे बालविवाह मुक्तीसंदर्भात रविवार, १ मार्च रोजी सोलापुरात बालविवाह मुक्ती रथ, शोभा यात्रा तसेच जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केल्याची माहिती संघटनेच्या रजनीगंधा गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

१ मार्च दुपारी ३ वाजता चार पुतळा येथून शोभायात्रा निघेल. डॉ. निर्मलकुमार फडकुले संकुल येथे ४ वाजता पोहोचेल. दुपारी ४ वाजता ’हा खेळ कुणाला दैवाचा कळला’ ही बालविवाह मुक्त भारत या विषयावर नाटिका सादर होणार आहे याचे उद्घाटन बालकल्याण समितीचे अध्यक्ष समीर सय्यद यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी जिल्हा महिला व बाल संरक्षक अधिकारी जावेद शेख, जिल्हा बाल संरक्षणाधिकारी रेश्मा गायकवाड, सहाय्यक लेखा अभिरक्षक ड. देवयानी किनगी, बालकल्याण समिती सदस्य ड. सुवर्णा कोकरे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामुल्य आहे. या कार्यक्रमास रितेश विद्यालयाचे अध्यक्ष विजयालक्ष्मी थोबडे, मुख्याध्यापिका नीता कांबळे यांचे विशेष सहकार्य लाभत आहे. या पत्रकार परिषदेस सुजाता कांबळे, वामन बावळे, प्रकाश जोगीपेठकर, अलंकार वरवडकर उपस्थित होते.



सोलापूर : युवकांनी मुक्या जनावरांच्या बाबतीत जनजागृती अभियान सुरु केले आहे. नवीपेठ परिसरात सोमवारी टिपलेले छायाचित्र.

# अडीच एकर क्षेत्रात १२ लाखांचे खरबुज

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.२३ फेब्रुवारी-**
वांगी (ता. करमाळा) येथील दोघा चुलत भावांनी एकत्र येत दुसऱ्याचे शेत वाट्याने करून दोन महिन्याच्या कालावधीत अडीच एकर क्षेत्रामध्ये बारा लाख रुपयांचाचे खरबुज पिकाचे उत्पादन घेतले आहे. या चौधरी बंधूंचा खरबूज शेतीचा यशस्वी प्रयोग इतर शेतकऱ्यांना प्रेरणादायी ठरत आहे.

शेतकरी अडचणीत आहे शेती परवडत नाही, अशी ओरड आपण नेहमीच ऐकतो. परंतु शेतकरी कुटुंबातील काही तरुण शेती मध्ये येणाऱ्या सर्व अडचणीवर मात करत यातून मार्ग काढून यशस्वी होत आहेत. त्याचे एक उदाहरण करमाळा तालुक्यातील वांगी नंबर दोन येथील येथे पहावयास मिळत आहे. येथील अमोल व दत्तात्रय चौधरी हे दोन चुलत बंधू गावात एक विचाराने राहातात. कोणत्याही कामासाठी एकमेकांचा सल्ला घेतात.

दोघेही आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्तमपणे आपली वडिलोपार्जित शेती करतात. मध्यंतरीच्या काळात केळी पिकामध्ये दोघांनाही मोठा तोटा सहन करावा लागला होता. आपण पीक बदलले पाहिजे असा दोघांचा विचार झाला. दोघांच्या विचारातून खरबूज हे पीक निश्चित चांगले उत्पन्न मिळवून देईल यावर एकमत झाले. परंतु घरच्या शेतामध्ये सध्या या पिकासाठी क्षेत्र शिल्लक नव्हते. दोघांनी आपल्या चुलते बळीराम चौधरी यांना तुमचे अडीच एकर क्षेत्र आम्हाला वाट्याने द्या या बदल्यात आम्ही उत्पन्नातील चौथा हिस्सा तुम्हाला देऊ, असे सांगितले.




त्यांनीही ते मान्य केले. दोघांनी या अडीच एकर क्षेत्रावर मल्चिंगचा वापर करत खरबुजाची रोपे आणून लागवड केली. यासाठी पिंपळखुंटे येथील शेतकरी विठ्ठल नवगिरे यांचे मार्गदर्शन व गावातील नितीन तकिक यांचे सहकार्य मिळाले. दोन महिन्यात उत्तम खत पाणी व्यवस्थापन करत रात्रंदिवस या शेतामध्ये कष्ट करून जोमदार असे खरबुजाचे पीक उभे केले. सध्या अडीच एकर क्षेत्रामध्ये ५० टन उत्पादन पहिल्या तोड्याला निघाले असून २२ रुपयाचा दर ठरवून ११ लाख रुपये उत्पन्न मिळाले आहे.

उर्वरित शिल्लक राहिलेल्या खरबुजांपासून एक लाख रुपये उत्पन्न अपेक्षित आहे. शेती करण्यासाठी आवश्यक असलेली जमीन, पाणी, भांडवल मार्गदर्शन जवळ नसतानाही जिद्द चिकाटी कष्ट याच्या जोरावर या सर्वावर मात करून खरबूज शेतीचा त्यांनी केलेला यशस्वी प्रयोग या परिसरातील इतर तरुण शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरत आहे.

# सोलापूर डीसीसी बँकेकडून ९८ टक्के माहिती अपलोड

### थकीत २३ हजार शेतकऱ्यांचा डेटा शासनाकडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ फेब्रुवारी**
थकीत कर्जदार शेतकऱ्यांच्या संदर्भातील माहिती संकलनाच्या कामात सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने वेग घेतला असून २३ हजार ३८३ थकबाकीदारांपैकी २२ हजार ९८६ शेतकऱ्यांची माहिती शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. केवळ ५४१ शेतकऱ्यांची माहिती अपलोड करणे बाकी असून आवश्यक कागदपत्रे मिळाल्यानंतर तीही प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

राज्य शासनाने थकीत शेतकऱ्यांची अद्ययावत माहिती मागवल्यानंतर जिल्हा बँकेच्या यंत्रणेने ‘अॅक्शन मोड’मध्ये काम सुरू केले. आधार कार्ड व इतर आवश्यक तपशीलांची पूर्तता होताच उर्वरित शेतकऱ्यांची माहितीही प्रणालीवर नोंदवली जाणार आहे. ही माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली गठित राज्यस्तरीय समितीकडे सादर करण्यात आली आहे. जिल्हा बँकेच्या कार्यक्षेत्रात १ हजार ८८ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था कार्यरत असून सुमारे २४ हजार ५६३ शेतकऱ्यांचा तपशील समितीकडे देण्यात येणार आहे. विशेषतः ३० जून २०२५ व ३० सप्टेंबर २०२५ रोजी किती शेतकरी थकबाकीदार होते, याची स्वतंत्र माहिती सादर केली जात आहे.

राज्यस्तरावर थकबाकीदार शेतकऱ्यांबाबत ठोस व दीर्घकालीन निर्णय घेण्याची शक्यता व्यक्त होत आहे. दरम्यान, जिल्हा बँकेची आर्थिक स्थिती काही काळ खालावल्याने अनेक शेतकरी राष्ट्रीयीकृत बँकांकडे वळले आहेत. मात्र राष्ट्रीयीकृत बँकांतील थकीत कर्जदारांची माहिती कशी संकलित केली जाणार, याबाबत जिल्हा पातळीवर अद्याप स्पष्ट सूचना मिळालेल्या नाहीत.



एकूण २३,३८३ शेतकऱ्यांपैकी २२,९८६ जणांची माहिती शासनाकडे पोहोचली असून उर्वरित माहिती लवकरच अपलोड होणार आहे. या प्रक्रियेनंतर राज्य सरकारकडून कर्जमाफी किंवा इतर उपाययोजनांबाबत निर्णय जाहीर होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे लक्ष आता शासनाच्या पुढील भूमिकेकडे लागले आहे.

**करमाळा तालुक्यात सर्वाधिक शेतकरी थकबाकीदार**

तालुकानिहाय आकडेवारीनुसार करमाळा तालुक्यात सर्वाधिक ४,१४८ (३,९३५ अपलोड) शेतकरी थकबाकीदार आहेत. माढा तालुक्यात ३,१७१ (३,१९१ अपलोड), मंगळवेढा २,७७२ (२,७७३), अक्कलकोट २,२०५ (२,२५१) आणि पंढरपूर २,१६३ (२,२१०) अशी स्थिती आहे. दक्षिण सोलापूरमध्ये १,८२२ (१,७२८), मोहोळ १,८२० (१,६७५), माळशिरस १,८९३, बार्शी १,८०१ (१,७२२), सांगोला ९८७ (९९५) आणि उत्तर सोलापूर ६०१ (६२३) शेतकरी थकबाकीदार आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १३६५

**आंगे आंग मोडामोडी । कार्यजाती अनावडीं ॥**
**नुसती परवडी । जांभयांची ॥**

आजच्या ओवीत माउली तमोगुणाबदल सांगत आहेत. मोहरुपी अंधा-या रात्रीचे गडद आभाळ म्हणजे तमोगुण होय . व्यवहारज्ञानाची दृष्टी मंद करण्याचे आणि अज्ञानाचा जिव्हाळा वाढविण्याचे काम तमोगुण करतो. अविचार हा तमोगुणाचा महामंत्र असून मुर्खत्वरुपी दारुचा तो पेला आहे. देह हाच आत्मा मानणा-यांना, हा तमोगुण पूर्णत: जखडून ठेवतो. जीवांना चराचरात उन्मत करतो. संपूर्ण इंद्रियामध्ये जडता, मुर्खता आणि आळस धारण करण्याचे कामही तमोगुण करतो. तमोगुणी माणूस आाळोखे पिळोखे देतो. कोणत्याही कामाविषयी त्याला उत्साह नसतो. जांभळया देणे हा त्याचा नित्याचा उदयोग असतो. अशा तमोगुणीबदल बोलतांना माऊली महणतात, आंगे आंग मोडामोडी । कार्यजातीं नावडी । नुसती परवडी । जांभयांची ॥ पृथ्वी पाताळात जावो किंवा आकाश अंगावर कोसळो, त्याची भिती न बाळगता तो अंथरुणात लोळत राहातो. निद्रेचा त्याला फार लळा असतो. एखादयावेळेस काम करण्याची वेळ त्याच्यावर आली तर तो रागाने आदळा आपट करु लागतो. तमोगुणी माणूस कोणाबरोबर कसे वागावे? काय बोलावे।? काय घ्यावे।? काय घेऊ नये।? हे कांही जाणत नाही. अयोग्य व अशक्य काम करण्याचा अकारण उत्साह तमोगुणाी दाखवत असतो.



तमोगुण हा निद्रा-आळस व प्रमाद या तीन मार्गांनी शुध्द, निरुपादीक आत्म्याला बांधून ठेवत असतो. अग्नी लाकडात संचारला म्हणजे तो लाकडाच्या आकराचा भासतो किंवा घटाने पोकळीला व्यापले असता त्याला घटाकाश म्हणतात. प्रत्यक्षात हे आकाश नसते. पाण्याने सरोवर पूर्ण भरल्याने त्यात प्रतिबिंबित होणारा चंद्र सरोवरात धरुन ठेवला आहे, असे वाटते. त्याप्रमाणे तमोगुणामुळे आत्मा त्रिगुणाच्या पाशात बांधला गेला आहे,असा चुकीचा आभास होतो. चुकीचा आभास माणसाचे मनोधैर्य खचवित असतो. अभासाला सत्य मानणा-याकडून चांगल्या गोष्टी घडणे कठीण असते. तमोगुणाला जो जास्त बळाऊ देतो, तो स्वत: तर कांहीच चांगले करीत नाही, पण चांगले करणा-यांनाही तो अडसर ठरत असतो. आळशी माणसं स्वत:ला फार भाग्यशाली समजतात. सुस्तपणात त्यांना आनंद वाटतो. खरे म्हणजे आळसपणा हा विकासातील मोठा अडसर आहे. आळस झटकून काम करणा-यांच्या मागे लक्ष्मी धावते. आळसामुळे दारिद्रयात वाढ होते. आळस हे एक प्रकारचे मानसिक दारिद्रय आहे. आर्थिक दारिद्रयापेक्षा मानसिक दारिद्रय भयावह असते. आळसपणा हा एक महाभयंकर रोग आहे, असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. कोणत्याही रोगावर औषध आहे, पण आळसावर औषध नाही .ज्याने त्याने आपला आळस झटकुन जमेल ते काम करणे आवश्यक आहे. आई वडीलांनी भरपूर कमवून ठेवले आहे, म्हणून मला काम करण्याची गरज नाही, असे कोणीही समजू नये. स्वकष्टातून जो आनंद मिळतो, तो वडीलोपार्जित धन-सपंतीतून मिळत नाही, याची जाण सर्वांना असावी. आपले कष्ट हे राष्ट्रीय संपत्तीत भर घालणारे असतात. अशी भर घालणे ही सर्वांची जबाबदारी व आदय कर्तव्यच आहे, हे पण लक्षात असू दयावे. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : मंगळवार,**
**दि. २४ फेब्रुवारी २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - फाल्गुन शु. अष्टमी**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- कृतिका (१५.०७)**
**योग - ऐंद्र (०७.२३)**
**करण - विष्टी (१७.५७)**
**राहू काल : मंगळवार स. ७.३० ते ९.००**
**दिनविशेष : दुर्गाष्टमी**
**जागतिक मुद्रण दिन.**

**१६७०: राजगड येथे छत्रपती राजाराम यांचा जन्म.**
**१८२२: जगातील पहिल्या स्वामीनारायण मंदिराचे अहमदाबाद येथे उद्घाटन झाले.**
**१९१८: इस्टोनिया देशाला रशियापासुन स्वातंत्र्य मिळाले.**
**१९२०: नाझी पार्टीची स्थापना झाली.**
**१९३८: ड्यु पाँ कंपनीने नायलॉनचा दात घासण्याचा ब्रश विकण्यास सुरुवात केली. १९४२: व्हॉइस ऑफ अमेरिका या रेडिओ केन्द्राचे प्रसारण सुरू झाले.**

## महिला दिनानिमित्त पद्मशाली सखी संघमतर्फे विविध उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

८ मार्च हा जागतिक महिला दिन असून यानिमित्ताने सोलापूरातील सर्व समाजातील महिलांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन, पद्मशाली सखी संघम आणि पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने १, १५, २२ आणि २९ मार्च रोजी केल्याची माहिती वाचनालयाचे अध्यक्ष, माजी नगरसेवक पांडुरंग दिड्डी, फाउंडेशन व सखी संघम चे संस्थापक गौरीशंकर कोंडा, पद्मशाली सखी संघम' च्या अध्यक्षा कल्याणी पेनगोंडा, सचिवा रुचिरा मासम व कार्याध्यक्षा सविता येदूर यांनी दिले आहे.

'करिअर मार्गदर्शन' संदर्भात युवक-युवतींना मुलाखत कसे द्यायचे, याची माहिती १४ वर्षांचे अनुभव असलेले तज्ञ प्रा. रोहन कुर्री हे मार्गदर्शन करणार आहेत. रविवार '१ मार्च' रोजी सायंकाळी ४.३० वाजता पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय येथे होणार आहे.

'अनुलोम' या संस्थेतर्फे पश्चिम महाराष्ट्र विभाग जनसेवक शरद साळुंखे व अनुलोम सोलापूर उपविभाग संवादिनी संगीता कोरे हे मार्गदर्शन करणार आहेत. त्याचबरोबर डॉ हेडगेवार रक्तकेंद्राच्या वतीने महिलांचे मोफत हिमोग्लोबिन तपासणी रविवार १५ मार्च रोजी सायंकाळी ४.३० वाजता पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय येथे होणार आहे.

उद्योजिका व विविध पुरस्कार 'उद्योजक श्रीधर सुरा' यांच्यातर्फे प्रदान कार्यक्रम रविवार २२ मार्च रोजी सायंकाळी ४.३० वाजता पद्मशाली समाजातील मान्यवरांच्या उपस्थितीत पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय येथे होणार आहे. प्रा. डॉ. मधुकर जक्कन हे रविवार २९ मार्च रोजी सायंकाळी ४.३० वाजता पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय येथे आयोजन केले आहे.

# नियतकालिकांतून लेखक, साहित्यिक घडतात

## लोककवी प्रा. प्रशांत मोरे; विद्यापीठात नियतकालिक स्पर्धेचे पारितोषिक वितरण : वालचंद कला व शास्त्र प्रथम



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

महाविद्यालये व विद्यापीठ स्तरावर राबविण्यात येणारी नियतकालिकांची चळवळ ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. विद्यार्थी जीवनात नियतकालिकांत लेखन करणारेच विद्यार्थी पुढे आयुष्यात कवी, लेखक आणि साहित्यिक म्हणून घडतात. लेखनातूनच व्यक्तिमत्त्वाला दिशा आणि विचारांना विस्तार मिळतो, असे प्रतिपादन मुंबईचे प्रसिद्ध लोककवी प्रशांत मोरे यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत आयोजित 'नियतकालिक स्पर्धा २०२४२५' च्या पारितोषिक वितरण समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, वित्त व लेखाधिकारी सीए महादेव खराडे, परीक्षा विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. प्रा. मोरे म्हणाले, विद्यार्थी आणि शिक्षकांनी सतत लिहिते राहिले पाहिजे. कविता, लेख, चित्र यांच्या माध्यमातून स्वतःला व्यक्त करण्याची सवय लावली पाहिजे. नियतकालिक हे विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीचे पहिले व्यासपीठ आहे. यावेळी त्यांनी 'मैना' तसेच आईवरील विविध कविता सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. सूत्रसंचालन डॉ. नानासाहेब गव्हाणे व प्रा. संभाजी पटाईत यांनी केले, तर आभार सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी मानले.

### नियतकालिक स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव

नियतकालिक स्पर्धेतील प्रथम तीन व उत्तेजणार्थ महाविद्यालयास तसेच नियतकलिका स्पर्धेत काव्य, लेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला. **अंतिम निकाल :** प्रथम- वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय, द्वितीय- वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, तृतीय - सी. बी. खेडगी महाविद्यालय. उत्तेजनार्थ-शिवाजी महाविद्यालय बार्शी, दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय आणि हिराचंद नेमचंद महाविद्यालय.

## अंडाशयाच्या गाठीवर यशस्वी शस्त्रक्रिया

**सोलापूर :** उजव्या अंडाशयामध्ये मोठी गाठ आढळलेल्या ५६ वर्षीय महिलेवर मेडिकव्हर केएलई हॉस्पिटल पुणे येथील अत्याधुनिक वैद्यकीय पद्धतींचा वापर करून यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. रुग्णावर एक्सप्लोरेटरी लॅपरोटॉमीसह सॅल्पिंगो-ओओफोरेक्टॉमी आणि सविस्तर सर्जिकल स्टेजिंग प्रक्रिया सुरक्षितपणे पार पाडण्यात आली. ही महत्त्वाची शस्त्रक्रिया डॉ. आशिष शाहुराव बांगर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या प्रक्रियेमध्ये स्त्रीरोग तज्ज्ञ,अंतर्गत औषधोपचार तज्ज्ञ तसेच भूलतज्ज्ञ यांचा समन्वय साधत बहुवैद्यकीय पद्धतीने उपचार करण्यात आले. शस्त्रक्रियेदरम्यान बाधित अंडाशय व फलोपियन ट्यूब पूर्णपणे काढून टाकण्यात आली. त्याचबरोबर पेरिटोनियल साइटोलॉजीसाठी नमुने घेण्यात आले तसेच रोगाचा फैलाव तपासण्यासाठी आवश्यक त्या स्टेजिंग बायोप्सी करण्यात आल्या.



## केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ प्रसार, प्रचार अभियानांतर्गत युवा सवांद कार्यक्रम

### भाजपा युवा मोर्चातर्फे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

सोलापूर शहरात भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या वतीने, भारत सरकार ने नुकत्याच जाहीर केलेला केंद्रीय अर्थसंकल्प विविध माध्यमातून तरुणांपर्यंत पोहोचविण्यासाठी केंद्रीय अर्थसंकल्प प्रचार प्रसार अभियानाला सुरुवात केली आहे. याचाच एक भाग म्हणून सोलापुरातील बुर्ला महिला महाविद्यालय येथे युवा संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी भाजपा सोलापूर शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ या विषयावर चर्चा करण्यात आली.

प्रास्ताविक यतिराज होनमाने यांनी केली. तडवळकर यांनी विशेषतः मुलींनी उद्योजिका बनून आपणच ह्या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून विविध योजनाचा लाभ घेऊन रोजगार निर्माण करावा असे आवाहन केले. या कार्यक्रमाला २०० विद्यार्थिनी उपस्थिती दर्शविली. शहर उपाध्यक्ष संजय साळुंखे यांनी आभार मानले. यावेळी युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष विजय कुलथे, योगेश कबाडे, विश्वनाथ प्याटी, लक्ष्मण सरवदे उपस्थित होते.



## श्री सिद्ध-ईश्वर नगरमध्ये शिवजयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज ३९६ वा जन्मोत्सव सोहळा उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला.

प्रथमता छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचे पूजन शिवजन्मोत्सव मंडळाचे अध्यक्ष सचिन ढंगापुरे व उपाध्यक्ष अजित आळगी यांच्या हस्ते करण्यात आले. छत्रपती शिवरायांचा जन्म, बालपण, अपार कर्तुत्वाचा धगधगता इतिहास, आपल्या स्फूर्तीदायक भावना व्यक्त केल्या. जय भवानी, जय शिवराय छत्रपती संभाजी राजे ,जय जिजाऊ, जय शिवराय या घोषणांनी परिसर दणाणून गेला. यावेळी संस्थापक रामलिंग म्हेत्रे, अध्यक्ष राजशेखर दोडाळे, राजदत्त देवरकोंडा, वैभव परिचारक, सिद्धाराम धर्मसाले, सुरेश माने, मिलिंद खोबरे, दीपक गोसावी, धनंजय वाडे, श्रीनिवास नोराराहुल जाधव ,मोहन जाधव ,विनोद आडवीतोटे, नवनाथ वाघमारे, महेश कोरे, शिवानंद कोठे, चिंचोळकर वकील,चैतन्य कांबळे, वसंत धायगुडे, महेश मनुरे, नागनाथ खेड, गायकवाड, श्रीनिवास नोरा, रमेश जाधव, शिवानंद प्रथापुरे उपस्थित होते. सूत्रसंचालन वैभव परीचारक तर सुरेश माने यांनी आभार मानले.

## राजूर जि.प. शाळेत पालक सभा

**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राजूर (ता. दक्षिण सोलापूर) येथे पालक सभा घेण्यात आली. व शाळा व्यवस्थापन समितीचे पुनर्गठण करण्यात आले. यामध्ये एकूण १५ सदस्यांची निवड व अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची बिनविरोध करण्यात आली. अध्यक्ष म्हणून तुकाराम मळेवाडी, उपाध्यक्ष प्रशांत वाघमोडे यांची निवड करण्यात आली. यावेळी सरपंच सतीश देवकते, तंटामुक्त अध्यक्ष अभिमन्यू पाटील, शरणप्पा पाटील, शामराव पाटील, अमोगसिध्द बल्लारी, भिमू नरोटे, रमेश मळेवाडी, मल्लिकार्जुन बिराजदार, यल्लप्पा वाघमारे, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी पाटील उपस्थित होते.

# भारतीय संत साहित्य आजही प्रासंगिक

## राष्ट्रीय चर्चासत्रात प्रा. धन्यकुमार बिराजदार यांचे बीजभाषण



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

आजच्या जागतिक पातळीवरील सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर संत साहित्य मानवतेसाठी नैतिक व आध्यात्मिक मार्गदर्शक ठरते. असमानता, युद्ध, दहशतवाद, पर्यावरणीय संकट आणि डिजिटल युगातील मानसिक ताण यांसारख्या समस्यांवर संत परंपरेतील विचार अत्यंत उपयुक्त आहेत, असे मत डी. व्ही. एस. महाविद्यालय, शिवमोग्गा येथे बहुभाषी संगम संस्था, हुबळी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात बीजवक्ता म्हणून साहित्यिक प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी नमूद केले.

भारतीय साहित्य में संत परंपरा या विषयावर आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात संस्थेचे अध्यक्ष बसप्पा गौडा, सचिव एस. पी. दिनेश, प्राचार्य डॉ एम. व्यंकटेश, डॉ. एम. सिद्धय्या, डॉ तारू पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या चर्चासत्रात बिराजदार यांनी संत कबीर, रैदास, नामदेव, तुकाराम, गुरु नानक, दादूदयाल तसेच महात्मा बसवेश्वर सारख्या अनेक संतांचा संदर्भ देत त्यांनी मानवता, सत्य, अहिंसा व श्रमप्रतिष्ठेचा संदेश अधोरेखित केला.

संत कबीरांच्या ढाई आखर प्रेम के या विचारातून प्रेमाचे सार्वत्रिक महत्त्व स्पष्ट होते, असे सांगत त्यांनी समरसतेची आवश्यकता अधोरेखित केली. त्यांनी संतांनी नारीला सृजनशक्ती व आदर्श रूपात मान्यता दिली असल्याचे उदाहरणांसह स्पष्ट केले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते 'भारतीय साहित्य में संत परंपरा' पुस्तक प्रकाशित करण्यात आले.



## आ. रोहित पवार यांना झेड प्लस सुरक्षा देण्याची सोलापुरातून मागणी

**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

रोहित पवार यांच्या जीवितास धोका असल्याचा आरोप करत त्यांना तातडीने झेड प्लस सुरक्षा देण्याची मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेस (शरदचंद्र पवार पक्ष) व युवा सेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भातील निवेदन सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेप्रकरणी जनतेच्या मनात निर्माण झालेल्या शंकांवर आ. रोहित पवार सातत्याने पत्रकार परिषदांमधून प्रश्न उपस्थित करत आहेत. ही दुर्घटना नसून सुनियोजित कट असू शकतो, असा संशय व्यक्त करत त्यांनी चौकशीची मागणी केली आहे. या प्रकरणाची आंतरराष्ट्रीय यंत्रणेकडून चौकशी व्हावी व दोषींवर कारवाई करण्यात यावी. तसेच नवी दिल्लीस्थित खासगी विमान वाहतूक कंपनीवर तातडीने बंदी घालावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत बाबर, युवा सेनेचे उपसचिव रणजीत बागल, डॉ.योगेश रणदिवे, प्रशांत गायकवाड, मुसा आत्तार, अजित पात्रे, अमित मोतेवार, मिलिंद गोरे, मोहित निकम, अमरसिंह खांडेकर, युनुस अत्तार उपस्थित होते.



## संगमेश्वर महाविद्यालय आणि सारथी इंग्लिश क्लब यांच्यात सामंजस्य करार

**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

संगमेश्वर महाविद्यालय आणि सारथी संडे इंग्लिश स्पीकर्स क्लब, सोलापूर यांच्यात इंग्रजी प्रशिक्षणासाठी सामंजस्य करार करण्यात आला. संगमेश्वर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, इंग्रजी विभागाचे समन्वयक प्रा. रेवणसिद्ध हल्लोळी, सारथी संडे इंग्लिश स्पीकर्स क्लबचे संस्थापक प्रा. विठ्ठल वंगा, अध्यक्ष रोहित मुळे यांनी करारावर सह्या केल्या. विद्यापीठ स्तरावरची इंग्रजी व्याकरण ज्ञान, संवाद कौशल्य, एक्स्टेमपरी स्पीचेस आणि ग्रुप डिस्कशन वर आधारित दि इंग्लिश प्रोफिसिएन्सी टेस्ट संयुक्तरित्या घेतली जाणार आहे. यावेळी संगमेश्वरचे उपप्राचार्य प्रा. डॉ. सुहास पुजारी, डॉ. एम.आय. मकानदार, डॉ. आर.एम.जवळे, तसेच सारथीचे नागेश पाथरूट, धनंजय धेंडे, लेखराज कोनापूरे उपस्थित होते.



## लक्ष्मीनारायण मंदिरात श्री नारायण व लक्ष्मी विवाह मोठ्या थाटात संपन्न

**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

कुंभारीपासून तीन किमी अंतरावर असलेले लक्ष्मीनारायण मंदिर मध्ये आज रोजी ११.५० वा लक्ष्मीनारायण व लक्ष्मीचे विवाह संपन्न झाले.सदर लग्नास सोलापूरहून भक्तांची मोठी गर्दी केली होती. सदर लग्नसोहळ्याचे मानकरी सुरेखा विजय व्यंकटेश दंडी व शोभा दत्तात्राप लक्ष्मीनारायण गोरीपामूल हे होते. सदर कार्यक्रमाला प्रवीण जीन्सचे मालक दत्तात्रय गुर्रम, हरि ओम चे संचालक लक्ष्मीकांत दंडी, वेंकटेश नंदाल, श्रीधर दंडी, विनोद दंडी हे उपस्थित होते.

## श्री. हिराचंद नेमचंद वाचनालयात मराठी भाषा गौरवदिन कार्यक्रम

**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

कवी कुसुमाग्रज जयंती आणि मराठी भाषा गौरव दिनानिमित्त श्री. हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या वतीने दि. २६ व २७ फेब्रुवारी या दोन दिवशी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि २६ फेब्रुवारीला मराठी भाषा - काल, आज आणि उद्या हा मराठीमधील नामवंत साहित्यिकांच्या साहित्यातील निवडक भागाचे अभिवाचन अभिरुची क्लब सादर करणार आहे. क्षितीजा गाताडे, शुभदा चिडगुपकर, डॉ वैशाली जोशी यांचा सहभाग असून निवेदन, संहिता आणि दिग्दर्शन मंजुषा गाडगीळ यांचे आहे. २७ फेब्रुवारी रोजी तुझ्या आषाढाची याद हा कवी कुसुमाग्रज रा.ना. पवार आणि कवी माधव पवार यांच्या गीतांचा कार्यक्रम वेणुगोपाल संगीत विद्यालय सादर करणार असून संगीत संयोजन शर्वरी कुलकर्णी आणि झंकार कुलकर्णी यांचे आहे. स्वरदा मोहोळकर, रूपक कुलकर्णी, पियुष आवारे हे गायक कलाकार आहेत साथ संगत केदार गुळवणी, कौस्तुभ चांगभले, श्रेयस कंगळे आणि निवेदन आदिती कुलकर्णी यांचे आहे. दोन्ही कार्यक्रम सर्वांसाठी खुले असून सायंकाळी ६ वाजता लोकमान्य टिळक सभागृह प्रा. श्रीराम पुजारी कलासंकुल श्री हिराचंद नेमचंद वाचनालय येथे आहेत. तरी रसिकांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### टेंभुर्णीत शिवजयंती उत्साहात साजरी

**टेंभुर्णी, दि. २३ फेब्रुवारी-**

येथील मध्यवर्ती शिवस्मारक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त टेंभुर्णी शहर व परिसरातील हजारो शिवभक्तांनी पुतळ्यासमोर नतमस्तक होत अभिवादन केले. याप्रसंगी संजय कोकाटे, रावसाहेब देशमुख, प्रमोद कुटे, टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे एपीआय गणेश चौधरी, परमेश्वर खरात, संभाजी पाटील, औदुंबर देशमुख- महाडीक, सचिन जगताप, नागनाथ वाघे, बंकट देशमुख, सुधीर पाटील, विलास देशमुख, उपसरपंच सतीश नेवसे, महेंद्र वाकसे, नागेश बोबडे, दत्ता ढवळे, नाना ढवळे, संदीप कुटे, विशाल मस्के, राहुल टिपाले, संदीप देशमुख, बी. के. गायकवाड, सोमनाथ कदम, गोरख देशमुख, सुनिल ओहोळ, गणेश केचे, अ‍ॅड. संतोष कानडे, अजीत शेख, सचिन होडादे, सोमनाथ ताबे, ऋषिकेश बोबडे, आकाश पाटील उपस्थित होते.



### विद्यार्थ्यांच्या कलागुणांनाही वाव मिळावा : प्रा. प्रशांत धनवे

**सांगोला, दि.२१ फेब्रुवारी-**

विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान जेवढे उपयुक्त आहे त्याचप्रमाणे तो सर्वगुणसंपन्न व्हावा, असे वाटत असेल तर त्यांच्या कलागुणांना ही वाव मिळाला पाहिजे, असे प्रतिपादन प्रा. प्रशांत धनवे यांनी केले. ते सांगोला महाविद्यालय येथे वाणिज्य विभागाच्या वतीने आयोजित कॉमर्स कार्निवल २०२५-२६ कार्यक्रमात बोलत होते. यावेळी पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेचे उद्घाटन प्रा. प्रशांत धनवे, प्र. प्राचार्य डॉ.सुरेश भोसले, प्रश्नमंजुषा स्पर्धेचे उद्घाटन प्रा. डॉ. राम पवार, पीपीटी प्रेझेंटेशन स्पर्धेचे उद्घाटन संस्था सदस्य सुरेश फुले यांनी केले. स्पर्धेचे परीक्षण प्रा. डॉ. सदाशिव देवकर, प्रा. सुरेखा गायकवाड, प्रा. डॉ.ओंकार घाडगे, प्रा. डॉ. जमीर तांबोळी, डॉ. मालोजी जगताप, विद्या पाटणे यांनी केले. यावेळी सृष्टी खंडागळे, वैष्णवी मोरे, मयुरी सावंत, जीवन व्हनमाने, योगीराज थोरबोले या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन वैष्णवी सुर्यागण, प्रास्ताविक प्रा. डॉ. विद्या जाधव यांनी केले. आभार सिमा मिसाळ यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यालयीन अधीक्षक विलास माने, प्रा. समाधान माने, प्रा.सचिन सुरवसे, प्रा. प्राप्ती लामगुंडे, प्रा. निकिता लामगुंडे यांचे सहकार्य लाभले.




### जळोली जि.प. शाळेत बाजार डे साजरा

**करकंब, दि. २३ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जळोली येथे बाजार डे बाल आनंद मेळावा आयोजित करण्यात आला होता. प्रथम सरपंच ज्योतीराम मदने, शाळा सुधार समितीचे अध्यक्ष हनुमंत नरसाळे,उपाध्यक्ष साधना किर्ते, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, केंद्रप्रमुख पा. वा. जाधव, मुख्याध्यापक जयवंत कापसे यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. १ ली ते ८वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी भाजीपाला, फळभाजी,फळे, खेळणी, शैक्षणिक साहित्य,विविध प्रकारचे अन्नपदार्थ आदी वस्तू विक्रीसाठी आणल्या होत्या. बाजार डे यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापक जयवंत कापसे, शिक्षक ज्ञानेश्वर दुधाणे, नागनाथ गायकवाड, सिद्धेश्वर लोंढे, कैलास नरसाळे, बाळासाहेब खांडेकर, शिक्षिका देवकी कलढोणे (दुधाणे) ज्ञानेश्वर दुधाने यांनी परिश्रम घेतले.

### जेईई मेन्स परीक्षेत लॉजिकचे दोन विद्यार्थी ९९.५० टक्के पार

**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

यंदाच्या जेईई मेन्स २०२६ परीक्षेत येथील लॉजिक इन्स्टिट्यूटने उत्कृष्ट निकाल देत यशाची परंपरा कायम राखली आहे. संस्थेचे विद्यार्थी गौरव काळे याने ९९.५९ पर्सेंटाईल, तर आदित्य कामतकर याने ९९.५१ पर्सेंटाईल मिळवून अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावला. याशिवाय ८ विद्यार्थ्यांनी ९५ पर्सेंटाईलहून अधिक गुण मिळवले असून, एकूण ३१ विद्यार्थी 'जेईई ॲडव्हान्स'साठी पात्र ठरले आहेत. विशेष म्हणजे, या विद्यार्थ्यांनी शालेय स्तरावर एनटीएस, एमटीएस किंवा ऑलिम्पियाडसारख्या परीक्षा दिलेल्या नाहीत; तसेच कोणताही फाउंडेशन कोर्स न करता हे घवघवीत यश मिळवले. लॉजिक इन्स्टिट्यूटचे तिन्ही शिक्षक मूळचे सोलापूरचेच असून, स्थानिक विद्यार्थ्यांची मानसिकता ओळखून त्यांनी वैयक्तिक व सखोल मार्गदर्शन केले. लॉजिक इन्स्टिट्यूटने या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले असून आता जेईई ॲडव्हान्समध्येही उत्कृष्ट यश आणण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवण्यासाठी प्रेरित केले आहे.






# स्वच्छतेच्या वारीतून राष्ट्रसंतांना वंदन

## रुई येथील 'एकता महिला मंच'चा उपक्रम

**वैराग, दि. २३ फेब्रुवारी -**

देवळात नका जाऊ, मूर्ती नका पूजू, गरिबांना मदत करा आणि परिसर स्वच्छ ठेवा, हा संदेश आयुष्यभर देणाऱ्या राष्ट्रसंत गाडगेबाबांना त्यांच्या जयंतीनिमित्त रुई (ता.बार्शी) येथे आगळ्यावेगळ्या पद्धतीने अभिवादन करण्यात आले. येथील एकता महिला मंचच्या वतीने केवळ हार-तुरे अर्पण करण्याच्या पारंपारिक पद्धतीला फाटा देत, प्रत्यक्ष स्वच्छतेची कृती करून बाबांच्या विचारांचा जागर करण्यात आला.

आज २३ फेब्रुवारी २०२६ रोजी, एकता महिला मंचच्या सदस्यांनी एकत्र येत गावातील श्रद्धास्थान असलेल्या श्री खंडोबा मंदिर परिसराची साफसफाई केली. महिलांनी हातात झाडू घेऊन संपूर्ण मंदिर परिसर चकाचक केला. केवळ प्रतिमेचे पूजन करण्यापेक्षा बाबांना अपेक्षित असलेले स्वच्छतेचे कार्य करणे हीच खरी आदरांजली आहे, अशी भावना यावेळी महिलांनी व्यक्त केली. या श्रमदान मोहिमेत भाग्यश्री पावले, स्वाती चव्हाण, स्वाती भोसले, आशा भोसले, सारिता फडके, ज्योती ठोकळ, पार्वती सुतार, विमल सुतार, प्रियांका सुतार, निर्मला भोसले उपस्थित होत्या.





## झाडी येथे परिसर पूजनावर दिला भर

स्वच्छता हाच खरा धर्म आणि देव देव्हाऱ्यात नसून तो माणसात व स्वच्छतेत आहे हा संदेश आयुष्यभर कृतीतून देणाऱ्या राष्ट्रसंत श्री गाडगेबाबा महाराज यांची जयंती आज झाडी (गौडगाव) येथे अनोख्या पद्धतीने साजरी करण्यात आली. येथील 'एकता महिला मंच' च्या वतीने केवळ फोटोचे पूजन करण्याच्या पारंपारिक पद्धतीला फाटा देत, प्रत्यक्ष हातात झाडू घेऊन परिसर स्वच्छ करत बाबांना खऱ्या अर्थाने अभिवादन करण्यात आले. यावेळी आशा चव्हाण, स्वाती मते, सरोजा मते, पल्लवी जगदाळे, कोमल वाघमारे, संध्या सरवदे उपस्थित होते.

## शेळगाव येथे शाळा आणि अंगणवाडी परिसरात स्वच्छता मोहीम

स्वच्छता हाच खरा धर्म आणि देवळात देव शोधण्यापेक्षा तो श्रमात शोधा हा संदेश देणाऱ्या राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती आज शेळगाव (आर) येथे शाळा आणि अंगणवाडी परिसरात स्वच्छता करुन आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरी करण्यात आली. येथील एकता महिला मंचच्या वतीने केवळ प्रतिमेचे पूजन करण्याच्या पारंपारिक पद्धतीला फाटा देऊन, प्रत्यक्ष हातात झाडू घेऊन परिसर स्वच्छ करत बाबांना खऱ्या अर्थाने अभिवादन करण्यात आले. या स्तुत्य उपक्रमात एकता महिला मंचच्या तालुका प्रसिद्धी प्रमुख गीतांजली जोशी यांच्यासह आशा विभुते, पंचशील बनसोडे, सविता काटे, सारिका जाधव, पुजा बादगुडे, पुजा कुशवाहा, कविता मगर यांनी सहभाग नोंदवला.






## गौडगाव एकता महिला मंच

**वैराग, दि. २३ फेब्रुवारी-**

देव देव्हाऱ्यात नसून तो माणसाच्या सेवेत आणि स्वच्छतेत आहे, हा राष्ट्रसंत गाडगेबाबांचा विचार केवळ भाषणापुरता मर्यादित न ठेवता, गौडगाव येथील 'एकता महिला मंच' च्या रणरागिणींनी तो प्रत्यक्ष कृतीत उतरवला आहे. गाडगेबाबांनी आयुष्यभर हातात खराटा घेऊन समाजमनाची घाण साफ केली. त्यांच्या विचारांचा वारसा खऱ्या अर्थाने पुढे नेण्याचे काम गौडगावच्या या महिलांनी केले आहे. केवळ फोटोला नमस्कार करण्यापेक्षा परिसर स्वच्छ राखणे, हीच बाबांना खरी मानवंदना आहे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. यावेळी कविता दसवंत (तालुका प्रमुख, एकता महिला मंच), वसुधा कुंभार (तालुका कार्यकारणी सदस्य), सविता दसवंत, सविता काजळे, सुखनंदा सुरवसे, दिपाली काजळे, मंगल काजळे, शामल सुतार, पुष्पा काजळे उपस्थित होते.

# संत तुकाराम मंदिरात गुरूवारपासून बीजोत्सव

### हभप मोरे परिवाराची ९४ वर्षांची परंपरा

### अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ फेब्रुवारी-**

येथील अशोक चौकातील श्रीसंत तुकाराम मंदिरात मोरे परिवाराच्या वतीने गेल्या ९३ वर्षांपासून जगद्गुरू श्रीसंत तुकाराम महाराज बीजोत्सव साजरा करण्यात येतो. यंदाचा ९४ व्या वर्षातील बीजोत्सव गुरूवार दि.२६ फेब्रुवारपासून सुरू होत आहे. यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती हभप विष्णूपंत महाराज मोरे यांनी दिली.


सोलापूर शहरातील अशोक चौकात मोरे परिवारातील मूळ पुरूष वै. हभप शिवराम महाराज मोरे यांनी सोलापूर शहरातील पहिले संत तुकाराम मंदीर उभारले व ९३ वर्षापूर्वी बीजोत्सव सुरू केला. त्यानंतर त्यांचे चिरंजीव वै. हभप श्रीरंग महाराज मोरे यांनी हा उत्सव सुरू ठेवला. पुढे त्यांचे चिरंजीव हभप वै. ज्ञानेश्वर महाराज यांनी बंधू हभप विष्णूपंत महाराज यांच्या सहाय्याने हा उत्सव टिकवला. हा वारसा आजही पुढे चालवला जात आहे. सध्याच्या उत्सवाची धुरा हभप विष्णूपंत महाराज मोरे सांभाळत आहेत. त्यांचे बंधू हभप हरिहर महाराज मोरे यांचे सहकार्य आहे. हभप विष्णूपंत महाराजांचे संपूर्ण कुटूंब या उत्सवासाठी प्रयत्नरत असते. त्यांचे चिरंजीव हभप भगवंत महाराज व निवृत्ती महाराज यांनी ही परंपरा सुरू ठेवली असून हभप निवृत्ती महाराजांचे चिरंजीव चैतन्य महाराज यांनीही युवावस्थेतच सेवेला वाहून घेतले आहे.



यंदाचा बीजोत्सव गुरूवार दि. २६ फेब्रुवारी ते ५ मार्च दरम्यान होत आहे. या काळात दररोज पहाटे ४ ते ६ काकडा, सकाळी साडेसात ते साडेअकरा सामुदायिक गाथा पारायण, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, रात्री ८ ते १० हरिकिर्तन, त्यानंतर नामपाठ व हरिजागर असे कार्यक्रम होणार आहेत. या नामसप्ताहात दि.२६ रोजी हभप चैतन्य महाराज मोरे, दि.२७ रोजी हभप शिवाजी महाराज पोतदार (शेळगी), दि.२८ रोजी हभप माऊली महाराज बचुटे(सोलापूर), दि.१ रोजी हभप दत्तात्रय महाराज क्षिरसागर(उळे), दि.२ रोजी हभप मन्मथ महाराज उळेकर, दि. ३ रोजी राष्ट्रीय अध्यक्ष हभप सुधाकर महाराज इंगळे, दि. ४ रोजी हभप श्याम महाराज जोशी (कासेगाव) यांची दररोज रात्री ८ ते १० कीर्तनसेवा होणार आहे. दि. ५ मार्च रोजी सकाळी १० ते १२ हभप विष्णूपंत महाराज मोरे यांचे बीजोत्सवानिमित्त गुलालाचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप होणार आहे. सायंकाळी ७ ते ९ हभप भगवंत महाराज मोरे यांचे काल्याचे कीर्तन होऊन नामसप्ताहाची सांगता होणार असल्याचे हभप मोरे महाराज यांनी सांगितले.

## सावरगाव येथे उद्यापासून अदृश्य काडसिद्धेश्वर महाराजांचा सत्संग सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**



कोल्हापूर जिल्ह्यातील कणेरी मठाचे ४९ वे मठाधिपती श्री अदृश्य काडसिद्धेश्वर महाराज यांचा सावरगाव, (ता.तुळजापूर) येथे बुधवार दि.२५ व गुरुवार दि.२६ रोजी सत्संग सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आली.

सावरगाव येथील सत्संगाचे हे ३४ वे वर्ष आहे. कनेरी मठाचे साधक सुखदेव कांबळे म्हणाले की, ३४ वर्षांपासून सावरगावमधील भाविक कनेरीच्या सिद्धगिरी मठाशी जोडले गेले आहेत. बुधवार दि. २४ रोजी पहाटे साडेपाच वाजता काकडा, सकाळी नऊ ते दुपारी १२ सदगुरु भजन, सायंकाळी चार वाजता अदृश्य काडसिद्धेश्वर महाराजांचे सावरगाव येथे आगमन होईल. रात्री साडेदहा ते बारापर्यंत आरती, शेजारती, दर्शन, प्रसाद व हरिजागर होईल. गुरुवार दि. २६ रोजी काकडा आरती, सकाळी सात ते नऊ श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचा कळसारोहण सोहळा होईल. सकाळी दहा वाजता महाराजांचे प्रवचन, पुष्पवृष्टी, आरती व महाप्रसाद होईल, असे संयोजकांनी कळविले आहे.

## शिवाजी महाराजांचे कार्य अद्वितीय : डॉ. कदम



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २० फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराजांसारखा लोकाभिमुख राजा इतिहासात झाला नाही आणि भविष्यात होणे कठीण आहे. जाणता राजा, रयतेचा राजा, धर्मसहिष्णू राजा अशा उपाध्यांतून त्यांच्या कार्याची महानता अधोरेखित होते. राजा हा प्रजेचा मालक नसून सेवक असतो, ही भूमिका स्वीकारून महाराजांनी जनतेची आयुष्यभर सेवा करण्याचा ध्यास घेतला. असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास अभ्यासक डॉ. विकास कदम यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना, इतिहास विभाग व समारंभ समिती यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त 'छत्रपती शिवाजी महाराजांची राजनीती' या विषयावर प्रा. डॉ. विकास कदम यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव हे होते. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, उपप्राचार्य डॉ. राजेश कवडे, वाणिज्य विभागाचे उपप्राचार्य तथा अधिष्ठाता डॉ. सुशीलकुमार शिंदे, अधिष्ठाता समाधान माने, पदवीधर पदवी वर्गाचे अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, विज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. अनिल चोपडे उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. दत्तात्रय चौधरी यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. भारती सुडके यांनी केले. समितीचे चेअरमन प्रा. डॉ. दत्तात्रय डांगे यांनी आभार मानले.

## ए.जी. पाटील पॉलिटेक्निकमध्ये कॅम्पस ड्राईव्ह




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रेडिटेशन, नवी दिल्ली कडून पुर्नःमानांकन प्राप्त झालेला विजापूर रोडवरील ए. जी. पाटील पॉलिटेक्निकमध्ये जॉन डीअर प्रायव्हेट लिमिटेड पुणे या नामांकित कंपनीचा कॅम्पस ड्राईव्ह संपन्न झाला. जॉन डीअर प्रायव्हेट लिमिटेड पुणे कंपनीच्या अरुण अडगळे, एचआर विभाग प्रमुख व आलोक सुर्वे, प्रमुख, उत्पादन विभाग या अधिकाऱ्यांनी डिप्लोमा इंजिनिअरिंगच्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकमनिकेशन इंजिनिअरिंग व मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विभागातील तृतीय वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड केली. यावेळी २५१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

कॅम्पस ड्राईव्हची सुरुवात राष्ट्रगीत व दीपप्रज्वलनाने झाली. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. एम. ए. चौगुले, उपप्राचार्य एस. के. मोहिते व कॉलेजचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी एम. एम. कुलकर्णी उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांचे शांती एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष एस. ए. पाटील, सचिव एस. एस. पाटील, एस. एस. लिगाडे, एस. आर. बागबान व आर. एस. मोटगी यांनी अभिनंदन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पी. एस. दारा, एल. एस. केंडुले, पी. आर. बालेराव, ए. आर. मळेकर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# सुरक्षा रक्षक महासंघाचे त्रैवार्षिक अधिवेशन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र सुरक्षा रक्षक महासंघ (संलग्न - भारतीय मजदूर संघ) महाराष्ट्र प्रदेशाचे दुसरे त्रैवार्षिक प्रदेश अधिवेशन सोलापूर जिल्ह्यात उत्साहात संपन्न झाले. सोलापूर जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र सुरक्षा रक्षक महासंघ (संलग्न - भारतीय मजदूर संघ) महाराष्ट्र प्रदेशाचे दुसरे त्रैवार्षिक प्रदेश अधिवेशन पार पडले. राज्यभरातील २५० पेक्षा अधिक पुरुष व महिला सुरक्षा रक्षक बांधव-भगिनी या अधिवेशनाला उपस्थित होते.



अधिवेशनामध्ये महाराष्ट्र प्रदेशाची जुनी कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली व सन २०२६ ते २०२८ या कालावधीसाठी नवीन कार्यकारिणी अस्तित्वात आली. यामध्ये नूतन प्रदेशाध्यक्ष - संदीप पाटील नूतन प्रदेश महामंत्री अनिल पारधी यांची निवड करण्यात आली. अधिवेशनाचे प्रमुख अतिथी व मार्गदर्शक किरण मिलगीर होते. तसेच विशाल मोहिते, बाळासाहेब कांबळे व सुधांशू रानडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. अधिवेशनात मांडण्यात आलेले सर्व ठराव एकमताने मंजूर करण्यात आले असून ते शासन दरबारी मांडण्यात येणार आहेत. अधिवेशन यशस्वी करण्यासाठी शिवराम भोसले, अनिल पारधी, तानाजी शिंदे, दत्तात्रय अवघडे, नंदकुमार भोसले, प्रशांत राठोड तसेच महासंघाचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्य लाभले. आभार राजकुमार काळे, तानाजी शिंदे व अविनाश मुंढे यांनी केले.

### नूतन पदाधिकारी

प्रदेश कार्याध्यक्ष - संदीप भानुशाली, प्रदेश अध्यक्ष - संदीप पाटील, प्रदेश महामंत्री - अनिल पारधी, प्रदेश संघटन मंत्री - तुकाराम कुंभार, प्रदेश सह संघटन मंत्री - मीना आढारी, प्रदेश कोषाध्यक्ष - तानाजी शिंदे, प्रदेश उपाध्यक्ष - अविनाश मुंढे, कृष्णा साठे, प्रदेश सचिव - शिवराम भोसले, बापूराव तुपे, राहुल पवार, बबन शिरोसे, श्रीमती कानोपात्रा ढोले. महिला प्रमुख - मंजना आढारी.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अक्कलकोटमध्ये अवकाळी पाऊस; पिकांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २३ फेब्रुवारी-**

अक्कलकोट शहर व परिसरात सोमवारी अवकाळी पावसाचा शिडकावा झाला. गहु, हरभरा, पिके हे काढणीला आली आहेत. या अवकाळी पावसाने द्राक्ष' आंबा उत्पादानावर व प्रतवारीवर या पावसाने प्रतिकुल परिणाम होण्याची शक्यता शेतकरी वर्गातुन व्यक्त केली जात आहे .



सोमवारी दिवसभर आभाळ होते. सायंकाळी ५ पर्यंत सुर्यदर्शन नव्हते. पाच नंतर ढगांचा गडगडाटासह अवकाळी पावसाचा शिडकावा झाला. त्यानंतर सुर्यदर्शन झाले. अक्कलकोट शहरासह बोरी उमरगे, निमगाव, मातनाळी, बासलेगाव, कंठेळी, हसापुर, बॅगेळी, डिग्गेवाडी, सांगती आदि परिसरात अवकाळी पावसाचा शिडकावा झाला. ज्वारी, हरभरा, गहु, जोड गहू आदि पिके काढणीला आली आहेत.

आंब्याचा मोहोर बहरून आलेला आहे. कांहीं आंबा बागेत कैऱ्या छोट्या आकारात आहेत. ती मोठी होण्यापुर्वीच प्रतिकुल परिस्थितीमुळे फळ बागाना फटका बसण्याची शक्यता शेतकरी वर्गातुन व्यक्त केली जात आहे. द्राक्ष बाग, पेरू बाग, चिक्कू आदि फळ बागेवर या प्रतिकुल हवामानाचा परिणाम होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.



# बार्शीत राडा; मारहाण, दगडफेक व रुग्णालयाची तोडफोड

- २९ जणांवर गुन्हा, पाच जणांना अटक; दंगा नियंत्रक पथक दाखल
- वादाचे रुपांतर दोन जमावांच्या संघर्षात; वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२३ फेब्रुवारी-**

बार्शी शहरात छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमादरम्यान झालेल्या किरकोळ वादाचे रुपांतर गंभीर स्वरुपात होऊन सलग तीन ठिकाणी मारहाण, दगडफेक व शासकीय मालमत्तेची तोडफोड झाल्याची घटना रविवार दि. २२ फेब्रुवारी रोजी रात्री घडली. या तिन्ही घटना परस्पर निगडित असून पोलिसांनी विविध कलमांखाली गुन्हे दाखल करुन कारवाई सुरु केली आहे.

**पहिली घटना : सांस्कृतिक कार्यक्रमादरम्यान मारहाण**

बार्शी शहरातील बारंगुळे प्लॉट येथे शिवजयंतीनिमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमावेळी फटाके उडवण्याच्या कारणावरुन दोन गटांमध्ये वाद निर्माण झाला. या वादात एका तरुणासह त्याच्या आईवर लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याचा आरोप आहे. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याची नोंद तक्रारीत आहे. याप्रकरणी सोमेश्वर स्वामी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार ९ जण व अज्ञात ३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





**दुसरी घटना : पोलीस ठाण्यासमोर दगडफेक**

पहिल्या घटनेनंतर संबंधित दोन्ही गट पोलीस ठाण्यासमोरील स्टँड चौक येथे आमने-सामने आले. यावेळी मोठ्या प्रमाणात आरडाओरडा व दगडफेक झाली. पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करुन परिस्थिती नियंत्रणात आणली. या घटनेप्रकरणी बार्शी पोलीस ठाण्याचे पोलीस राहुल उदार यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार प्रत्यक्ष ६ जण व अज्ञात ३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**तिसरी घटना : शासकीय ग्रामीण रुग्णालयात तोडफोड**

पहिल्या घटनेतील जखमी व्यक्ती तक्रारीच्या अनुषंगाने वैद्यकीय उपचारासाठी पोलीस यादी घेऊन शासकीय ग्रामीण रुग्णालयात गेल्याची माहिती दुसऱ्या गटास मिळाल्यानंतर संबंधित जमावाने रुग्णालयात धडक दिली. जखमीचा शोध घेत असताना संतप्त जमावाने रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराची काच, ऑपरेशन थिएटर, महिलांचे प्रसूतीगृह यांच्या दरवाजावर दगडफेक केली, तसेच बाहेरील फर्निचरवर दगडफेक करुन मोठी तोडफोड केली. या घटनेमुळे रुग्णालयात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. याप्रकरणी ग्रामीण रुग्णालयाचे कर्मचारी राहुल सोलंकी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार अज्ञात ७ ते ८ गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट, शांततेचे आवाहन**

घटनेची तीव्रता व गांभीर्य लक्षात घेता २२ फेब्रुवारीच्या मध्यरात्री अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर यांनी बार्शी येथे भेट देऊन घटनास्थळाची पाहणी केली. त्यानंतर सोमवार, दि. २३ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी घटनास्थळी भेट देऊन, पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक घेतली. त्यांनी बार्शीकरांना शांतता राखण्याचे व अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले.याशिवाय उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर व पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनीही नागरिकांना संयम बाळगण्याचे आवाहन करत या प्रकरणातील साजन शेख, शाहिद शेख, आरिफ सय्यद, अफरोज बागवान, मोजम बागवान या पाच आरोपींना अटक केल्याची माहिती दिली. सदर घटनेचा तपास पोलीस सहाय्यक निरीक्षक बाळासाहेब जाधव, पोलीस सहाय्यक निरीक्षक उमाकांत कुंजीर, पोलीस उपनिरीक्षक अभय माकणे करीत आहेत.

सदर तिन्ही घटना परस्पर संबंधित असून शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. दंगा नियंत्रक पथकाचे १५ पोलीस सोलापूरहून अतिरिक्त बंदोबस्तासाठी आलेले आहेत. पुढील तपास सुरू असून उर्वरित आरोपींचा शोध घेतला जात आहे. नागरिकांनी अफवांपासून दूर राहून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.



## सांगोला विद्यामंदीरमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्पाने स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२३ फेब्रुवारी-**

इ.१० वीच्या बोर्ड परीक्षेची सुरुवात दि.२० फेब्रुवारी रोजी झाली. सांगोला विद्यामंदिर प्रशाला येथील केंद्रावर संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांच्या हस्ते परीक्षेसाठी आलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाब पुष्पाने करण्यात आले.

यावेळी उपस्थित विद्यार्थी व पालकांच्या हस्ते गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास पुष्पहार समर्पित करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक अमोल गायकवाड, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, उपमुख्याध्यापक चिंतामणी देशपांडे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, काकासाहेब नरुटे व उत्तम सरगर, प्रशालेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

या परीक्षेमध्ये एकूण ६७५ विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत. यामध्ये सांगोला विद्यामंदिर प्रशाला, इंग्लिश स्कूल, उत्कर्ष विद्यालय, देशभक्त संभाजीराव शेंडे विद्यालय मेडशिंगी, माध्यमिक विद्यालय शिवणे व विद्यामंदिर इंग्लिश मीडियम स्कूल या शाळेतील विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

## अवैध वाळू उपसा : टेम्पोसह ६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ फेब्रुवारी-**

पंढरपूर तालुका पोलिसांच्या कारवाईत ६५ एकर जॅकवेल भीमा नदी पात्र येथून अवैधरित्या वाळू वाहतूक करणाऱ्या टेंम्पोसह ६ लाख १५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक टी.वाय.मुजावर यांनी दिली.

दि.२२ फेब्रुवारी रोजी पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनच्या पोलिसांनी येथील उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली ६५ एकर जॅकवेल येथून भीमा नदीपात्रातून गावातील भीमा नदी पात्रा लगत असलेल्या ठिकाणी अवैधरित्या अशोक लेंडँड कंपनीच्या टेम्पोमध्ये (एम.एच.११ डीडी ५८९९) टेम्पो चालक आदित्य मनोज माने (रा. पंढरपूर, रा.आंबेगाव) हा आपल्या ताब्यात अवैधरित्या शासनाच्या मालकीची भीमा नदी पात्रातील वाळू टेम्पोमध्ये चोरून घेऊन जात असताना त्यास विसावा तीन रस्ता चौक येथे ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर



पंढरपूर तालुका पोलिसांनी आदित्य मनोज माने याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. त्याच्याकडून वाळू व अशोक लेलँड कंपनीचा टेम्पो असा एकूण ६ लाख १५ हजारांचा मुद्देमाल जप्त करून ताब्यात घेतले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, येथील उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय.मुजावर, पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले, पोलीस उपनिरीक्षक विक्रम वडणे, हेडकॉन्स्टेबल मंगेश रोकडे, हेडकॉन्स्टेबल अभिमन्यू गरड, हेडकॉन्स्टेबल सुहास देशमुख, दीपक भोसले, कॉन्स्टेबल संजय गुटाळ, सागर गवळी, विजयकुमार आवटी, पोलीस चालक चाटे, विलास घाडगे, हासन नदाफ यांच्या पथकाने केली.

## वेळापूरचे डॉ. फडे यांची आयकर आयुक्तपदी नियुक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर,दि.२३ फेब्रुवारी-**

वेळापूर (ता.माळशिरस) येथील सुपुत्र डॉ. उमेश फडे यांची अतिरिक्त आयकर आयुक्त पदावरून पदोन्नती होऊन आयकर आयुक्तपदी नियुक्ती झाली आहे. डॉ. उमेश फडे हे वेळापूर येथील डॉ. चंद्रकांत फडे यांचे सुपुत्र आहेत. डॉ. उमेश फडे यांचे प्राथमिक शिक्षण येथील जि.प.शाळेत तर माध्यमिक शिक्षण इंग्लिश स्कूल येथे झाले. पुणे येथे त्यांनी वैद्यकीय



शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी एमपीएससी परीक्षेत यश मिळवून उपअधीक्षक पोलिस पदासाठी निवड झाली. प्रशिक्षणादरम्यानच त्यांनी यूपीएससी परीक्षेतही यश संपादन केले. त्यांनी आयकर विभागात विविध जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळल्या. मुंबई, अहमदाबाद आणि पुणे येथे त्यांनी महत्त्वाच्या पदांवर काम केले. सेवेच्या काळात संशोधन कार्यासाठी अमेरिकेतील लॉस एंजेलिस येथील युनिव्हर्सिटी ऑफ सदर्न कॅलिफोर्निया येथे त्यांची निवड झाली होती.

## ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार ठार; अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी,दि.२३ फेब्रुवारी-**

टेंभुर्णी-कुर्डूवाडी मार्गावर विठ्ठलराव शिंदे साखर कारखान्याजवळील गंगामाई हॉस्पिटलसमोर झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि. २२) सकाळी साडेनऊच्या सुमारास घडली. या प्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात अज्ञात ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, राम कृष्ण रतन गाढवे (वय ७४, रा. अंजनगाव उमाटे, ता. माढा) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार त्यांचे भाऊ प्रभाकर रतन गाढवे (वय-५९) हे रविवारी सकाळी त्यांच्या मोटारसायकल (एमएच-४५-६११२) वरून टेंभुर्णीहून कुर्डूवाडी मार्गे गावाकडे जात होते. दरम्यान, विठ्ठलराव शिंदे साखर कारखान्याजवळ गंगामाई हॉस्पिटलसमोर अज्ञात ट्रकवरील अज्ञात चालकाने वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवून अचानक ब्रेक लावला. त्यामुळे ट्रक डाव्या बाजूच्या लेनमध्ये आल्याने प्रभाकर गाढवे यांच्या मोटारसायकलीची ट्रकला पाठीमागून जोरदार धडक बसली. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. तसेच मोटारसायकलीचे सुमारे २० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. अपघातानंतर संबंधित ट्रक चालकाने कोणतीही मदत न करता घटनास्थळावरून पळ काढल्याचे नमूद करण्यात आले आहे. उशिराने फिर्याद दाखल करण्याचे कारण फिर्यादीकडून असल्याचे पोलिसांनी सांगितले. या घटनेचा पुढील तपास टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेको जाधव व पोहेको ज्ञानदेव सरडे करीत आहेत. आरोपी ट्रक व चालकाचा शोध घेण्याचे काम सुरू असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे.



## संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त जन्मभूमी प्रतिष्ठानतर्फे आदरांजली

**बार्शी, दि.२३ फेब्रुवारी-**

धसपिंपळगाव (ता. बार्शी) येथे विविध क्षेत्रात कार्यरत भूमिपुत्रांनी स्थापलेल्या जन्मभूमी प्रतिष्ठानच्यावतीने संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली वाहण्यात आली. ज्येष्ठ ग्रामस्थ रामलिंग कामिनी यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी माजी सरपंच ज्ञानेश्वर भालेकर यांनी सामाजिक समतेचा आदर्श निर्माण करत सर्वांना बरोबर घेऊन सत्कार्य करण्याचे आवाहन केले. यावेळी महाराष्ट्र चॅम्पियन सचिन धस, प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष अण्णासाहेब पाटील, ज्येष्ठ नागरिक जयराम सुतार, वन अधिकारी सुलतान शेख, धनाजी वाघमोडे, दादा कसबे, विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे पुजारी पांडुरंग गुरव उपस्थित होते. राहुल धस यांनी प्रास्ताविक केले. आबा कामिनी, श्रीकांत कामिनी, संदीप वाघमारे, मनोज कोकाटे, सोहेल शेख, राम गरड, सुधीर कुलकर्णी, गणेश पवार यांनी परिश्रम घेतले.

## श्रीपूरच्या शिबीरात ३०० रुग्णांची तपासणी

### रोटरी क्लबतर्फे मोफत उपचार शिबीराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.२३ फेब्रुवारी-**

रोटरी क्लब ऑफ अकलूज, कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना, एच. व्ही देसाई हॉस्पीटल पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीपूर (ता. माळशिरस) येथील कारखाना स्थळावर झालेल्या मोफत नेत्ररोग, मोतीबिन्दू शस्त्रक्रिया व मधुमेह तपासणी शिबीरात सुमारे ३०० रूग्णांची तपासणी करण्यात आली.

कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. यावेळी रोटरी क्लबचे आशिष चौधरी, प्रकल्प प्रमुख पत्रकार संदीप लोणकर, डॉ. सलील तांबोळी, डॉ. सागर कोळेकर, सुभाष सोरटे, डॉ. उत्तम खरात, डॉ. सुधीर पोफळे, डॉ. प्रमोद पवार, डॉ. सुनिल फडे, कर्मयोगीचे केन मॅनेजर संतोष कुमठेकर, प्रोडक्शन मॅनेजर एम. आर. कुलकर्णी, वर्क्स मॅनेजर अमोल बारटक्के, इस्टेट मॅनेजर रमेश गाजरे, परचेस मॅनेजर महेश देशपांडे, सेक्रेटरी भिमराव बाबर, रोटरी क्लब अध्यक्ष केतन बोरावके, सचिव अजिंक्य जाधव, संचालक कल्पेश पांढरे उपस्थित होते. शिबीरात ७६ जणांना मोती बिंदू आढळून आला. या सर्वांचे मोतीबिंदूचे ऑपरेशन दि. २५ फेब्रुवारी रोजी मोहम्मरवाडी पुणे येथे मोफत करण्यात येणार असल्याचे प्रकल्प प्रमुख लोणकर यांनी सांगितले. आशिष चौधरी यांनी प्रास्ताविक केले. कामगार प्रतिनिधी विजय पाटील यांनी सूत्रसंचालन केले.



**असेल दृष्टी तर दिसेल सृष्टी :** देशात १४० कोटी लोकसंख्येत सुमारे ६ कोटी नागरिकांना दृष्टीदोष आहे तर ५० लाख लोकांना दृष्टीच नाही. त्यामुळे डोळे हा महत्वाचा अवयव असून वेळीच डोळ्यांच्या समस्येवर लक्ष देवून डॉक्टरांकडून उपचार करून घेणे महत्वाचे आहे. कारण दृष्टी असेल तरच सृष्टी दिसणार आहे.

**- डॉ. यशवंत कुलकर्णी,कार्यकारी संचालक.**

# पंढरपूर मंदिरातील पुरातन छायाचित्रे गायब?

## नविन वादाला तोंड; आंदोलनाचा दिला इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ फेब्रुवारी-**

येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील विठ्ठल रुक्मिणी स्वयंवराच्या संदर्भातील छायाचित्रे गायब झाल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे. ही छायाचित्रे मंदिर समितीने काढली की कुणी गायब केली याबाबत शंका व्यक्त केली जात आहे.

एका निवेदनाव्दारे मंदिरातील हा एक ऐतिहासिक व पुरातन अनमोल ठेवा मंदिर समितीने गायब केल्याचा गंभीर आरोप करत सामाजिक कार्यकर्ते गणेश अंकुशराव यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. या संपुर्ण प्रकाराची सविस्तर माहिती अशी की, येथील श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिरामधील श्रीरूक्मिणी मातेच्या गाभाऱ्यासमोरच असलेल्या रूक्मिणी सभामंडपात श्रीविठ्ठल रुक्मिणी मातेच्या स्वयंवराची सचित्र माहिती दर्शविणारी विविध



प्रसंगांची तैलचित्रे लावलेली होती, मात्र सध्या याठिकाणची वर्षानुवर्षे लावलेली ही तैलचित्रेच गायब आहेत. प्रसिद्ध पुरातन चित्रकार राजा रवी वर्मा यांनी ही चित्रं रेखाटली होती व कल्याण शेटे या जुन्या कलाकाराने या चित्रांमध्ये रंग भरले होते. शेकडो वर्षांपासून ही चित्रं फ्रेम करून मंदिरातील रुक्मिणी सभामंडपाच्या ठिकाणी लावलेली होती. ही चित्रं वारकरी भाविकांसाठी विशेष पर्वणी होती. जी पाहताना रुक्मिणी स्वयंवराचं जिवंत दृश्यच डोळ्यासमोर उभं झाल्याचा साक्षात्कार व्हायचा. पण आज ती चित्रं याठिकाणी नाहीत. मंदिर समितीच्या कारभाऱ्यांनी ही सगळी चित्रं कुठं अडगळीत फेकून दिली की कुणाला विकून टाकली ? असे प्रश्न आता यामुळे सर्वसामान्य भाविक - भक्तांमधून उपस्थित केले जात आहेत.

**अनेक तर्कवितर्काला उधाण**

दरम्यान दरवर्षी श्रीविठ्ठल रुक्मिणी मातेचा विवाह सोहळा मोठा गाजावाजा करत उत्साहाने साजरा करणाऱ्या मंदिर समितीने श्री कृष्ण- रुक्मिणी स्वंयवराची शतकानूशतके मंदिरात लावलेली मौल्यवान, दुर्मिळ छायाचित्रंच काढल्याने भाविक भक्तांमधून संताप व्यक्त होत असुन या चित्रांचं मंदिर समितीनं काय केलं असेल? यासंदर्भात विविध तर्कवितर्क लढवले जात आहेत.

**भाविक भक्तांमधून मागणी**

दरम्यान मंदिर समितीने नेमकं या चित्रांचं केले काय ? ही चित्रं तेथून का काढली? मुळ मौल्यवान तैलचित्रे काढून त्याच्या ठिकाणी डिजीटल प्रती आता लावल्यात त्या सुध्दा अनेक ठिकाणी फाटलेल्या आहेत, हे कशासाठी? मुळ ओरिजनल चित्रांचं काय केलं? याचा खुलासा व कारण मंदिर समितीचे प्रशासकीय अधिकारी व सदस्यांनी तसेच सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी तातडीने जाहीर करणे गरजेचे असल्याचे सर्वसामान्य भाविकांमधून बोलले जात आहे.

विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या रुक्मिणी सभामंडपातील स्वयंवराच्या दुर्मिळ चित्रां बरोबरच विठ्ठल मंदिरात असलेले पुरातन छत्रपती शिवरायांचे व भक्त पुंडलिक, संत नामदेव यांचेसह अनेक संतांचे पुरातन मौल्यवान चित्रे देखील दिसत नाहीत ती सुध्दा गायब आहेत. या सर्व मौलीक, पुरातन ऐतिहासिक ठेवा असलेल्या तैलचित्रांच्या संदर्भात नेमकं काय घडलं ? याचा खुलासा मंदिर समितीनं तातडीनं करावा अन्यथा आम्हाला लोकशाही मार्गाने आंदोलन करावे लागेल.

**- गणेश अकुंशराव,**
**सामाजिक कार्यकर्ते, पंढरपूर**